Researchers from Savitribai Phule Pune University, researchers from 10 research labs in Pune and company representatives associated with the field of sciences have been invited for the lecture series. Though the lecture series if for invitees, interested people can contact on info.iil@unipune.ac.in **HTC**

Hindustan Times 1-1-2020

# SPPU mulls over on-demand exam system for the benefit of students

Ardhra. Nair@timesgroup.com

**Pune:** The Savitribai Phule Pune University (SPPU) is contemplating an on-demand examination system to usher in flexibility and allow students to appear for exams as per their convenience.

The vice-chancellor of SPPU **Nitin Karmalkar** said while the choice-based credit system and an open learning centre were introduced to bring flexibility in the learning process, he had been thinking of taking it a step further by making the examination system "need-based". This would also enable students, who participate in sports or other activities and are unable to appear for the scheduled examinations, to appear for them when they have the time.

"The choice-based credit system was introduced for flexibility in choosing subjects. The idea was that a science student could take up a humanities course or vice versa if s/he wanted. Unfortunately, that level of flexibility was not achieved. There were problems with rigid timetables and a general mindset against unconventional systems," he said.



Karmalkar also spoke about how the next step would be to make examinations flexible. "If a sports student wanted to appear for the examinations at a later stage for any reason, it would be easy if there was a need-based examination system in place. We have been thinking about how it could be implemented," he said.

Arvind Shaligram, controller of examinations at SPPU, said the need-based exam system was only an idea and no committee was working on its execution. It was something the university officials were serious about, he said.

"As per the present system, we prepare a schedule and students appear for the examination. The problem here is that the students who have not prepared for the examination also have to appear for it, which defeats its purpose. Examinations are to check how much a student has understood. A slow learner may require more time and hence s/he should be able to demand examination when s/he is ready. Similarly, a fast learner can appear for the exam early so that s/he can use the time to do something else or opt for more courses. At present, as the examination dates are fixed, it is a disadvantage for both groups of students," he said.

Shaligram said a small step in this regard was taken during the semester-ending examination of the MBA students in December 2019. "We tried using a computer-generated question paper for MBA students. A question bank was created by the panel of paper-setters and fed into the system. When the paper pattern was decided, the software randomly picked the questions from this bank and generated a paper. This was then approved by the panel and used for the examinations. This was just one step towards on-demand examination system. More needs to be done and the SPPU would look into it," he said.

Times of India 16-1-2020

# News Paper Clippings During January 2020

## Section : Education

# विद्यापीठातील स्पर्धा परीक्षा केंद्राच्या उमेदवारांचे यश

प्रभात वृत्तसेवा

पुणे, दि. ३१ - महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या नुकत्याच झालेल्या राज्य कर निरीक्षक या स्पर्धा परीक्षांमध्ये सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या स्पर्धा परीक्षा केंद्रातील उमेदवारांनी घवघवीत यश संपादन केले आहे. या परीक्षांमधील संपूर्ण महाराष्ट्रात खुला गट, अनुसूचित जाती प्रवर्ग, महिला प्रवर्ग, अनुसूचित जमाती प्रवर्ग अशा चारही प्रवर्गातील पहिला क्रमांक विद्यापीठाच्या स्पर्धा परीक्षा केंद्रातील विद्यार्थ्यांनी पटकावला आहे. या सर्व जणांची कर निरीक्षकपदी निवड झाली आहे. आयोगाच्या एकूण यशस्वी विद्यार्थ्यांमध्ये स्पर्धा परीक्षा केंद्रातील विद्यार्थ्यांचे प्रमाण १० टक्के इतके आहे. या विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षा केंद्राचे संचालक प्रा. जयंत उमराणीकर तसेच, इतर प्राध्यापक व तज्ज्ञांचे मार्गदर्शन लाभले आहे, अशी माहिती स्पर्धा परीक्षा केंद्रातर्फे देण्यात आली.

### यशस्वी विद्यार्थ्यांची नावे (कंसात प्रवर्ग)

- शुभम मदने (खुला प्रवर्ग)
- शुभम काळे (अनु. जाती)
- नूतन पाटील (महिला)
- राधा ढाकरे (अनु. जमाती)

प्रभात Wed, 01 January 2020 epaper.eprabhat.net/c/47504902

पुढारी

# योग प्रशिक्षण, व्यायामशाळा मार्गदर्शक अभ्यासक्रमांकडे कल

पुणे : प्रतिनिधी

सध्याच्या धकाधकीच्या काळात लहान वयापासूनच आरोग्याचे अनेक प्रश्न निर्माण होत असल्याचे आढळून येत आहे. त्यामुळे तंदुरुस्ती राखण्यासाठीच्या अभ्यासक्रमांकडील कल वाढू लागला आहे. त्यामुळे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील योग प्रशिक्षण आणि व्यायामशाळा मार्गदर्शक या अभ्यासक्रमांना मोठा प्रतिसाद मिळत असल्याचे प्रवेशाच्या आकडेवारीवरून स्पष्ट दिसून येत आहे.

दैनंदिन कामांची धावपळ, अपुरी झोप आणि खाण्याच्या अयोग्य सवयींमुळे आरोग्याचे प्रश्न निर्माण होतात. विशेषत: विद्यार्थ्यांमध्ये या समस्या वाढत असल्याचे निदर्शनास आले आहे. याची दखल घेऊन केंद्र शासनानेही खेलो इंडिया, विद्यापीठ अनुदान आयोगाच्या माध्यमातून फिट इंडिया अशा मोहिमा हाती घेतल्या आहेत. या पार्श्वभूमीवर शास्त्रशुद्ध पद्धतीने तंदुरुस्ती राखण्यासाठीचे प्रशिक्षण घेण्याकडे विद्यार्थ्यांचा ओढा वाढल्याचे दिसून येत आहे.

> योग प्रशिक्षण आणि व्यायामशाळा मार्गदर्शक या अभ्यासक्रमांना प्रतिसाद वाढत आहे. या अभ्यासक्रमांमुळे चांगल्या आरोग्याविषयीचे भान निर्माण होण्यास नक्कीच मदत होते.
>
> **डॉ. दीपक माने**, संचालक, शारीरिक शिक्षण विभाग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

My Pune Edition
2 Jan, 2020 Page No. 2
Powered by : erelego.com

पुढारी

# विद्यापीठ आवारात प्लास्टिक बंदी

## बाटलीबंद पाणी वापरावरही आता प्रतिबंध लागू

पुणे : प्रतिनिधी

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने शैक्षणिक संकुलात प्लास्टिक न वापरण्याचा संकल्प नव्याने केला आहे. शैक्षणिक संकुलात प्लास्टिकच्या बाटलीबंद पाणी वापरण्यासही मनाई करण्यात आली आहे. गेल्यावर्षीही विद्यापीठाद्वारे प्लास्टिक न वापरण्याचा संकल्प करण्यात आला होता. त्यामुळे यंदा तरी हा संकल्प पाळला जातोय का, हे पाहणे औत्सुकाचे ठरणार आहे.

शैक्षणिक संकुलातील विविध सभा, कार्यक्रम, चर्चासत्रे परिषदा आणि इतर कार्यक्रमांमध्ये प्लास्टीकच्या बाटलीबंद पाण्याचा वापर होताना दिसत आहे. त्यामुळे विद्यापीठ प्रशासनाने शैक्षणिक संकुलात प्लास्टीकच्या बाटलीबंद पाण्याच्या वापरावर पूर्णत: बंदी घातली आहे. अशा खरेदीची देयके वित्त व लेखा विभागाने अदा करू नयेत; तसेच विद्यापीठ आवारात प्लास्टीकच्या बाटलीबंद पाण्याच्या



विक्रीवर १ जानेवारी २०२० पासून पूर्णत: प्रतिबंध करण्यात येत असल्याचा आदेश कुलसचिव डॉ. प्रफुल्ल पवार यांनी दिला आहे. या आदेशाची अंमलबजावणी सर्व शैक्षणिक आणि प्रशासकीय विभागांनी काटेकोरपणे करावी, असेही आदेशात नमूद करण्यात आले आहे.

विद्यापीठ प्रशासनाने गेल्यावर्षी शैक्षणिक संकुलात प्लास्टिक वापरायला बंदी घातली होती. सुरूवातीला काही दिवस विद्यापीठाचे शैक्षणिक विभाग आणि कार्यालयांमध्ये प्लास्टिक न वापरण्याच्या नियमाची अंमलबजावणी करण्यात आली. मात्र, काही दिवसात परिस्थिती जैसे थे झाली. या नियमाचे काटेकोरपणे पालन झाले नाही.



आता विद्यापीठ प्रशासनाने नव्याने निर्णय घेत, शैक्षणिक संकुलात प्लास्टीकच्या बाटलीबंद पाण्याच्या वापरावर निर्बंध घातले आहेत. या निर्णयामुळे विद्यापीठातील दोन्ही कॅन्टीनमध्ये विद्यार्थ्यांना प्लास्टीकच्या बाटलीबंद पाण्याची खरेदी करता येणार नसून यापुढे तांब्या आणि ग्लासच्या सहाय्याने पाणी प्यावे लागणार आहे.

Pune Edition
2 Jan, 2020 Page No. 5
Powered by : erelego.com

# News Paper Clippings During January 2020

## Section : Education

# ... तर सावित्रीची लेक संकटांवर मात करेल

## रूपाली चाकणकर : सावित्रीबाई फुले यांची १८९ वी जयंती उत्साहात

लोकमत न्यूज नेटवर्क

**औंध** : "भारतीय स्त्रीमुक्तीच्या पहिल्या प्रणेत्या, भारतातील पहिल्या शिक्षिका व मुख्याध्यापिका तसेच समाजप्रबोधक म्हणून आपण सावित्रीबाई फुले यांना ओळखतो. त्या विज्ञानवादी विचारांच्या असल्याने समाजातील रुढी, परंपरांना आणि अंधश्रद्धांना त्यांनी विरोध केला. कोणत्याही स्त्रीच्या मागे जोतिबा फुलेंसारखा पुरुष खंबीरपणे उभा असेल, तर सावित्रीची लेक कोणत्याही संकटांवर मात करुन विजय मिळवू शकते." असे विचार विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना रूपाली चाकणकर यांनी मांडले.

रयत शिक्षण संस्थेचा पश्चिम विभाग व डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांची १८९वी जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.



अॅड. राम कांडगे यांच्या हस्ते रुपाली चाकणकर यांचा सत्कार करण्यात आला.

संस्थेच्या पश्चिम विभागीय समन्वयक समितीच्या सदस्या रूपाली चाकणकर, पश्चिम विभागीय अध्यक्ष अॅड. राम कांडगे, माजी महापौर दत्तात्रय गायकवाड, किसन रत्नपारखी, एस. टी. पवार, व्ही. टी. पिंगळे, प्राचार्य डॉ. शिवलिंग मेनकुदळे ऊपस्थित होते.

अध्यक्षीय मनोगत व्यक्त करताना अॅड. राम कांडगे म्हणाले, "सावित्रीबाई फुले यांनी स्त्रीमुक्तीची वाट सर्वसामान्य स्त्रियांसाठी मोकळी केली. तसेच, महात्मा जोतीराव फुले यांच्या कार्याला त्यांनी बळ दिले."

मराठी व इंग्रजी विभागाने तयार केलेल्या अक्षररंग भित्तिपत्रकांचे व स्त्री विशेषकांचे प्रकाशन प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते करण्यात आले. मराठी विभाग व विद्यार्थी मंच आयोजित आंतरमहाविद्यालयीन पथनाट्य स्पर्धेत १७०पेक्षा अधिक स्पर्धकांनी सहभाग घेतला.

परीक्षक म्हणून डॉ. राजेंद्र थोरात, डॉ. निशा भंडारी, डॉ. सविता पाटील यांनी, तर स्पर्धेचे कार्याध्यक्ष व उपप्राचार्य डॉ. संजय नगरकर, सूर्यकांत सरवदे यांनी काम पाहिले. डॉ. सुहास निंबाळकर, भक्ती पाटील यांनी सूत्रसंचालन केले.

लोकमत
4-1-2020

# जॉन डुए अभ्यास केंद्राची विद्यापीठात स्थापना

## डॉ. नितीन करमळकर यांच्या हस्ते उद्या उद्घाटन

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे** : अमेरिकेतील टेक्सास विद्यापीठाच्या सहकार्याने सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर अभ्यास विभागात जॉन डुए अभ्यास केंद्राची स्थापना करण्यात आली आहे. गुरुवारी (९ जानेवारी) दुपारी एक वाजता कुलगुरू डॉ. नितीन करमळकर यांच्या हस्ते या केंद्राचे उद्घाटन होणार असून डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मृती व्याख्यानाअंतर्गत टेक्सास विद्यापीठातील डॉ. स्कॉट स्ट्रॉउड यांचे 'बाबासाहेब आंबेडकर, जॉन डुए अँड द अनफिनिश्ड स्टोरी ऑफ प्राग्मॅटिझम' या विषयावर व्याख्यान होणार आहे.

डुए यांच्या नावाने अमेरिका, जर्मनी, इटली, हंगेरी, पोलंड, जपान, तुर्की, चीन इत्यादी देशांमध्ये केंद्र स्थापन झाली आहेत. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील केंद्र हे भारतातील पहिले केंद्र आहे. याच्या माध्यमातून जॉन डुए आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा प्रचार आणि प्रसार करण्यात येणार आहे. त्यासाठी व्याख्याने, कार्यशाळा, चर्चासत्रे आयोजित करण्यात येतील. या उपक्रमांसाठीचे आर्थिक सहकार्य टेक्सास विद्यापीठातर्फे केले जाणार आहे, अशी माहिती विद्यापीठाच्या आंतरराष्ट्रीय केंद्राचे संचालक डॉ. विजय खरे यांनी दिली.

**डुए यांचे ग्रंथ विद्यापीठात**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर १९१३ ते १९१६ या कालावधीत कोलंबिया विद्यापीठात शिक्षण घेत असताना जॉन डुए हे त्यांचे शिक्षक होते. त्यामुळे शिक्षक आणि विद्यार्थी यांची परंपरा पुढे सुरू ठेवण्यासाठी या केंद्राची स्थापना करण्यात येत आहे. जॉन डुए यांनी लिहिलेले, ३८ खंडांमध्ये प्रकाशित केलेले ग्रंथ टेक्सास विद्यापीठातर्फे या केंद्राला देणगी म्हणून देण्यात येणार आहेत.

लोकसत्ता
8-1-2020

# News Paper Clippings During January 2020

## Section : Education

# विद्यापीठात साकारणार सुसज्ज क्रीडानगरी

### क्रिकेट, हॉकीची मैदाने, स्विमिंग पूल उभारणार

म. टा. प्रतिनिधी, पुणे

केंद्र सरकारच्या 'खेलो इंडिया' आणि 'फिट इंडिया' आदी उपक्रमांना पाठिंबा देण्यासाठी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ सज्ज झाले असून, येत्या काही दिवसांत विद्यापीठात आंतरराष्ट्रीय दर्जाचे स्विमिंग पूल, हॉकी ग्राउंड; तसेच प्रथम श्रेणी दर्जाचे क्रिकेट सामने होऊ शकतील असे सुसज्ज क्रिकेटचे मैदान उभारण्यात येणार आहे. हॉकीचे मैदान हे बालेवाडी येथील क्रीडा संकुलातील मैदानापेक्षा उच्च दर्जाचे असणार आहे. या सर्व सोयीसुविधांमुळे विद्यार्थ्यांचे आरोग्य तंदुरुस्त राहण्यासोबतच नवोदित खेळाडूंना सरावाच्या संधी उपलब्ध होणार आहेत.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे शैक्षणिक संकुल सुमारे ४११ एकर परिसरात वसले आहे. मुख्य इमारत, प्रशासकीय इमारत, विविध कार्यालयीन विभाग आणि शैक्षणिक विभागांव्यतिरिक्त मोकळी जागा उपलब्ध आहे. या जागेचा सुयोग्य वापर व्हावा, यासाठी विद्यापीठ प्रशासनाने पावले उचलली आहेत. विद्यापीठाच्या सध्याच्या मैदानावर आंतरराष्ट्रीय दर्जाचे हॉकीचे मैदान तयार करण्यात येणार आहे. त्यासाठी सुमारे ४ कोटी रुपयांपेक्षा अधिक खर्च अपेक्षित असून, त्याला मंजुरी मिळाली आहे. याच मैदानाच्या बाजूला आंतरराष्ट्रीय दर्जाचे क्रिकेटचे मैदान तयार करण्यात येणार आहे. या मैदानावर प्रथम श्रेणी क्रिकेटचे सामने होऊ शकतील, अशा पद्धतीने ते तयार करण्यात येणार आहे.

याबाबत विद्यापीठाचे कार्यकारी अभियंता राजेंद्र पाटील म्हणाले, 'गेस्ट हाउसच्या मागील बाजूला क्रिकेटचे मैदान उभारण्यात येणार आहे. त्याची रचना ही आंतरराष्ट्रीय मानकांप्रमाणे राहील. या मैदानावर प्रथम श्रेणी क्रिकेटचे सामने होऊ शकतील, असे बांधकाम करण्यात येणार आहे. प्रेक्षकांसाठी पार्किंगचीही व्यवस्था करण्यात येणार आहे. उभारण्यात येणारे हॉकीचे मैदान बालेवाडीच्या श्री शिवछत्रपती क्रीडा संकुलातील हॉकीच्या मैदानापेक्षा उत्तम दर्जाचे राहणार आहे.' येत्या काही दिवसांत दोन्ही मैदानांच्या उभारणीला सुरुवात होणार आहे. त्याचप्रमाणे वसतिगृह क्रमांक नऊ समोरील मोकळ्या जागेत स्विमिंग पूल उभारण्याचा प्रस्ताव असून, त्यावर लवकर सकारात्मक निर्णय होईल. विद्यापीठात क्रीडासंस्कृती रूजण्यासाठी क्रीडा आणि शारीरिक शिक्षण मंडळाचे संचालक डॉ. दीपक माने प्रयत्नशील आहेत, असेही पाटील यांनी सांगितले.

(क्रमशः)

> सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या प्रशासनाच्या आराखड्यानुसार हॉकी, क्रिकेट आणि स्विमिंग पुलाची उभारणी करण्यात येणार आहे. राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियानाद्वारे (रूसा) मिळालेल्या निधीतून हॉकीचे मैदान तयार करण्यात येणार आहे. येत्या काही दिवसांत प्रत्यक्ष कामाला सुरुवात होईल.
>
> – डॉ. नितीन करमळकर, कुलगुरू, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ



अमित रुके



सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील क्रिकेट मैदानाची नियोजित जागा.

महाराष्ट्र टाइम्स
20-1-2020

# विद्यापीठात इनडोअर स्टेडियमचे काम अंतिम टप्प्यात

अमित रुके






सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या इनडोअर स्टेडियमचे काम अंतिम टप्प्यात आले आहे. लवकरच हे स्टेडियम विद्यार्थ्यांसाठी खुले होणार आहे.

म. टा. प्रतिनिधी, पुणे

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील आंतरराष्ट्रीय दर्जाचे इनडोअर स्टेडियम लवकरच पुणे शहरातील महाविद्यालयीन विद्यार्थी आणि उदयोन्मुख खेळाडूंना वापरासाठी खुले होणार आहे. या इनडोअर स्टेडियमचे काम सध्या अंतिम टप्प्यात आहे.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात विद्यापीठ अनुदान आयोगाच्या (यूजीसी) माध्यमातून इनडोअर स्टेडियमची निर्मिती गेल्या तीन वर्षांपासून सुरू आहे. या इनडोअर स्टेडियमच्या बांधकामासाठी विद्यापीठाने काही प्रमाणात आपला निधी वापरला आहे. आंतरराष्ट्रीय दर्जाचे मानांकन असणाऱ्या या इनडोअर स्टेडियममध्ये बास्केटबॉल, टेनिस, व्हॉलिबॉल, बॅडमिंटन असे सर्व प्रकारचे खेळ खेळता येणार आहेत.

'इनडोअर स्टेडियमचे बांधकाम आंतरराष्ट्रीय मानांकनानुसार झाले आहे. या शेडमध्ये बसण्याचीही व्यवस्था करण्यात आली आहे. साधारण दोन हजार प्रेक्षक बसू शकतील, अशी रचना करण्यात आली आहे. संपूर्ण स्टेडियम वातानुकूलित राहणार असून, वातानुकूलन यंत्रणेचा वेग आणि कार्यप्रणाली आंतरराष्ट्रीय मानकांनुसार ठेवण्यात आली आहे. त्यामुळे खेळांना कोणत्याच प्रकारचा अडथळा निर्माण होणार नाही. या स्टेडियमचे बांधकाम अंतिम टप्प्यात असून, ते पूर्ण झाल्यावर विद्यापीठाच्या शारीरिक शिक्षण व क्रीडा मंडळाकडे पुढील कार्यवाहीसाठी सोपवण्यात येणार आहे. त्यानंतर त्याचा वापर विद्यापीठ आणि संलग्न कॉलेजांमधील विद्यार्थी; तसेच उदयोन्मुख खेळाडू करू शकतील,' अशी माहिती विद्यापीठाचे कार्यकारी अभियंता राजेंद्र पाटील यांनी 'महाराष्ट्र टाइम्स'ला दिली.

### वूडन फ्लोअरिंग

इनडोअर स्टेडियमचे फ्लोअरिंग हे वूडन असून, जर्मनीच्या नामांकित कंपनीने तयार केले आहे. या कंपनीने विविध देशांतील इनडोअर स्टेडियमच्या फ्लोअरिंगचे काम केले आहे. बालेवाडी येथील स्पोर्ट्स कॉम्प्लेक्समधील इनडोअर स्टेडियमपेक्षा हे उत्तम दर्जाचे असल्याचा दावा विद्यापीठ प्रशासनाने केला आहे. या स्टेडियममध्ये आंतरराष्ट्रीय दर्जाच्या स्पर्धा होऊ शकतात, असे तज्ज्ञांनी सांगितले. इनडोअर स्टेडियमची आसन क्षमता दोन हजारांच्या आसपास आहे. त्यामुळे विद्यापीठात होणारा पदवी प्रदान समारंभ किंवा राष्ट्रीय स्तरावरील कार्यक्रम हा इनडोअर स्टेडियमध्ये होऊ शकतो. स्टेडियमध्ये विद्यार्थी, कर्मचारी आणि प्राध्यापक बसू शकतात. याशिवाय अशा प्रकारच्या समारंभांसाठी खर्चिक मंडप उभारण्याचा विद्यापीठाचा खर्च वाचणार आहे.

(क्रमशः)

महाराष्ट्र टाइम्स
21-1-2020

# ‘ई बुक’कडे पाठ!

श्रीधर लोणी

माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील क्रांतीच्या पार्श्वभूमीवर सुरू झालेल्या नव्या सहस्रकाच्या दुसऱ्या दशकाचे शेवटचे वर्ष सुरू झाले आहे. गेल्या १९ वर्षांत डिजिटल तंत्रज्ञानाने आपले आयुष्य पूर्णतः बदलून टाकले आहे. वृत्तपत्रे, पुस्तके, रेडिओ, टेपरेकॉर्डर, टीव्ही, चित्रपट या विविध माध्यमांचा आस्वाद आता एका स्मार्ट फोनवरून घेणे शक्य झाले आहे. इतकेच नव्हे, तर सोशल मीडियामुळे प्रत्येकाला आशय निर्मिती करणेही शक्य झाले आहे. या वैशिष्ट्यामुळेच प्रत्येकाला व्यक्त होण्याची संधी मिळाली आहे. घरबसल्या खरेदी करण्यापासून बँकांचे व्यवहार करण्यापर्यंत अनेक गोष्टी डिजिटल तंत्रज्ञानामुळे प्रत्यक्ष साकारल्या गेल्या आहेत. या साऱ्या बदलाचा वेग इतका प्रचंड आहे, की तंत्रज्ञानाबाबत दहा वर्षांपूर्वीचा काळही अतिशय जुना वाटतो आहे. डिजिटल तंत्रज्ञानाबाबत पुढील दशकात काय होईल याचा दहा वर्षांपूर्वी वर्तविलेला अंदाज खरा तर ठरला आहेच; परंतु ज्यांचे अनुमान वर्तविण्यात आले नव्हते, त्याही प्रत्यक्षात आल्या आहेत. एका गोष्टीचा अंदाज मात्र पूर्णतः चुकला आहे. तो अंदाज आहे, ई बुकचा! त्याची चर्चा जगभर, विशेषतः अमेरिकेत मोठ्या प्रमाणावर सुरू आहे.

डिजिटल माध्यमातून पुस्तके वाचण्यासाठी ‘ॲमेझॉन’ने २००७मध्ये ‘किंडल’ आणले. पुस्तकाच्या छपाईचा, बाइंडिंगचा आणि नंतर वाचकांपर्यंत पोहोचविण्याचा खर्च नसल्याने ई बुक तुलनेने स्वस्त असल्याने, तसेच हाताळायला सोपे असल्याने पुस्तक



**डिजिटल तंत्रज्ञानाचा प्रभाव वाढत असतानाही छापील पुस्तकांच्या तुलनेत ई बुक मात्र खूपच मागे पडली आहेत. असे का झाले असावे?**

प्रकाशनाच्या क्षेत्रात क्रांती होत असल्यासारखे चित्र त्या वेळी रंगविण्यात आले. नव्वदच्या दशकानंतर जन्मलेली पिढी डिजिटल तंत्रज्ञानावरच लहानाची मोठी झाल्याने ती मोबाइल फोनप्रमाणेच ई बुक सहजपणे स्वीकारेल, असा होरा होता. त्यामुळे ई बुक जोरात चालतील; किंबहुना वाचनसंस्कृतीचे पुनरुज्जीवन होईल, असे सांगितले गेले. प्रत्यक्षात ई बुकचा म्हणावा तेवढा प्रसार झाला नाही. नव्या तंत्रज्ञानाकडे स्वाभाविकपणे आकृष्ट होणाऱ्या नवीन पिढीने ई बुककडे पाठच फिरवली.

अमेरिकेत विकल्या जाणाऱ्या एकूण पुस्तकांपैकी वीस टक्के पुस्तके ई बुक स्वरूपात असल्याचे समोर आले आहे. गेल्या दहा-बारा वर्षांत हे प्रमाण हळूहळू वाढून वीस टक्क्यांवर स्थिरावल्याचे चित्र आहे. गेल्या वर्षी अमेरिकेतील एकूण ग्रंथव्यवहारात २६ अब्ज डॉलरची उलाढाल झाली. त्यातील २२.६ अब्ज डॉलर उलाढाल मुद्रित पुस्तकांद्वारे झाली, तर केवळ २.०४ अब्ज डॉलर उलाढाल ई बुकच्या क्षेत्रात झाली, असे ‘असोसिएशन ऑफ अमेरिकन पब्लिशर्स’च्या २०१९च्या वार्षिक अहवालात नमूद करण्यात आले आहे. अन्य क्षेत्रांवर डिजिटल तंत्रज्ञानाचा मोठा परिणाम झाला असला, तरी पुस्तकांच्या बाबतीत वाचक अजूनही छापील प्रतीच्याच प्रेमात आहेत, असे मत अमेरिकेच्या या असोसिएशनच्या व्यवस्थापकीय संचालक मेरील हॉल्स यांनी एका मुलाखतीत नोंदविले आहे.

पुस्तकांच्या आकर्षक मुखपृष्ठांपासून आतील रंगीत चित्रांपर्यंत आणि आपल्या प्रतीवर हव्या त्या नोंदी करण्यापासून आपला स्वतःचा ग्रंथसंग्रह करण्यापर्यंत अनेक गोष्टी छापील पुस्तकांसाठी लाभदायक ठरत असल्याचे त्यांचे म्हणणे आहे. छापील पुस्तकांच्या तुलनेत उत्पादन खर्च कमी असूनही ई बुक स्वस्त नसल्याकडेही जाणकार लक्ष वेधतात. अमेरिकेतील ग्रंथव्यवहाराचे एक अभ्यासक अँड्र्यू अल्बानीज यांचे याबाबतचे निरीक्षणही महत्त्वाचे आहे. ते म्हणतात, ‘जेन झेड आणि मिलेनिअल्स पिढ्यांना (ऐंशीच्या आणि नव्वदच्या दशकांत जन्मलेल्यांना) स्मार्ट फोनचे आकर्षण आहे. सोशल मीडियात ते रमतात. त्यांना तुलनेने पुस्तकांची फारशी आवड नाही. त्यामुळे आधीच्या पिढ्यांच्या तुलनेत ते कमी वाचतात; परंतु वाचण्याच्या वेळी मात्र ते ई बुकच्या ऐवजी छापील पुस्तकांनाच पसंती देतात. याउलट जुन्या पिढीतील वाचकांना ई बुक सोयीचे पडतात. कारण एकतर पुस्तकातील मजकूर सोयीनुसार मोठा करता येतो आणि दुसरे म्हणजे दुकानातून जाऊन पुस्तक विकत घेण्याचा त्रास वाचतो.’

भारतातही ई बुकच्या बाबतीत फारसे वेगळे चित्र नाही. पुस्तके छापील स्वरूपात असोत की इलेक्ट्रॉनिक, ती वाढणे महत्त्वाचे आहे; कारण वाचनसंस्कृती अधिक समृद्ध होण्यासाठी ते आवश्यक आहे.

आयफेल टॉवर

लोकमत

**इतिहास अभ्यासक प्रसाद तारे : भारत इतिहास संशोधक मंडळात निबंध सादर**

# शिवकालीन गोष्टींचा संशोधनात्मक अभ्यास

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे :** शिखर-शिंगणापूर येथील शिवकालीन शिलालेख, प्रतापगडावरील शिलालेखाच्या खाणाखुणा, सुरतेच्या वाटेवरील किल्ला, पाटगाव येथील शिवकालीन शिल्प अशा शिवकालीन गोष्टींचा संशोधनात्मक अभ्यास इतिहासाचे अभ्यासक प्रसाद तारे यांनी केला आहे.

तारे यांनी भारत इतिहास संशोधक मंडळ पुणे चार निबंधांचे वाचन केले. निबंधातून हे विषय अभ्यास करून मांडण्यात आले आहेत.

सातारा जिल्ह्यातील शिखर-शिंगणापूर येथील छत्रपती शिवाजी महाराज यांचे नाव असलेला शिवकालीन शिलालेख प्रकाशात आला आहे. शिलालेख मंदिराच्या एका पायरीवर संभाजीराजे भोसले व शिवाजीराजे भोसले अशा दोन ओळी कोरलेल्या आहेत. पहिल्या ओळीमध्ये शहाजी महाराजांचे ज्येष्ठ पुत्र संभाजी महाराजांचे नाव तर दुसऱ्या ओळीमध्ये धाकटे पुत्र शिवाजी महाराजांचे नाव कोरलेले आहे. संभाजी महाराज इ.स. १६५४-५५ च्या सुमारास लढताना धारातीर्थी पडले. म्हणजेच हा शिलालेख इ.स. १६३० ते १६५४ दरम्यानचा असला पाहिजे. हा शिलालेख शहाजी महाराज आणि जिजाऊ यांच्या आदेशावरून कोरला असावा असा तर्क आहे.

प्रतापगडावरील श्री भवानीमातेच्या मंदिराच्या गाभाऱ्याच्या दारात एका दगडी पायरीवर शिलालेख कोरलेला आहे. पायरीची झीज झाल्याने अक्षरे वाचण्यायोग्य राहिली नाहीत. पण निरखून पाहिल्यास देवनागरी लिपीतील अक्षरे दिसून येतात. शिवाजी महाराजांनी देवीचे मंदिर इ.स. १६६२ च्या आधी बांधले आहे. शिलालेखही त्याच सुमारास कोरला असणे सयुक्तिक आहे.

दक्षिण गुजरातमधील वलसाड जिल्ह्यातील धरमपूर तालुक्यात पिंडवल नावाचा किल्ला प्रकाशात आला आहे. सुरतेवर दोन स्वाऱ्या झाल्यानंतर काही वर्षांनी म्हणजे इ.स. १६७६ च्या सुरुवातीस शिवाजी महाराजांनी कोकणच्या उत्तरेकडील व सुरतेच्या परिसरातील रामनगर राज्याचा मुलुख जिंकण्यासाठी आपले सैन्य पाठवले होते.

स्वराज्याच्या सैन्याने रामनगर राज्य जिंकले व त्यातील पिंडवलच्या डोंगरावर किल्ला बांधण्यास सुरुवात केली. तशी स्पष्ट नोंद त्यावेळी सुरतेच्या वखारीमध्ये असलेल्या इंग्रजांनी लिहिलेल्या पत्रात आली आहे.

हे पत्र आधीच प्रकाशित असून २५ मे १६७६ या तारखेचे आहे. किल्ल्याची लांबी सुमारे चारशे मीटर इतकी आहे.



पाटगाव येथील शिवकालीन शिल्प.

**शिवकाळात समाजमंदिर**

- कोल्हापूर पाटगाव येथे शिवकाळातच मौनीमहाराजांचे समाजमंदिर उभारण्यात आले होते. या मंदिराच्या भिंतीवर काही ऐतिहासिक प्रसंग शिल्परूपात तयार करून बसवले आहेत.
- त्यामध्ये कोणी महत्त्वाची व्यक्ती, सैन्याबरोबर जाणारे विशेष योद्धे अशा व्यक्तीरेखा कोरलेल्या आहेत. ही शिल्पे स्वराज्याशी संबंधित महत्त्वाच्या सेनाधिकाऱ्यांची आणि शिवाजी महाराजांची असावीत असा तर्क आहे.

मी गेली २७ वर्षे छत्रपती शिवाजी महाराज, गडकिल्ले, प्राचीन मंदिरे, शिल्प व लेणी यांचा अभ्यास करत आहे. या संशोधनात्मक गोष्टींचा अभ्यास मांडणारे पुस्तकही प्रकाशित होणार आहे.

\- प्रसाद तारे



सातारा जिल्ह्यातील शिखर शिंगणापूर येथील शिलालेख.


Hello Pune
Page No. 3 Jan 11, 2020
Powered by: erelego.com

# News Paper Clippings During January 2020

## Section : Educa-

डॉ. नंदकिशोर एकबोटे

# अपरिचित स्वामी विवेकानंद

**स्वामी विवेकानंद यांची आज, १२ जानेवारीला जयंती! स्वामी विवेकानंद यांचे आयुष्य म्हणजे प्रत्येकासाठी एक प्रेरणाच. भारताचे नाव साऱ्या विश्वात त्यांनी नेले. स्वामीजींचा लोकसंग्रह आणि काही अपरिचित घटना यांचा घेतलेला हा आढावा.**



निर्भयतेचे प्रतीक असे स्वामी विवेकानंद यांनी जगभर प्रवास करताना अनेक व्यक्ती जोडल्या; किंबहुना काही व्यक्ती स्वतःहून त्यांच्याकडे आल्या. मेरी लुई बर्क यांनी विवेकानंदांच्या पत्रांवर एक संशोधनपर ग्रंथ लिहिला आहे. त्याची माहिती सहा खंडांत उपलब्ध आहे. हा ग्रंथ इंग्लंडमध्ये प्रसिद्ध झाल्यावर त्या ग्रंथात असलेल्या पत्रातील लेखकांमुळे विवेकानंदांचा लोकसंग्रह किती होता, हे कळते. हा ग्रंथ म्हणजे लोकसंग्रहाचे प्रतीक म्हणावे लागेल.

### निमित्त

नरेंद्र, बिलू उर्फ बीरेश्वर असे त्यांची आई त्यांना म्हणत असे. आई भुवनेश्वरी यांना १० अपत्ये झाली. त्यातील पहिल्या पाच मुली, सहावे विवेकानंद म्हणजे नरेंद्र, सातवी मुलगी किरणबाला, आठवी मुलगी योगींद्रबाला, नववा मुलगा महेंद्रनाथ व दहावा मुलगा भूपेंद्रनाथ. त्यांचे वडील विश्वनाथबाबू गेल्यापासून त्यांच्या घरची परिस्थिती हलाखीची झाली होती. स्वामीजी घरात सर्वांत मोठे होते. सर्वांसाठी जेवण्यास धान्य नसेल, तर काही तरी कारण आईला सांगून, घराबाहेर पडत असत व बराच वेळ उपाशी राहत असत. जेव्हा त्यांच्या मित्रांना याबाबत कळले, तेव्हा त्यांनी महिन्याला १० रुपये मनिऑर्डर करण्यास सुरुवात केली. केवळ स्वामींच्या लोकसंग्रही वृत्तीमुळे हे घडू शकले.

नरेंद्रनाथ हे १८८५मध्ये संन्यास घेऊन, घर सोडून निघून गेले. स्वामीजी रामकृष्णांच्या मठात असताना स्वतःच्या राहत्या घरासंदर्भात एक खटला चालू होता. त्या काळात रामकृष्णांच्या मठातील स्वामी रामकृष्णानंद व स्वामी शारदानंद यांनी बाली हायस्कूलमध्ये मास्तरकी करून, त्यांना ८० रुपयांची मदत केली होती.

११ सप्टेंबर १८९३ रोजी शिकागोत पूर्व व पश्चिमेकडील भिन्न धर्मांच्या प्रतिनिधींच्या सभेत स्वामी विवेकानंदांच्या अद्वितीय उच्चारवाणीने जगाला भारतीय संस्कृतीचे दर्शन घडवले. १६ डिसेंबर १८९६पर्यंत स्वामी विवेकानंद युरोपमध्ये व्याख्यान देत होते. नंतर ते भारतात येण्यास निघाले; परंतु येताना कोलंबो येथे थांबून त्यांनी मोठी व्याख्यानमाला पूर्ण केली. कोलंबोचा प्रवास अत्यंत प्रभावी व माणसांची मोजदाद करता येणार नाही, एवढा मोठा झाला. यातही स्वामीजींचे अनेक पाश्चिमात्य मित्र निर्माण झाले, संस्था निर्माण झाल्या, वेदाभ्यासाला सुरुवात झाली.

स्वामीजींच्या जीवनात श्रीमती जॉर्ज. ब्ल्यू. हेल यांनी मोठी कामगिरी केली. सर्वधर्म परिषदेसाठी रस्त्यावर भिक्षा मागणाऱ्या या हिंदू संन्याशाला अनोळखी असताना फक्त त्याच्या संन्याशाच्या पोशाखावरून मदत करणारी ही 'अमेरिकी माता' भाग्यवान आहे. स्वामीजींचे कार्य त्यांनी पुढे नेले. ११ सप्टेंबर १८९३ हा दिवस स्वामीजींच्या जीवनाला अतिउच्च वळण देणारा ठरला होता. तो या मातेमुळेच. अमेरिकेतील सुप्रसिद्ध वक्ते रॉबर्ट इंगरसेल यांच्यासारखी स्वातंत्र्यप्रिय व्यक्तीही स्वामीजींची विश्वासू मित्र झाली होती. गुडव्हील या लघुलेखकाने स्वामीजींच्या भाषणांचा गोषवारा तयार करण्यासाठी फार मोलाचे कार्य केले.

स्वामीजींच्या लोकसंग्रहातील इतर महत्त्वाच्या व्यक्तींमध्ये जोसेफ मॅक्लाउड, प्रा. मॅक्समुलर, जर्मनीतील किम या शहरातील विश्वविद्यालयातील प्रा. पॉल डाइसन, लंडनच्या मिस मार्गारेट ई. नोबल यांच्या नावांचा उल्लेख करावा लागेल. भारतातील उद्योगपती जमशेठजी टाटा यांचेही नाव स्वामीजींच्या लोकसंग्रहात घ्यावे लागते. टाटा यांच्या मनातील भावना आणि स्वामीजींच्या सल्ल्याने टाटा यांनी लोखंडाचा कारखाना सुरू केला.

स्वामीजींचे महानिर्वाण ४ जुलै १९०२ रोजी झाले. भविष्यकालीन भारत असा असेल, या संदर्भात आपल्या शिष्यांशी बोलताना स्वामीजी म्हणाले, 'विजय आपलाच आहे, निश्चिंत राहा. कार्य करीत रहा, थांबू नका, सेवा करीत राहा व निर्भय व्हा.' एवढे जरी आपण आत्मसात केले, तरी त्यांना मोठी आदरांजली ठरेल.

(लेखक इतिहास आणि पुरातत्त्वशास्त्राचे अभ्यासक आहेत.)

महाराष्ट्र टाइम्स 12-1-2020



शिवाजीनगर : मॉडर्न महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेतील विद्यार्थ्यांनी प्राचार्य डॉ. राजेंद्र झुंझारराव यांच्या उपस्थितीत राष्ट्रीय युवा दिन, स्वामी विवेकानंद जयंती आणि राजमाता जिजाऊ जयंतीनिमित्त कार्यक्रम पार पाडले. 'सकाळ यिन'मधील विद्यार्थ्यांनीही त्यात भाग घेतला.

# महाविद्यालयांतील प्रवेशांसाठी समन्वयक नेमण्याचे निर्देश

लोकसत्ता प्रतिनिधी

**पुणे :** विविध अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रक्रियेतील गोंधळ टाळण्यासाठी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या शैक्षणिक प्रवेश विभागाने महाविद्यालयांमध्ये प्रवेश समन्वयकाची नियुक्ती करण्याचे निर्देश दिले आहेत.

विद्यापीठाशी सलंग्न महाविद्यालये, परिसंस्थेतील प्रवेश प्रक्रिया विद्यापीठ अनुदान आयोगाच्या (यूजीसी) नियमानुसार राबवण्यात येते. मात्र, प्रवेश प्रक्रियेदरम्यान पुरेशा माहितीअभावी विद्यार्थ्यांना अडचणी येतात. त्यात आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करणे, प्रवेश रद्द करणे, प्रवेश रद्द करून कागदपत्र-शुल्क परत घेण्याबाबत विद्यार्थ्यांना माहिती नसते.

या संदर्भातील अनेक तक्रारी विद्यापीठाकडे करण्यात आल्या आहेत. विद्यार्थ्यांची शुल्क आणि कागदपत्रांची अडवणूक करण्यात येऊ नये यासाठी महाविद्यालय स्तरावर सुसूत्रीकरण यंत्रणा असावी, असे निर्देश यूजीसीने दिले आहेत.

प्रवेश प्रक्रिया, शासनाच्या विविध शिष्यवृत्ती योजना या सर्व बाबींची माहिती विद्यार्थ्यांना मिळणे, महाविद्यालयातील प्रवेश प्रक्रिया सुसूत्र होण्यासाठी प्रत्येक महाविद्यालय, मान्यताप्राप्त संस्थेत प्रवेश समन्वयक नियुक्त केल्यास विद्यार्थ्यांच्या अडचणींचे महाविद्यालय स्तरावरच निराकरण होईल. त्यासाठी महाविद्यालय प्रवेश समन्वयकाची नियुक्ती करण्याचे निर्देश विद्यापीठाच्या शैक्षणिक प्रवेश विभागाने दिले आहेत.

## प्रवेश समन्वयक नियुक्तीचे निकष आणि जबाबदारी

महाविद्यालय प्रवेश समन्वयक म्हणून अनुभवी प्राध्यापकावर जबाबदारी देण्यात यावी. त्यासाठी संबंधित प्राध्यापकाकडे किमान पाच वर्षांचा मान्यताप्राप्त शिक्षक म्हणून अनुभव असावा. ही नियुक्ती तीन वर्षांसाठी असावी. संबंधित प्राध्यापक महाविद्यालयातील प्रवेश समितीचा पदसिद्ध सचिव असेल. महाविद्यालय प्रवेशाचे वेळापत्रक जाहीर करणे, प्रवेशाच्या कामकाजामध्ये समन्वय राखणे, विद्यापीठाकडून विद्यार्थ्यांसाठी प्रवेशासंदर्भातील प्राप्त झालेली परिपत्रके, सूचनांसंदर्भातील माहिती विद्यार्थ्यांना देणे, शासनाच्या-विद्यापीठाच्या विविध शिष्यवृत्ती योजनांची माहिती देणे आदी जबाबदाऱ्या प्रवेश समन्वयकाला पार पाडाव्या लागणार आहेत.

लोकसत्ता Wed, 15 January 2020 https://epaper.loksatta.com/c/48003239

# अंतर्गत गुणप्रकरणी महाविद्यालयांवरील कारवाई मागे घ्या; अधिसभा सदस्यांची मागणी

**पुणे -** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने निकाल लागल्यानंतर महाविद्यालयांकडून विद्यार्थ्यांचे अंतर्गत गुण देताना चुका झाल्यास संबंधित महाविद्यालयांना विद्यापीठाच्या अन्य योजनांचा लाभ घेता येणार नसल्याचा निर्णय घेतला आहे.



अशा पद्धतीने महाविद्यालयांवरील होणारी कारवाई अतिशय जाचक असून ती त्वरित मागे घ्यावी, अशी मागणी अधिसभा सदस्यांनी केली आहे. अधिसभा सदस्य शामकांत देशमुख, संजय खरात, दादाभाऊ शिनलकर, संतोष ढोरे, शशिकांत तिकोटे, अभिषेक बोके आणि बागेश्री मंठाळकर यांनी ही जाचक अटी मागे घ्यावी, अशी मागणी कुलगुरू डॉ. नितीन करमळकर यांच्याकडे केली आहे. विद्यार्थ्यांचे अंतर्गत गुण देताना चुका आढळल्यास संबंधित महाविद्यालयास विद्यापीठाकडून देण्यात येणाऱ्या सुविधा अथवा अनुदान मिळणार नाही. तसेच गुणवत्ता सुधार योजना, दहा टक्के वाढीव जागा आणि विविध प्रकारचे पुरस्कार व पारितोषिकही संबंधित महाविद्यालय व तेथील प्राध्यापकांना देण्यात येत नाही. ही अट आता शिक्षणसंस्थांना जाचक ठरत आहे. यासंदर्भात अधिसभेतही जोरदार चर्चा झाली होती. त्यावेळी सदस्यांनी ही अट रद्द करण्याची मागणी केली होती. त्यावेळी कुलगुरूंनी याबाबत सकारात्मक निर्णय घेणार असल्याचे आश्वासन दिले होते. त्यानंतर आता पुन्हा अधिसभा सदस्यांनी विद्यापीठाने याबाबतचे दि. ११ ऑक्टोबर २०१९ रोजी काढलेले परिपत्रक मागे घ्यावी, अशी मागणी होत आहे.

प्रभात Sat, 18 January 2020 epaper.eprabhat.net/c/4809(

# News Paper Clippings During January 2020

## Section : Education

### राज्यात गुणवत्तेत पुणे विद्यापीठ आघाडीवर

**प्रभात वृत्तसेवा**

**पुणे, दि. २०** - राज्यात गुणवत्तेत सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ सर्वांत पुढे आहे. आता संलग्नित महाविद्यालयांची संख्या पाहता सर्वांत जुने विद्यापीठ म्हणून ओळख असलेले मुंबई विद्यापीठापेक्षाही पुणे विद्यापीठ विस्ताराने सर्वांत मोठा ठरला आहे.

या विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालयांची संख्या तब्बल ८९० इतकी झाली आहे. तर मुंबई विद्यापीठाशी ८२३ महाविद्यालये संलग्न आहेत, अशी माहिती आकडेवारीतून समोर आली आहे.



पुणे विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रात पुणे, नाशिक आणि नगर या ३ जिल्ह्यांतील महाविद्यालयांचा समावेश आहे. फेब्रुवारी १९४९ मध्ये पुणे विद्यापीठाची स्थापना होताना केवळ १८ महाविद्यालये संलग्नित होती. तेव्हा विद्यार्थी संख्या ८ हजार इतकी होती. गेल्या ७० वर्षांत पुण्याची ओळख ही शैक्षणिक हब म्हणून गणले जाऊ लागले. त्यामुळे पुण्यात अनेक नामांकित शैक्षणिक संस्था व अभिमत विद्यापीठे उभ्या राहिल्या.

अभ्यासक्रम, गुणवत्ता, उपक्रमाच्या जोरावर देशातील प्रमुख विद्यापीठांमध्ये पुणे विद्यापीठाचा क्रमांक लागतो. सध्या ८९० महाविद्यालये असून, स्वायत्त महाविद्यालयांची संख्याही वाढत आहे. गेल्या काही वर्षांत पुणे शहरासह पुणे ग्रामीण, नगर व नाशिक येथून पारंपरिक अभ्यासक्रमांसह व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या महाविद्यालयांना मोठ्या प्रमाणात परवानगी देण्यात आली आहे. दोन महिन्यांपूर्वीच विद्यापीठाने ३२ महाविद्यालयांना परवानगी देऊन त्यांच्या अंतिम मान्यतेचे प्रस्ताव राज्य शासनाकडे पाठविले आहेत.

> 'महाविद्यालयांची संख्या वाढली म्हणून विद्यापीठ मोठे होत असले तरी त्यापेक्षा गुणवत्ता वाढविण्यासाठी विशेष प्रयत्न केला जात आहे. अध्यापन, संशोधनावर अधिक भर दिला जात आहे. त्याचेच हे द्योतक म्हणावे लागेल.
>
> – डॉ. नितीन करमळकर, कुलगुरू, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

**मुंबई विद्यापीठापेक्षा विस्ताराने ठरले सर्वांत मोठे**

मुंबई विद्यापीठाची स्थापन १८५७ मध्ये झाली असून, देशातील सर्वांत जुन्या विद्यापीठांपैकी हे विद्यापीठ आहे. या विद्यापीठात मुंबई, संपूर्ण कोकण व ठाण्यातील ८२३ महाविद्यालयांचा समावेश आहे. मुंबई विद्यापीठाचे विभाजन करून स्वतंत्र कोकण विद्यापीठ सुरू करण्याचा विचार राज्य सरकार करत असल्याने मुंबई विद्यापीठाचा भार कमी होणार आहे.

प्रभात Tue, 21 January 2020 epaper.eprabhat.net/c/48193013

### विद्यापीठ सर्वांत मोठे

**म. टा. प्रतिनिधी, पुणे**

शैक्षणिक क्षेत्रात पुण्याचाच नव्हे, तर देशाचा मानबिंदू असलेले सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ आता राज्यातले सर्वांत मोठे विद्यापीठ झाले आहे. राज्यातील सर्वाधिक म्हणजे ८९० महाविद्यालये विद्यापीठाशी संलग्न आहेत. त्याचबरोबर पुणे विद्यापीठाची शैक्षणिक कामगिरीही उत्तम राहिल्याने संख्यात्मक व गुणात्मकदृष्ट्याही सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ राज्यातील सर्वांत मोठे विद्यापीठ बनले आहे.

मुंबई विद्यापीठ देशातील सर्वांत जुन्या विद्यापीठांपैकी एक असून, मुंबई विद्यापीठाची स्थापना १८५७मध्ये झाली. तर तत्कालीन पुणे विद्यापीठ (आताचे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ) हे 'पूना युनिव्हर्सिटी ॲक्ट' अंतर्गत फेब्रुवारी १९४९ मध्ये स्थापन झाले. जवळपास ९२ वर्षे आधी स्थापन झालेल्या मुंबई विद्यापीठाला आता सावित्रीबाई फुले विद्यापीठाने एका अर्थाने मागे टाकले आहे.



> साविञीबाई फुले पुणे विद्यापीठ सर्वच निकषांवर राज्यातील अग्रेसर विद्यापीठ असल्याचा नक्कीच आनंद आहे. विद्यार्थीहिताला विद्यापीठाने कायम प्राधान्य दिले आहे.
>
> – प्रा. डॉ. नितीन करमळकर, कुलगुरू

पुणे विद्यापीठाची स्थापना झाली, त्या वेळी विद्यापीठाशी १८ महाविद्यालये संलग्न होती. तर विद्यार्थीसंख्या आठ हजारांच्या आसपास झाली. सध्या विद्यापीठाशी ८९० महाविद्यालये व ७० संशोधन संस्था संलग्न आहेत. तर मुंबई विद्यापीठाशी संलग्न असलेल्या महाविद्यालयांची संख्या ८२३ आहे. मुंबई विद्यापीठाच्या कार्यक्षेत्राअंतर्गत १२ जिल्हे येतात. तर पुणे विद्यापीठाचे कार्यक्षेत्र पुणे, नगर व नाशिक या जिल्ह्यांपुरते आहे.

'सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालयांची संख्या ८९० झाली आहे. त्यामुळे हे विद्यापीठ राज्यातील सर्वांत मोठे विद्यापीठ बनले आहे. 'एनआयआरएफ' क्रमवारीतही विद्यापीठ दहाव्या स्थानी आहे. मुंबई विद्यापीठाचाही शैक्षणिक दर्जा चांगला आहे. दोन्ही विद्यापीठे आपला दर्जा अधिक सुधारण्यासाठी प्रयत्नशील आहेत,' असे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे उपकुलगुरू प्रा. डॉ. एन. एस. उमराणी यांनी सांगितले.

'विद्यापीठाच्या संलग्न महाविद्यालयांची मोठी संख्या काहीबाबतीत प्रशासनिकदृष्ट्या अडचण येत असली, तरी त्यावर योग्य त्या उपाययोजना करण्यात आल्या आहेत. विद्यापीठातील बरीचशी कामे ऑनलाइन पद्धतीने केली जात आहेत. आंतरराष्ट्रीय संस्थांशी करार करून अत्याधुनिक अभ्यासक्रमही उपलब्ध करून दिले जात आहेत,' असे कुलगुरू प्रा. डॉ. नितीन करमळकर यांनी सांगितले.

# News Paper Clippings During January 2020

## Section : Education

पुढारी

# पुणे विद्यापीठ राज्यात 'नंबर वन'

**पुणे : प्रतिनिधी**

राज्यातील सर्वात जुने आणि विस्ताराने मोठे विद्यापीठ म्हणून गेली अनेक वर्षे मुंबई विद्यापीठाचा दबदबा होता. मात्र आता हा मान सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाला प्राप्त झाला आहे. शैक्षणिक गुणवत्ता, संशोधन कार्य तसेच संलग्न महाविद्यालयामध्ये विद्यापीठाने बाजी मारली असून राज्यात प्रथम क्रमांकावर येण्याचा बहुमान मिळवला आहे. पुणे विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालयांची संख्या तब्बल ८९० इतकी झाली आहे, तर मुंबई विद्यापीठाशी ८२३ महाविद्यालये संलग्न आहेत



- मुंबई विद्यापीठाला टाकले मागे ; विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालयांची संख्या ८९०
- मुंबई विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालयांची संख्या ८२३

> महाविद्यालयांची संख्या वाढली म्हणून विद्यापीठ मोठे होत असले तरी त्यापेक्षा विद्यापीठाचा शैक्षणिक गुणवत्ता वाढविण्यावर भर आहे. त्यामुळेच संशोधन व इतर उपक्रमांवर भर दिला जातो. विद्यार्थी, प्राध्यापक यांना आवश्यक सुविधा देण्यावर विद्यापीठाचा नेहमीच भर राहिला आहे.
>
> **डॉ. प्रफुल्ल पवार**
> कुलसचिव, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

पुणे विद्यापीठाच्या अंतर्गत पुणे, नाशिक आणि नगर या तीन जिल्ह्यातील महाविद्यालयांचा समावेश आहे. फेब्रुवारी १९४९ मध्ये पुणे विद्यापीठाची स्थापना होताना केवळ १८ महाविद्यालयांनी नोंदणी केली होती. तेव्हा विद्यार्थी संख्या ८ हजार इतकी होती. गेल्या ७० वर्षात पुण्याला 'विद्येचे माहेरघर' असे विशेषण प्राप्त होत असताना अनेक नामांकित शैक्षणिक संस्था पुणे शहर व इतर भागात उभ्या राहिल्या. अभ्यासक्रम, गुणवत्ता, विविध उपक्रम तसेच विविध शैक्षणिक सामंजस्य कराराच्या जोरावर देशातील प्रमुख विद्यापीठांमध्ये पुण्याचा क्रमांक लागतो. सध्या ८९० महाविद्यालये असून, स्वायत्त महाविद्यालयांची संख्याही वाढत आहे. गेल्या काही वर्षात पुणे शहरासह पुणे ग्रामीण, नगर व नाशिक येथून पारंपारीक अभ्यासक्रमांसह व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या महाविद्यालयांना मोठ्याप्रमाणात परवानगी देण्यात आली आहे. दोन महिन्यांपूर्वीच विद्यापीठाने ३२ महाविद्यालयांना नव्याने परवानगी देऊन त्यांच्या अंतिम मान्यतेचे प्रस्ताव राज्य शासनाकडे पाठविले आहेत. मुंबई विद्यापीठाची स्थापन १८५७ मध्ये झाली असून, देशातील सर्वात जुन्या विद्यापीठांपैकी हे विद्यापीठ आहे. या विद्यापीठात मुंबई, संपूर्ण कोकण व ठाण्यातील ८२३ महाविद्यालयांचा समावेश आहे. मुंबई विद्यापीठाचे विभाजन करून स्वतंत्र कोकण विद्यापीठ सुरू करण्याचा विचार राज्य सरकार करत असल्याने मुंबई विद्यापीठाचा भार कमी होणार आहे.

My Pune Edition
21 Jan, 2020 Page No. 7
Powered by : erelego.com

# News Paper Clippings During January 2020

## Section : Education

महाराष्ट्र टाइम्स

# जड झाले ओझे!

संलग्न महाविद्यालयांच्या संख्येनुसार सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ राज्यात सर्वांत मोठे विद्यापीठ ठरले असून, सर्वांत जुन्या मुंबई विद्यापीठाला त्याने मागे टाकले आहे. पुणे, अहमदनगर आणि नाशिक या तीन जिल्ह्यांत कार्यक्षेत्र असलेल्या पुणे विद्यापीठाला ८९० महाविद्यालये संलग्न आहेत. मुंबई विद्यापीठ आणि राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठांतही संलग्न महाविद्यालयांची संख्या आठशेच्या वर आहे. अन्य संशोधन संस्था आणि स्वायत्त शैक्षणिक संस्था यांचा समावेश या आकड्यांत नाही. तो केल्यास या तीनही विद्यापीठांना संलग्न महाविद्यालये आणि संस्थांची संख्या प्रत्येकी एक हजाराच्या वर जाईल. अन्य विद्यापीठांतही संलग्न महाविद्यालयांची संख्या वाढत असून, हे उच्च शिक्षणाच्या वाढत्या प्रसाराचे द्योतक आहे. ग्रामीण भागातही कला, वाणिज्य, विज्ञान या शाखांचीच नव्हे, तर अभियांत्रिकी, व्यवस्थापनशास्त्र यांसह अन्य विद्याशाखांची महाविद्यालये मोठ्या प्रमाणात सुरू झाली आहेत. उच्च शिक्षण घेण्याच्या वयोगटातील २६ टक्के तरुण सध्या देशात महाविद्यालयांत जातात. राज्यात हे प्रमाण अधिक असले, तरी सत्तर टक्के तरुण आजही उच्च शिक्षणाच्या परिघाबाहेर आहेत. त्यांनाही त्यात आणणे गरजेचे आहे. त्यासाठी महाविद्यालयांची संख्या वाढवावी लागणार. याचा अर्थ असा, की विद्यापीठांना संलग्न महाविद्यालये वाढणार. सध्याच विद्यापीठे संलग्न महाविद्यालयांच्या ओझ्याखाली दबली आहेत. या वाढत्या संख्येचे आव्हान पेलण्याचा प्रयत्न विद्यापीठे करीत आहेत हे खरे. काळानुरूप बदलण्याचा, नवनव्या बाबींचा अभ्यासक्रमात समावेश करण्याचा, तसेच नवोन्मेषाला (इनोव्हेशन) वाव देण्यावर विद्यापीठे भर देत आहेत, हेही खरे; परंतु संलग्न महाविद्यालयांच्या वाढत्या संख्येमुळे त्यांना मर्यादा येत आहेत. विद्यापीठांची सर्वाधिक शक्ती ही प्रशासनावर, परीक्षा घेण्यावर आणि निकाल लावण्यावर खर्च होते आहे. एवढे करूनही परीक्षांचे निकाल वेळेत लागत नाहीत. मुंबई विद्यापीठात दोन वर्षांपूर्वी निकालांचे जे काही झाले ते आजही ताजे आहे. अभ्यासक्रमात नवनवीन प्रयोग करणे, उद्योगाच्या गरजांनुसार अभ्यासक्रम बनविणे, विद्यार्थ्यांतील उपक्रमशीलतेला वाव देण्याची लवचिकता दर्शविणे, संशोधनाला पूरक वातावरण तयार करणे, त्यासाठी पूरक सुविधा देणे यांबाबत आपली विद्यापीठे कमी पडतात. त्यामुळेच विद्यापीठांना महाविद्यालये संलग्न करण्याचे प्रारूप बदलायला हवे. शिक्षणाचा प्रसार कमी होता त्यावेळी हे प्रारूप उपयुक्त ठरले. आता त्याची उपयुक्तता तर संपली आहेच, शिवाय ती नव्या बदलांमधील अडथळा बनली आहे. संलग्न महाविद्यालयांमधील सुविधा, तेथील शिक्षक, विद्यार्थी या गोष्टी लक्षात घेऊन आणि सर्वसमावेशकतेचा विचार करून विद्यापीठांना अभ्यासक्रमापासून परीक्षा पद्धतीपर्यंत निर्णय घ्यावे लागतात. परिणामी बदल अतिशय संथपणे होतात आणि त्याचा गुणवत्तेवर विपरीत परिणाम होतो. आपल्या पदवीधरांची रोजगारक्षमता आधीच कमी होती; ती आता आणखी खालावते आहे. इंजिनीअरिंगची पदवी घेतलेले ८० टक्के स्नातक कोणत्याही प्रकारच्या कामासाठी पात्र नसल्याची धक्कादायक वस्तुस्थिती गेल्या वर्षी एका खासगी पाहणीत समोर आली. विद्यापीठांमधील अभ्यासक्रम आणि उद्योगांची गरज यांची योग्य सांगड घातली जात



नसल्याकडे गेली दोन दशके लक्ष वेधले जात आहे; परंतु त्यासाठी व्यापक प्रयत्न होताना दिसत नाहीत. संलग्न महाविद्यालयांच्या प्रारूपामुळे त्यात अडचण येत असल्याचे जाणकारांचे म्हणणे आहे. त्यामुळेच आता विद्यापीठांवरील ओझे कमी करण्याची गरज आहे. नवीन विद्यापीठांची निर्मिती हे त्यासाठीचे एक पाऊल आहे. महाविकास आघाडीचे सरकार आल्यानंतर कोकण विद्यापीठाची चर्चा सुरू झाली, ती योग्यच आहे. वास्तविक देशात जिल्हानिहाय विद्यापीठे असावीत, अशी शिफारस यशपाल समिती आणि पित्रोदा समितीनेही केली होती. ती आजही कागदावर आहे. विद्यापीठांची संख्या वाढली, तर उच्च शिक्षणाचे विकेंद्रीकरण होईल. नव्या विद्यापीठांबरोबरच जुन्या व मोठ्या महाविद्यालयांना शैक्षणिक स्वायत्तता देण्याचीही गरज आहे. आपल्याकडील अनेक जुनी महाविद्यालये याबाबत आधी साशंक होती. मात्र, आता त्यांपैकी काहींकडून स्वायत्ततेसाठी गंभीर प्रयत्न होत आहेत. काहींनी स्वायत्तता स्वीकारलीही आहे. स्वायत्ततेमुळे उच्च शिक्षण अधिक महाग होणार नाही, याची काळजी मात्र सरकारने घ्यायला हवी. त्याचबरोबर दूरशिक्षणाचे माध्यमही गंभीरपणे वापरायला हवे. काळानुसार अशी पावले न उचलल्यास विद्यापीठांवरील ओझे वाढत जाईल; मात्र व्यापक नव्या प्रयोगांबाबत त्यांचा संकोच होत जाईल.

महाराष्ट्र टाइम्स
21/1/2020

# News Paper Clippings During January 2020

## Section : Education

लोकमत

# परिपत्रक मागे घेण्याची मागणी

## अधिसभा सदस्य : गुण देताना चुका झाल्यास योजनांचा लाभ नाही

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे :** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने विद्यार्थ्यांना अंतर्गत गुण देताना चुका झाल्यास संबंधित महाविद्यालयांना विद्यापीठाच्या काही योजनांचा लाभ घेता येत नाही. अधिसभेत हा निर्णय रद्द करण्याचा ठराव झाल्यानंतरही त्याची अंमलबजावणी होत नसल्याने अधिसभा सदस्यांनी नाराजी व्यक्त करत निर्णय मागे घेण्याची मागणी कुलगुरुंकडे केली आहे.

अधिसभा सदस्य शामकांत देशमुख, संजय खरात, दादाभाऊ शिनलकर, संतोष ढोरे, शशिकांत तिकोटे, अभिषेक बोके आणि बागेश्री मंठाळकर यांनी मागणीचे निवेदन कुलगुरु डॉ. नितीन करमळकर यांच्याकडे दिले आहे. विद्यापीठाने अंतर्गत गुणांसंदर्भात १२ सप्टेंबर रोजी परिपत्रक काढले आहे. विद्यार्थ्यांचे अंतर्गत गुण देताना चुका आढळल्यास किंवा त्रुटी राहिल्यास संबंधित महाविद्यालयास पुढील दोन वर्षासाठी काही योजनांचा लाभ मिळणार नाही, असे त्यात नमूद केले आहे. विद्यापीठाकडून देण्यात येणाऱ्या सुविधा अथवा अनुदान, गुणवत्ता सुधार योजना, दहा टक्के वाढीव जागा आणि विविध प्रकारचे पुरस्कार व पारितोषिकही संबंधित महाविद्यालय व तेथील प्राध्यापकांना मिळणार नाहीत. यासंदर्भात अधिसभेत चर्चा होऊन निर्णय मागे घेण्याचा ठराव करण्यात आला. पण या ठरावाची अद्याप अंमलबजावणी सुरु झालेली नाही. त्यामुळे याबाबतचे १२ ऑक्टोबर काढलेले परिपत्रक मागे घ्यावी, अशी मागणी केली आहे.

Hello Pune
Page No. 5 Jan 18, 2020
Powered by: erelego.com

पुढारी

# जागतिक संदर्भात उच्च शिक्षणाचा दर्जा

**भारतातील श्रीमंत उद्योगपतींनी हार्वर्ड बिझनेस स्कूलच्या धर्तीवर भारतात व्यवस्थापनशास्त्र शिक्षण संस्था आणि एम. आय. टी.च्या धर्तीवर औद्योगिक प्रशिक्षण संस्था सुरू केल्या आहेत. एवढेच नव्हे, तर त्यांचा दर्जा उच्च राखून उत्कृष्ट संचालनही केले जात आहे. भारतातील अनेक खासगी उच्च शिक्षण संस्थांही परदेशी विद्यार्थ्यांना विशिष्ट व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी आकृष्ट करीत आहेत. कारण ब्रिटन, अमेरिका, कॅनडाच्या तुलनेत येथे दर्जेदार शिक्षण कमी खर्चात मिळते. त्यामुळेच उच्च शिक्षण दर्जेदार बनवायचे असेल, तर खासगी क्षेत्राला प्रोत्साहन देण्यावाचून पर्याय नाही.**

इंडियन इकॉनॉमिक्स असोसिएशनचे तीनदिवसीय १०२ वे वार्षिक संमेलन नुकतेच पार पडले. संमेलनाचे अध्यक्ष डॉ. जी. विश्वनाथन यांनी आपल्या भाषणासाठी जागतिक संदर्भात भारतातील उच्च शिक्षण क्षेत्रातील प्रतिष्ठित संस्थांच्या दर्जाचा विषय निवडला होता. कदाचित, उच्च शिक्षणाच्या क्षेत्रात ३५ वर्षांचा अनुभव असल्याने त्या आधारे अर्थतज्ज्ञांच्या वार्षिक संमेलनात त्यांनी हा विषय निवडला असावा. अर्थशास्त्रात पीएच. डी. प्राप्त करणाऱ्या जी. विश्वनाथन यांनी तामिळनाडूतील राजकारणात सक्रिय राहून १९८४ मध्ये वेल्लोर येथे वेल्लोर इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीची स्थापना केली होती. आता या संस्थेचे रूपांतर 'व्हीआयटी विद्यापीठा'त झाले आहे. खासगी क्षेत्रातील उत्कृष्ट विद्यापीठांमध्ये या संस्थेची गणना केली जाते. वेल्लोरव्यतिरिक्त व्हीआयटी विद्यापीठाचे कामकाज चेन्नई, आंध्र प्रदेशची राजधानी अमरावती आणि मध्य प्रदेशची राजधानी भोपाळ येथेही विस्तारले आहे.

विद्यापीठांच्या दर्जाचे मूल्यांकन अनेक राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय संस्थांकडून केले जाते. उच्च शिक्षण संस्थेत शिक्षक-विद्यार्थी प्रमाण, अनुभवी शिक्षकांची संख्या, ग्रंथालय, आधुनिक संगणक कक्ष, विज्ञान प्रयोगशाळा, शिक्षण संस्थेच्या शिक्षकांनी केलेल्या संशोधनाला आंतरराष्ट्रीय संशोधन नियतकालिकांमध्ये मिळालेली प्रसिद्धी, त्यांना मिळालेले पुरस्कार, ख्यातकीर्त कंपन्यांमध्ये संस्थेच्या विद्यार्थ्यांना मिळालेल्या नियुक्त्या, संस्थेची आर्थिक स्थिती, संस्थेचा स्वच्छ आणि पर्यावरणपूरक परिसर आदी निकषांवर दर्जाचे निर्धारण केले जाते. पाश्चात्त्य देशांमध्ये पेटंटसाठी केली गेलेली नोंदणी हाही एक निकष असतो. या निकषांच्या आधारावर जगातील दर्जेदार विद्यापीठांमध्ये ऑक्सफर्ड, केम्ब्रिज, हार्वर्ड, एम. आय. टी. आणि येल विद्यापीठांची गणना सर्वाधिक दर्जेदार विद्यापीठांमध्ये केली जाते. ही विद्यापीठे सरकारच्या अनुदानावर अवलंबून नाहीत. त्यांनी स्वतःच्या संसाधनांमधूनच आर्थिक परिस्थिती उत्तम बनविली आहे.

ऑक्सफर्ड आणि त्या अंतर्गत येणाऱ्या महाविद्यालयांमध्ये वार्षिक शिक्षण शुल्क सुमारे २३ लाख रुपये, तर निवास आणि भोजन खर्च वर्षाकाठी १० ते १५ लाख रुपये इतका असतो. अशा प्रकारे विद्यार्थ्यांना वर्षाकाठी सुमारे ३५ लाख रुपये खर्च करावे लागतात. या खर्चाची भारतातील खासगी क्षेत्रात असलेल्या दर्जेदार विद्यापीठांशी केली असता भारतात उच्च शिक्षण खूपच स्वस्त आहे, असे आपल्याला दिसून येते. सार्वजनिक क्षेत्रातील भारतीय तंत्रशिक्षण संस्था आणि भारतीय व्यवस्थापनशास्त्र संस्थांमधील खर्चाशी तुलना केली असता, भारतातील शिक्षण किती तरी पटींनी कमी खर्चिक असल्याचे दिसून येते. कारण, सरकारकडून उदारपणे उपलब्ध करून दिल्या जाणाऱ्या अनुदानांमधून या संस्थांचे संचालन केले जाते. ऑक्सफर्ड विद्यापीठात ३५० पदवी अभ्यासक्रम असून, ३३०० जागा आहेत. या विद्यापीठाची स्वतंत्र प्रेस असून, त्यात ३० हजारांहून अधिक कर्मचारी आहेत. ऑक्सफर्ड बॉडलियन लायब्ररीत सुमारे १३० लाख मुद्रित पुस्तके आहेत.

अमेरिकेतील हार्वर्ड विद्यापीठात शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांना वर्षाकाठी ५६ लाख रुपये खर्च करावा लागतो. येथील ७० टक्के विद्यार्थ्यांना कोणती ना कोणती शिष्यवृत्ती मिळते. हार्वर्ड विद्यापीठाच्या विकासात



तेथील माजी विद्यार्थ्यांचा मोठा वाटा आहे. भारतातील सधन उद्योगपती आणि व्यावसायिकांची परदेशात शिक्षण घेण्यासाठी पहिली पसंती हार्वर्ड बिझनेस स्कूललाच असते. ऑक्सफर्ड, केम्ब्रिज, हार्वर्ड आणि अन्य अमेरिकी तसेच युरोपीय विद्यापीठांत विद्यार्थ्यांना अध्यापन आणि संशोधन मार्गदर्शन करण्यात इमिरिटस प्राध्यापकांचा मोठा वाटा असतो. पाश्चात्त्य देशांमधील अनेक विख्यात विद्यापीठांत प्राध्यापकांची नियुक्ती करण्यासाठी वयाची अट नसते. त्यामुळे ९० वर्षांचे तंदुरुस्त प्राध्यापकही तेथे नियमित अध्यापन किंवा संशोधन कार्यात व्यग्र असलेले दिसतात.

आनंदाची गोष्ट अशी की, भारतातील श्रीमंत उद्योगपतींनी हार्वर्ड बिझनेस स्कूलच्या धर्तीवर भारतात व्यवस्थापनशास्त्र शिक्षण संस्था आणि एम. आय. टी. च्या धर्तीवर औद्योगिक प्रशिक्षण संस्था सुरू केल्या आहेत. एवढेच नव्हे, तर त्यांचा दर्जा उच्च राखुन उत्कृष्ट संचालनही केले जात आहे. भारतातील अनेक खासगी उच्च शिक्षण संस्थाही परदेशी विद्यार्थ्यांना विशिष्ट व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी आकृष्ट करीत आहेत. कारण ब्रिटन, अमेरिका, कॅनडाच्या तुलनेत येथे दर्जेदार शिक्षण कमी खर्चात मिळते. त्यामुळेच उच्च शिक्षण दर्जेदार बनवायचे असेल, तर खासगी क्षेत्राला प्रोत्साहन देण्यावाचून पर्याय नाही. उच्च शिक्षणाच्या क्षेत्रात सध्या कार्यरत असलेल्या ज्या खासगी संस्थांना राष्ट्रीय मूल्यांकन परिषदेने (नॅक) एए-प्लस ग्रेड दिली आहे, त्यांना सरकारने सर्वात आधी प्रोत्साहन द्यायला हवे. दुसरी गोष्ट म्हणजे, खासगी क्षेत्रातील उद्योजकांनी उत्कृष्ट दर्जाच्या शिक्षण संस्था स्थापन कराव्यात यासाठी त्यांना सरकारने प्रोत्साहित करायला हवे.

डॉ. जी. विश्वनाथन यांनी त्यांच्या भाषणात सरकारी क्षेत्रातील उच्च शिक्षण संस्थांच्या बाबतीत काहीही सांगितले नाही; परंतु अनेक मागास राज्यांमध्ये स्थापन करण्यात आलेल्या सरकारी शिक्षण संस्थांचा दर्जा समाधानकारक नाही, हे आपण पाहतोच. मागास राज्यांमधील सरकारे उच्च शिक्षणाच्या बाबतीत लोकानुनय करणारे धोरण अवलंबितात आणि प्रत्येक विभागात एक विद्यापीठ तसेच प्रत्येक गावात एक महाविद्यालय स्थापन करून शाबासकी मिळवतात; परंतु या संस्थांमध्ये अनुभवी आणि तज्ज्ञ शिक्षकांची नियुक्ती करण्यात अपयश येते. एकीकडे, 'नॅक'कडून ए ग्रेड मान्यताप्राप्त उच्च शिक्षण संस्थांना उदारपणे निधी प्राप्त होत आहे. दुसरीकडे, विपन्नावस्थेतील सरकारी शिक्षण संस्थांमध्ये संचालनासाठी अनेक बाबींचा अभाव असल्याने 'नॅक'कडून बी ग्रेडही सहजासहजी मिळत नाही. त्यामुळे उच्च शिक्षणात दर्जात्मक असमतोल वाढत चालला आहे.

त्यामुळेच सरकारने विभागीय स्तरावर कमीत कमी एक उत्कृष्ट महाविद्यालय विकसित करायला हवे. तसेच जिल्हास्तरावर एक उत्कृष्ट विज्ञान महाविद्यालय, एक उत्कृष्ट कौशल्य महाविद्यालय, एक उत्कृष्ट समाजविज्ञान महाविद्यालय तसेच एक उत्कृष्ट कला आणि साहित्य महाविद्यालय विकसित करायला हवे. या उत्कृष्ट महाविद्यालयांत मागास क्षेत्रातील गरीब कुटुंबांमधील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती आणि वसतिगृहाची सुविधा देऊन प्रवेश द्यायला हवा. राजकीय पक्षांनी उत्कृष्ट शिक्षण संस्थांच्या कारभारात ढवळाढवळ न करता दर्जा वाढविण्याच्या दृष्टीने सूचना देण्यापर्यंतच आपली भूमिका मर्यादित ठेवायला हवी. असे केले तरच मागास क्षेत्रांमधील सरकारी उच्च शिक्षण संस्था दर्जेदार आणि उत्कृष्ट बनू शकतील.

**- डॉ. हनुमंत यादव**
ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ

Pune Edition
8 Jan, 2020 Page No. 1
Powered by : erelego.com

# News Paper Clippings During January 2020

## Section : Education

# शोधनिबंध प्रसिद्ध करण्यात भारत तिसऱ्या स्थानी

## चीन पहिल्या, तर अमेरिका दुसऱ्या क्रमांकावर

रसिका मुळ्ये, लोकसत्ता

**मुंबई :** देशातील संशोधनाच्या दर्जाबाबत सातत्याने चर्चा होत असली, तरी संख्यात्मक पातळीवर भारताने जगात तिसरे स्थान मिळवले आहे. विज्ञान-तंत्रज्ञान विषयातील शोधनिबंध प्रसिद्ध करण्यात भारत जगात तिसऱ्या क्रमांकावर असून २०१८ मध्ये भारतीय संशोधकांचे साधारण १ लाख ३५ हजार शोधनिबंध आंतरराष्ट्रीय संशोधनपत्रिकांमध्ये प्रसिद्ध झाले. चीन पहिल्या स्थानावर तर अमेरिका दुसऱ्या स्थानावर आहे.

अमेरिकेतील 'नॅशनल सायन्स फाऊंडेशन'ने प्रसिद्ध केलेल्या आढावा अहवालातून ही बाब समोर आली आहे. जगातील एकूण शोधनिबंधांपैकी ५.३१ टक्के शोधनिबंध भारतातील आहेत. २००८ ते २०१८ या दहा वर्षांमध्ये आंतरराष्ट्रीय शोधपत्रिकांमध्ये प्रसिद्ध झालेल्या शोधनिबंधांची संख्या दुपटीपेक्षा अधिक वाढली आहे. २००८ मध्ये भारतीय संशोधकांचे ४८ हजार ९९८ शोधनिबंध प्रसिद्ध झाले होते. २०१८ मध्ये ही संख्या १ लाख ३५ हजार ७८८ पर्यंत पोहोचली. अभियांत्रिकी विषयातील शोधनिबंध प्रसिद्ध करण्याकडे भारतीय संशोधकांचा सर्वाधिक कल असून त्याचे प्रमाण ०२३ टक्के आहे. त्याखालोखाल संगणक शास्त्र विषयांतील संशोधन भारतात झाले असून त्याचे प्रमाण १८ टक्के आहे. संगणक शास्त्रातील सर्वाधिक शोधनिबंध प्रसिद्ध करण्यात भारत आघाडीवर आहे.

### शोधनिबंधांची टक्केवारी

| | |
|---|---|
| अभियांत्रिकी | २३.३० |
| संगणकशास्त्र | १४.६८ |
| जीवशास्त्र | १४.१६ |
| वैद्यकशास्त्र | १३.६५ |
| रसायनशास्त्र | ९.८३ |
| भौतिकशास्त्र | ८.१२ |

### गुणवत्तेबाबत प्रश्न कायम

अमेरिकेच्या सायन्स फाऊंडेशनने प्रसिद्ध केलेल्या अहवालानुसार भारतातील संशोधनाने संख्यात्मक पातळीवर झेप घेतली असली तरी गुणवत्तेबाबतचे प्रश्न कायम आहेत. भारतीय शोधनिबंधांमध्ये वाङ्मयचौर्याचे प्रमाण अधिक असल्याचा आक्षेप अनेक संस्थांकडून वारंवार घेण्यात येत आहे. याबाबत देशातील संशोधनचा आढावा घेण्यासाठी नेमण्यात आलेल्या समितीनेही काही महिन्यांपूर्वी शोधनिबंधांच्या दर्जाबाबत प्रश्न उपस्थित केले होते.

चीनच्या संशोधकांचे दहा वर्षांत सर्वाधिक शोधनिबंध प्रसिद्ध झाले असून २०१८ मध्ये ५ लाख २८ हजार २६३ शोधनिबंध प्रसिद्ध झाले आहेत. जगातील एकूण शोधनिबंधांपैकी २०.६७ टक्के वाटा चीनचा आहे. दुसऱ्या क्रमांकावर अमेरिका असून ४ लाख २२ हजार ८०८ शोधनिबंध प्रसिद्ध झाले आहेत. एकूण संशोधनात अमेरिकेचा वाटा १६.५४ टक्के आहे. याशिवाय जर्मनी, जपान, इंग्लंड, रशिया, इटली, दक्षिण कोरिया, फ्रान्स हे देश पहिल्या दहामध्ये आहेत.

लोकसत्ता Fri, 03 January 2020
https://epaper.loksatta.com/c/47560004

लोकमत

## भगतसिंह कोश्यारी : आरोग्य विद्यापीठाच्या ११ हजार ४०९ विद्यार्थ्यांना पदवीप्रदान

# स्वायत्त विद्यापीठे, महाविद्यालयांची गरज

लोकमत न्यूज नेटवर्क

**नाशिक :** विद्यार्थ्यांना संलग्नित महाविद्यालयांच्या वैश्विक दर्जाचे अत्याधुनिक ज्ञान देण्याचे आव्हान विद्यापीठांसमोर निर्माण झालेले असून, महाविद्यालयांची संख्या वाढत असताना हे आव्हान पेलण्यासाठी स्वायत्त विद्यापीठे तसेच महाविद्यालयांची निर्मिती होणे आवश्यक असल्याचे प्रतिपादन राज्यपाल तथा महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाचे कुलपती भगतसिंह कोश्यारी यांनी केले.

महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठातर्फे १९व्या दीक्षान्त सोहळ्यात मंगळवारी पदविका, पदवी, पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या व आंतरवासीयता पूर्ण केलेल्या आरोग्य शाखांच्या एकूण ११ हजार ४०९ विद्यार्थ्यांना पदवी प्रदान करण्यात आली. ६२ विद्यार्थ्यांना सुवर्णपदक प्रदान करण्यात आले, तर १४ विद्यार्थ्यांना पीएच.डी प्रदान करण्यात आली. वैद्यकीय शिक्षणमंत्री तथा विद्यापीठ प्र-कुलपती अमित देशमुख, पालकमंत्री छगन भुजबळ, कुलगुरु डॉ. दिलीप म्हैसेकर, प्र-कुलगुरु डॉ. मोहन खामगावकर, वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालयाचे संचालक डॉ. तात्याराव लहाणे, आयुषचे संचालक वैद्य कुलदीप कोहली आदी उपस्थित होते. कोश्यारी यांनी नवोदित डॉक्टरांना केवळ पैसा आणि पदासाठी काम न करता ग्रामीण व गरजूंपर्यंत वैद्यकीय सेवा पोहोचविण्याचे आवाहन केले. शासकीय महाविद्यालय सुरु करुन नाशिक हेल्थ सिटी ऑफ महाराष्ट्र करण्याचा मानस अमित देशमुख यांनी व्यक्त केला.

### यश शर्मा यास दहा सुवर्णपदके

एमबीबीएस मेडिसीन विद्या शाखेच्या पदवी परीक्षेत मुंबईतील सेठ जी. एस. मेडिकल कॉलेजच्या यश शर्मा याने तब्बल दहा सुवर्णपदक मिळविले. यशची आई व वडील दोघेही स्त्रीरोगतज्ज्ञ आहेत.

Pune Main
Page No. 3 Jan 22, 2020
Powered by: erelego.com

# News Paper Clippings During January 2020

## Section : Education

# राज्यातील प्राध्यापक अभ्यासू आणि हुशार

### मानव संसाधन विकास केंद्र; नवे प्रवाह आणि ज्ञान अद्ययावत राहण्यासाठी प्रशिक्षणासाठी प्रयत्न

**प्रभात वृत्तसेवा**

**पुणे, दि. १८ -** राज्य सरकारकडून प्राध्यापकांच्या प्रशिक्षणासाठी स्वतंत्र अ‍ॅकॅडमी सुरू करण्याचा मानस आहे. मात्र, केंद्र सरकारच्या विद्यापीठ अनुदान आयोगाने स्थापन केलेल्या सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील मानव संसाधन विकास केंद्रातून गेल्या पाच वर्षांत सहा हजार प्राध्यापकांनी प्रशिक्षण घेतले असून, उच्च शिक्षणातील नवे प्रवाह आणि ज्ञान अद्ययावत राहण्यासाठी प्रशिक्षणासाठी प्राध्यापकांकडून प्रयत्न होताना दिसत असल्याचे स्पष्ट होत आहे.

सेट तथा नेट उत्तीर्ण उमेदवार प्राध्यापक झाल्यानंतर शिकविण्याच्या कौशल्यात कमी पडतात. तसेच आपले ज्ञान अद्ययावत राहण्यासाठी प्राध्यापकांना अध्यापन प्रभावी करण्यासाठी प्रशिक्षणाची गरज आहे. या पार्श्वभूमीवर 'यूजीसी'ने प्राध्यापकांना प्रशिक्षण अनिवार्य केले आहे. त्यामुळे आता प्राध्यापकांकडून प्रशिक्षणास चांगला



प्रतिसाद मिळत आहे. एप्रिल २०१५ ते डिसेंबर २०१९ या कालावधीत सुमारे ६ हजार प्राध्यापकांनी या केंद्रातून शिकविण्याची नवी कौशल्य आत्मसात केल्याची आकडेवारीतून समोर आली आहे.

'यूजीसी' काळाची गरज लक्षात घेऊन १९९० मध्ये पुण्यासह देशभरात ६६ ठिकाणी मानव संसाधन विकास केंद्रे (एचआरडीसी) सुरू केली. या केंद्रांत नव्याने नोकरीत येणाऱ्या प्राध्यापकांसाठी २८ दिवसांचा 'ओरिएंटेशन प्रोग्रॅम'; तर अनुभवी प्राध्यापकांसाठी २१ दिवसांच्या 'रिफ्रेशर कोर्स'सह इतर अल्पकालीन प्रशिक्षण कार्यक्रम आहेत. 'ओरिएंटेशन प्रोग्रॅम'मध्ये शिकविण्याच्या पद्धतीसह विद्यार्थ्यांशी वर्तन कसे असावे, प्रश्न कसे तयार करावेत, उत्तरे कशी द्यावीत, व्यक्तिमत्त्व विकास, विद्यापीठ कायद्यातील तरतुदी आणि इतर माहिती २८ दिवसांच्या वर्गातून दिली जाते. 'रिफ्रेशर कोर्स' हे अनुभवी प्राध्यापकांना त्यांच्या बढतीसाठी अनिवार्य असून, शिवाय बदलत्या काळानुरूप अध्यापनातील नवीन गोष्टीही शिकविल्या जातात.

> प्राध्यापकांना सेवांतर्गत ज्ञान अद्ययावत व शिक्षणातील नवे प्रवाह अवगत करण्यासाठी हा प्रशिक्षण कार्यक्रम सुरू करण्यात आला आहे. यातून प्राध्यापकांची गुणवत्ता विकास होत असून, यात प्रशिक्षणाची केंद्र मोठी भूमिका निभावत आहे. एकूणच या प्रशिक्षणातून उच्च शिक्षणाचा दर्जा उंचावण्यास मदत होत आहे.
> – **डॉ. संजीव सोनवणे**, संचालक, मानव संसाधन विकास केंद्र, पुणे

| वर्ष | प्रशिक्षित प्राध्यापक |
|---|---|
| २०१५ | ८०६ |
| २०१६ | ५६२ |
| २०१७ | ७८९ |
| २०१८ | २०७५ |
| २०१९ | १७०३ |

प्रभात Sun, 19 January 2020
epaper.eprabhat.net/c/48133362

# विद्यापीठांची सामाजिक जबाबदारी निश्चित करण्याचा विचार

### यूजीसीकडून स्वतंत्र समिती स्थापन केली जाण्याची शक्यता

**चिन्मय पाटणकर लोकसत्ता**

**पुणे :** कॉर्पोरेट क्षेत्रातील कंपन्यांसाठीच्या सामाजिक उत्तरदायित्वाच्या धर्तीवर देशभरातील विद्यापीठांचीही सामाजिक जबाबदारी निश्चित करण्याचा विचार सुरू आहे. विद्यापीठ अनुदान आयोगाकडून या बाबत विचार करण्यात येत असून त्यासाठी स्वतंत्र समिती नेमून नियमावली अस्तित्वात येण्याची शक्यता आहे.

कॉर्पोरेट क्षेत्रातील कंपन्यांना त्यांच्या एकूण उत्पन्नाच्या दोन टक्के निधी सामाजिक उत्तरदायित्व म्हणून खर्च करावा लागतो. काही महिन्यांपूर्वी केंद्रीय अर्थ मंत्रालयाने

ज्ञान-विज्ञान विमुक्तये

नियमावलीत बदल करून संशोधन प्रकल्पांना निधी उपलब्ध करून देण्याची मुभा दिली आहे. इंडियन सायन्स काँग्रेसमध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शास्त्रज्ञांची सामाजिक जबाबदारी असल्याचा विचार मांडला होता. या पार्श्वभूमीवर विद्यापीठांनाही सामाजिक जबाबदारीच्या कक्षेत आणण्याचा विचार पुढे आला आहे.

सध्या देशभरातील विद्यापीठे उन्नत भारत अभियानाच्या माध्यमातून गावे दत्तक घेतात, काही महाविद्यालये सामाजिक भान म्हणून स्वतःहून ग्रामीण भागात जाऊन विविध उपक्रम राबवतात.

मात्र, त्या पलीकडे जाऊन समाजामध्ये बदल घडवणे ही कॉर्पोरेट क्षेत्रातील कंपन्यांसह सर्वांचीच जबाबदारी आहे. त्यामुळे विद्यापीठांनी समाजाभिमुख होण्यासाठी स्वतंत्रपणे काही करता येईल का, असा विचार सुरू झाला आहे. विद्यापीठांतील सत्रांमध्ये सामाजिक जबाबदारीचा समावेश करता येईल का, वर्षभरात सामाजिक जबाबदारी म्हणून विद्यापीठांनी काय काम करावे हे ठरवावे लागेल. त्यासाठी स्वतंत्र समितीची स्थापना करून नियमावली तयार करता येईल. त्या दृष्टीने यूजीसीच्या स्तरावर अद्याप विचार सुरू आहे.

### सीएसआरच्या वापराबाबत विद्यापीठांना अडचणी

देशभरातील विद्यापीठांच्या प्रतिनिधींसह काही दिवसांपूर्वी बैठक झाली. त्यात सामाजिक उत्तरदायित्वाचा निधी (सीएसआर) शिक्षणविषयक उपक्रमांसाठी वापरण्यात अडचणी येत असल्याचे सांगितले आहे. त्यामुळे केंद्रीय अर्थ मंत्रालयासह चर्चा करून या संदर्भात काही मार्ग काढता येईल का, या दृष्टीने काही करण्याचेही या विद्यापीठ प्रतिनिधींनी सुचवले आहे. त्या दृष्टीने काहीतरी पावले टाकणे आवश्यक आहे, असे यूजीसीचे उपाध्यक्ष डॉ. भूषण पटवर्धन यांनी सांगितले.

लोकसत्ता Wed, 22 January 2020
https://epaper.loksatta.com/c/48223964

## Section : Education

पुढारी

# यूजीसीच्या निकषांप्रमाणे पदवी देण्यात यावी

## यूजीसीचे देशातील विद्यापीठांना आदेश

**पुणे : प्रतिनिधी**

देशभरातील काही विद्यापीठे, उच्च शिक्षण संस्थांकडून विद्यार्थ्यांना विद्यापीठ अनुदान आयोगाच्या (यूजीसी) चौकटीच्या बाहेर जाऊन पदवी देत असल्याचे आढळून आले आहे. विद्यार्थ्यांना दिलेल्या या पदव्यांबाबतचे वाद न्यायालयात जाण्याचे प्रकार होत आहेत. हे प्रकार थांबवण्यासाठी विद्यापीठे, उच्च शिक्षण संस्थांनी यूजीसीच्या नियमाप्रमाणेच पदवी देणे बंधनकारक असल्याचे यूजीसीने परिपत्रकाद्वारे स्पष्ट केले आहे.

देशात पदवी देण्याचा अधिकार केंद्रीय, राज्य किंवा अभिमत विद्यापीठांनाच आहे. या संस्थांची संबंधित कायद्यानुसार स्थापना झालेली असणे आवश्यक आहे. यूजीसी कायद्याच्या कलम २२ च्या चौकटीमध्येच विद्यापीठे, उच्च शिक्षण संस्थांनी पदवी देण्याबाबत यूजीसीकडून वेळोवेळी स्पष्ट करण्यात आलेले आहे.

तरीही काही विद्यापीठे, उच्च शिक्षण संस्थांकडून त्याचे उल्लंघन होत असल्याचे यूजीसीच्या निदर्शनास आल्याने या संदर्भातील परिपत्रक देशभरातील विद्यापीठांच्या कुलगुरूंना पाठवण्यात आले आहे.

विद्यापीठ अनुदान आयोगाने (यूजीसी) ठरवलेल्या चौकटीच्या बाहेर जाऊन एखाद्या विद्यापीठाला पदवी द्यायची असल्यास संबंधित विद्यापीठाने अभ्यासक्रम सुरू करण्यापूर्वी किमान सहा महिने आधी रीतसर परवानगी घेणे आवश्यक आहे, असे यूजीसीचे सचिव रजनीश जैन यांनी स्पष्ट केले आहे.

My Pune Edition
21 Jan, 2020 Page No. 3
Powered by : erelego.com

# शिक्षकांचे प्रशिक्षण पुण्यात

## मंत्रिमंडळाच्या बैठकीत निर्णय; स्वायत्ततेसाठी कंपनी कायद्याखाली स्थापना

महाराष्ट्र टाइम्स
30-1-2020

**म. टा. प्रतिनिधी, पुणे**

शैक्षणिक पद्धतींमध्ये होणाऱ्या बदलांची माहिती कॉलेजांमधील अध्यापक आणि प्राचार्यांना होण्यासाठी, त्यांना अद्ययावत प्रशिक्षण देणाऱ्या अध्यापक प्रशिक्षण संस्थेची पुण्यात स्थापना करण्याचा निर्णय मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला आहे. या संस्थेला स्वायत्तता मिळण्याच्या अनुषंगाने कंपनी कायद्याखाली संस्थेची स्थापना करण्यात येणार आहे.

राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर होत असलेल्या आधुनिक शिक्षण पद्धतीतील बदल लक्षात घेऊन उच्च व तंत्र शिक्षण विभागातील कॉलेजांमधील अध्यापक व प्राचार्यांच्या प्रशिक्षणासाठी कंपनी कायद्यान्वये अध्यापक विकास संस्था स्थापन करण्याबाबतची माहिती काही दिवसांपूर्वी उच्च व तंत्रशिक्षण मंत्री उदय सामंत यांनी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात दिली होती. त्यावर राज्य सरकारच्या मंत्रिमंडळ बैठकीत शिक्कामोर्तब करण्यात आले. या प्रशिक्षण संस्थेत राज्य सरकारचा सहभाग ४० टक्के, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाचा हिस्सा ५ टक्के, राज्यातील सर्व विद्यापीठांचा हिस्सा ४० टक्के, शैक्षणिक संस्था व उद्योग यांचा हिस्सा ५ टक्के; तसेच स्वयंसेवी संस्था व व्यवसाय संस्था यांचा हिस्सा १० टक्के एवढा राहील.

प्रशिक्षण संस्थेचा कारभार सुरळीत चालावा यासाठी विद्यापीठे; तसेच महाविद्यालये, संस्था यांच्याकडून सदस्यत्व शुल्क घेण्यात येणार आहे. याशिवाय 'कॉर्पोरेट' व 'बिझनेस हाउस' यांच्याकडून प्राप्त होणाऱ्या निधीचा 'कॉर्पस फंड' तयार करण्यात येईल. या प्रशिक्षण संस्थेचे कामकाज चालविण्यासाठी प्रशासकीय समिती स्थापन करण्यात येणार असून, मुख्य सचिव हे त्याचे अध्यक्ष असतील. या संस्थेमध्ये अभ्यासक्रम आणि अध्यापनशास्त्र, अत्याधुनिक तंत्रज्ञान, नेतृत्व विकास, बहु-अनुशासनात्मक अध्यापक समूह व सर्वसमावेशक शिक्षण अशी ५ उत्कृष्टता केंद्रे प्रस्तावित आहेत. प्रशिक्षण देण्यासोबतच दुर्बल घटक, महिला व दिव्यांग यांच्या शिक्षणाच्या अनुषंगाने संवेदशीलता निर्माण करण्याचाही उद्देश आहे. यासोबतच पायाभूत आणि नियतकालिक प्रशिक्षण आयोजित करण्यात येणार आहे. राज्यातील कॉलेजांमध्ये सुमारे ५५ हजार अध्यापक कार्यरत आहेत. या सर्वांना 'रोटेशन' पद्धतीने प्रशिक्षण देण्यात येईल.

### या संस्थेची उद्दिष्टे

- अध्यापक, प्राचार्य यांना उद्योग व त्यांच्या संबंधित क्षेत्राचे अद्ययावत ज्ञान देण्यासोबतच शैक्षणिक पद्धत आणि तंत्रज्ञानाने समृद्ध करणे.
- विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेमध्ये झालेल्या बदलांच्या आधारे प्रशिक्षण पद्धतीमध्ये गरजेनुरूप बदल करणे.
- रोजगार संधीच्या आधारे नाविन्यपूर्ण अभ्यासक्रम विकसित करून, तसे बदल अभ्यासक्रमामध्ये करण्यासाठी शैक्षणिक संस्थांना मार्गदर्शन करणे.
- प्रभावी शिकणे-शिकविण्याची पद्धती निर्माण करणे व शैक्षणिक क्षेत्रामध्ये संशोधनास प्रोत्साहित करणे.
- शैक्षणिकदृष्ट्या प्रगत राष्ट्रांमधील शैक्षणिक पद्धतींचा अभ्यास करून अद्ययावत तंत्रज्ञानाधिष्ठित व रोजगाराभिमुख अभ्यास पद्धतींची सरकारला शिफारस करणे.



### पीएचडीधारक अधिव्याख्यात्यांना दोन वेतनवाढी

राज्यातील अकृषी विद्यापीठे व संलग्नित अशासकीय अनुदानित महाविद्यालयांतील ज्या अधिव्याख्यात्यांनी एक जानेवारी १९९६ पूर्वी पीएचडीचे शिक्षण पूर्ण केले आहे, त्यांना २७ जुलै १९९८ ऐवजी १ जानेवारी १९९६ पासून दोन आगाऊ वेतनवाढ देण्याचा निर्णय घेण्यात आला. यासाठीच्या खर्चास मान्यता देण्यात आल्याचाही निर्णय बैठकीत घेण्यात आला.

# News Paper Clippings During January 2020

## Section : Education

लोकमत

प्रस्तावास मंत्रिमंडळाची मंजुरी : शिक्षणपद्धतीतील बदलाची दखल

# पुण्यात अध्यापकांसाठी प्रशिक्षण संस्था उभारणार

मुंबई : राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर होत असलेल्या आधुनिक शिक्षण पद्धतीतील बदल लक्षात घेऊन उच्च व तंत्रशिक्षण विभागातील अधिनस्त अध्यापकांच्या व प्राचार्यांच्या प्रशिक्षणासाठी कंपनी कायद्यान्वये अध्यापक विकास संस्था स्थापन करण्यात येणार आहे. मंत्रिमंडळाने यासंबंधीच्या प्रस्तावास मंजुरी दिली.

या संस्थेत राज्य शासनाचा सहभाग ४० टक्के महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाचा हिस्सा पाच टक्के, राज्यातील सर्व विद्यापीठांचा हिस्सा ४० टक्के, शैक्षणिक संस्था व उद्योग यांचा हिस्सा पाच टक्के तसेच स्वयंसेवी संस्था व व्यवसाय संस्था यांचा हिस्सा दहा टक्के एवढा राहील. विद्यापीठे तसेच महाविद्यालये, संस्था यांच्याकडून सदस्यत्व शुल्क घेण्यात येणार असून कॉर्पोरेट व बिझनेस हाऊस यांच्याकडून प्राप्त होणाऱ्या निधीचा कॉर्पस फंड तयार करण्यात येईल.

या प्रशिक्षण संस्थेचे कामकाज चालविण्यासाठी प्रशासकीय समिती स्थापन करण्यात येईल व मुख्य सचिव हे त्याचे अध्यक्ष असतील.

### संस्थेची उद्दिष्टे अशी असतील

1. उच्च शिक्षण देणाऱ्या संस्थांमधील शिक्षकांना उद्योग/व्यवसाय व त्यांच्या संबंधित क्षेत्राचे अद्ययावत ज्ञान, शैक्षणिक पद्धती/तंत्रज्ञान यांनी समृद्ध करणे.
2. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेमध्ये झालेल्या बदलांच्या आधारे प्रशिक्षणाची परिणामकारकता तपासून प्रशिक्षण पद्धतीमध्ये गरजेनुरुप बदल करणे.
3. उद्योग क्षेत्रांमध्ये उपलब्ध असलेल्या/होणाऱ्या रोजगार संधीच्या आधारे नावीन्यपूर्ण अभ्यासक्रम विकसित करुन तसे बदल अभ्यासक्रमामध्ये करण्यासाठी शैक्षणिक संस्थांना मार्गदर्शन करणे.
4. शिक्षणाच्या गुणवत्तावाढीसाठी प्रभावी शिकणे-शिकविण्याची पद्धती स्थापित करणे व शैक्षणिक क्षेत्रामध्ये संशोधनास प्रोत्साहित करणे.
5. शैक्षणिकदृष्ट्या प्रगत राष्ट्रांमधील व इतर राज्यांतील शैक्षणिक पद्धतींचा अभ्यास करुन अद्ययावत तंत्रज्ञानाधिष्ठित व रोजगाराभिमुख अभ्यास पद्धतींबाबत शासनास शिफारस करणे/सल्ला देणे.
6. संस्थेमध्ये अभ्यासक्रम आणि अध्यापनशास्त्र, अत्याधुनिक तंत्रज्ञान, नेतृत्व विकास, बहु-अनुशासनात्मक अध्यापकसमूह व सर्वसमावेशक शिक्षण अशी पाच उत्कृष्टता केंद्रे प्रस्तावित असून याद्वारे सर्वसमावेशक असे प्रशिक्षण देणे त्याचप्रमाणे दुर्बल घटक, महिला व दिव्यांग यांच्या शिक्षणाच्या अनुषंगाने संवेदशीलता निर्माण करण्याचाही उद्देश आहे.

Pune Main
Page No. 12 Jan 30, 2020
Powered by: erelego.com



# News Paper Clippings During January  2020

## Section : Education

# माणूस घडवण्याचे शिक्षण देण्याचा विचार होणे आवश्यक

## राज्यपाल भगतसिंग कोश्यारी यांचे मत



'सेडा'तर्फे आयोजित कार्यक्रमात राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांच्या हस्ते एज्युसर्च या पुस्तिकेचे प्रकाशन सोमवारी करण्यात आले. या वेळी (डावीकडून) प्र-कुलगुरु डॉ. एन. एस. उमराणी, प्रा. अनिरुद्ध देशपांडे, राज्यपाल कोश्यारी, ॲड. एस. के. जैन आणि धनंजय कुलकर्णी.

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** 'महाविद्यालयांमधील विद्यार्थी या पुस्तकातून थोडे, त्या पुस्तकातून थोडे साहित्य गोळा करतात आणि त्याचा प्रबंध सादर करून पीएच.डी. मिळवतात. महाविद्यालयांमध्ये संशोधन अगदी नावापुरतेच होते. कवी तुलसीदास, समर्थ रामदास, आइन्सस्टाइन, वर्ड्सवर्थ, सॉक्रेटिस यांनी कुठे संशोधन केल्याचे माझ्या ऐकिवात नाही. त्यामुळे प्रशिक्षण किंवा संशोधनापेक्षा चांगला माणूस घडवण्याचे शिक्षण देण्याचा विचार होणे आवश्यक आहे,' असे स्पष्ट मत राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांनी मांडले.

स. प. महाविद्यालयात शैक्षणिक विकास प्रशासन केंद्रातर्फे (सेडा) उत्कृष्टशिक्षक, उत्कृष्ट संस्था पुरस्कार कोश्यारी यांच्या हस्ते मंगळवारी प्रदान करण्यात आला. त्यावेळी कोश्यारी बोलत होते. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. एन. एस. उमराणी, सेडाचे अध्यक्ष अनिरुद्ध देशपांडे, केंद्राचे सचिव धनंजय कुलकर्णी, शिक्षण प्रसारक मंडळीचे अध्यक्ष ॲड. एस. के. जैन आदी या वेळी उपस्थित होते. सोमेश्वरनगरच्या काकडे महाविद्यालयातील डॉ. देविदास वायदंडे आणि महर्षी कर्वे स्त्री शिक्षण संस्थेतील डॉ. सोनाली परचुरे यांना यांना उत्कृष्ट शिक्षक पुरस्कार, मॉडर्न महाविद्यालय, गणेशखिंडला उत्कृष्ट महाविद्यालय पुरस्काराने गौरवण्यात आले. तसेच एज्युसर्च या पुस्तिकेचे प्रकाशनही करण्यात आले. डॉ. वर्षा देशपांडे यांनी सूत्रसंचालन केले.

कोश्यारी म्हणाले, 'सध्या सर्वच जण संशोधन करा, संशोधनाला प्रोत्साहन द्या असे म्हणत आहेत. पण जगातील सर्वोत्तम शिक्षकांनी कोणत्या पदव्या घेतल्या होत्या, कोणते संशोधन केले होते असा मला प्रश्न पडतो. नवीन शिक्षण पद्धतीची चर्चा होत असताना त्याचा उद्देश केवळ शिक्षण आणि नोकरी एवढाच उद्देश सिमीत आहे का? यापेक्षा वेगळा विचार आपण करणार नाही का? ठराविक चौकटीत शिक्षण न घेता, व्यापकपणे विचार झाला पाहिजे. त्यात शिक्षकांची भूमिका महत्त्वाची आहे. त्यातूनच देशाचे नवे नेतृत्व घडणार आहे.'

लोकसत्ता Wed, 22 January 2020
https://epaper.loksatta.com/c/48223599

# News Paper Clippings During January 2020

## Section : Education

पुणे, २२ जानेवारी २०२० ६

# शैक्षणिक क्षेत्रात संशोधन, प्रशिक्षणासह चांगला मानवी दृष्टिकोन हवा : कोश्यारी



**पुणे :** शैक्षणिक क्षेत्रात चर्चा करताना नवे संशोधन आणि प्रशिक्षण यांची ज्याप्रमाणे आवश्यकता आहे, त्याप्रमाणेच चांगला मानवी दृष्टिकोन निर्माण करण्याचीही आवश्यकता आहे, असे प्रतिपादन राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांनी केले.

शैक्षणिक विकास प्रशासन केंद्राच्या वतीने आयोजित उत्कृष्ट शिक्षक व उत्कृष्ट संस्था पुरस्कार प्रदान मंगळवारी सर परशुराम महाविद्यालयाच्या सभागृहात पार पडला. यावेळी राज्यपाल कोश्यारी बोलत होते. यावेळी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे उपकुलगुरू प्रा. डॉ. एन. एस. उमराणी, शैक्षणिक विकास प्रशासन केंद्राचे अध्यक्ष अनिरुद्ध देशपांडे, केंद्राचे सचिव धनंजय कुलकर्णी, शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष एस. के. जैन आदी उपस्थित होते.

कार्यक्रमात शैक्षणिक विकास प्रशासन केंद्राच्या वतीने दिला जाणारा उत्कृष्ट शिक्षक पुरस्कार डॉ. देविदास वायदंडे आणि महर्षी कर्वे स्त्री शिक्षण संस्थेच्या प्रा. डॉ. सोनाली परचुरे यांना, तर पुण्यातील मॉडर्न महाविद्यालयास उत्कृष्ट शिक्षण संस्था पुरस्कार देवून राज्यपाल कोश्यारी यांच्या हस्ते गौरविण्यात आले. यावेळी 'इडूसर्व' या पुस्तिकेचे प्रकाशन करण्यात आले. कोश्यारी म्हणाले, आपल्या देशात तुलसीदास, समर्थ रामदास यांचा आदर्श समोर ठेऊन शैक्षणिक क्षेत्रात नेतृत्व करण्यासाठी शिक्षकांनी पुढे यावे, देशाच्या उभारणीत नेतृत्व करण्यासाठी शिक्षकांचे योगदान महत्त्वपूर्ण ठरणार असल्याचेही त्यांनी सांगितले. कोणतेही काम छोटे नसते, प्रत्येक कार्यातून काही तरी चांगले निश्चित घडत असते. प्रा. डॉ. उमराणी म्हणाले, देशातील उद्योग क्षेत्रात क्रांती झाली असून उद्योगांना अपेक्षित कुशल मनुष्यबळ उपलब्ध करून देण्यासाठी नवनवे अभ्यासक्रम, कौशल्य अभ्यासक्रम विकसित करण्याला विद्यापीठाचे प्राधान्य राहणार आहे. अनिरुद्ध देशपांडे म्हणाले, नवीन शैक्षणिक धोरणासाठी शैक्षणिक विकास प्रशासन केंद्राचे कार्य सुरू आहे. पुरस्कारार्थींच्या वतीने मॉडर्न महाविद्यालयाचे डॉ. गजानन एकबोटे यांनी मनोगत व्यक्त केले. प्रास्ताविक अध्यक्ष अनिरुद्ध देशपांडे यांनी केले. केंद्राचे सचिव धनंजय कुलकर्णी यांनी आभार मानले.

**केसरी**

**22-1-2020**

# News Paper Clippings During January 2020

## Section : Education

### » संधी नोकरीच्या

**शीतलकुमार रवंदळे**

# महाविद्यालय आणि प्लेसमेंट

भारताला महासत्ता बनायचे असल्यास स्वयंरोजगाराचे प्रमाण येत्या काही वर्षांत १० ते १५ टक्क्यांपर्यंत पोचायला हवे. यासाठी पालकांची मानसिकता बदलणे गरजेचे आहे. माझा पाल्य १० ते ५ नोकरी करून सायंकाळी घरी यावा व साधे, सहज, चढ-उतार नसलेले शांत जीवन जगावे ही पालकांची माफक अपेक्षा असते. मात्र 'More Risk... More Money व No Risk... No Money' हा फंडा समाजात रुजत नाही, तोपर्यंत पालक विद्यार्थ्यांची इच्छा मारून त्यांना स्वयंरोजगाराऐवजी नोकरीकडे ढकलण्याचा प्रयत्न करत राहणार. याउलट आजकालच्या विद्यार्थ्यांना करिअरचा चॉईस विचारल्यास 'स्वयंरोजगार' निवडू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांचे प्रमाण खूप जास्त आहे. मात्र, परिस्थिती व संधीअभावी विद्यार्थी इच्छा असूनही स्वयंरोजगाराच्या वाटेपासून दूर जातात. यात समाजाच्या मानसिकतेनेही खूप मोठा प्रभाव पडतो. अमेरिकेतील स्टॅनफोर्डसारख्या जगातील नावाजलेल्या विद्यापीठात ७० ते ७५ टक्के विद्यार्थ्यांना टेक्नॉलॉजीतील उद्योजक बनण्याची इच्छा असते आणि त्यादृष्टीने तयारी करून त्यातील बरेचसे विद्यार्थी उद्योजक बनतात.

**महाविद्यालयांसाठी प्लेसमेंटचे महत्त्व :**

1 कॅम्पस प्लेसमेंटमधून एखाद्या विद्यार्थ्यास चांगल्या कंपनीत नोकरी लागल्यास त्याच्यासह संपूर्ण कुटुंबाचे भविष्य उज्ज्वल होते. समाजातील स्थान (स्टेट्स), आर्थिक उत्पन्न, जीवनशैली यातदेखील मोठा बदल होतो.

2 विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढल्यामुळे इतर क्षेत्रांतही यश मिळण्याची शक्यता वाढते.

3 हातात चांगला पैसा असल्यामुळे तो विद्यार्थी-विद्यार्थिनी गरीब कुटुंबातील असल्यास आपल्या लहान भावंडांना चांगल्या उत्तम दर्जाच्या शाळेत टाकतो.

कुठल्याही महाविद्यालयाचे आर्थिक गणित त्यात प्रवेशासाठी उपलब्ध असणाऱ्या जागा व प्रत्यक्षात होणारे प्रवेश आणि रिक्त जागा यावरच अवलंबून असते. ॲडमिशन घेताना विद्यार्थी व पालकांकडून होणारी विचारणा :

- कॉलेजमध्ये प्लेसमेंटचे परसेंटेज किती?
- सर्वांत जास्त पगार किती?
- सर्वसाधारण पगार किती?
- कोअर व आयटी प्रॉडक्ट कंपन्यांतील प्रमाण किती?
- प्लेसमेंटच्या प्रामुख्याने क्वालिटी प्लेसमेंट (पगार व चांगला जॉब प्रोफाईल म्हणजेच टेक्निकल जॉब प्रोफाईल) तसेच क्वॉंटिटी प्लेसमेंटचे प्रमाण (किती विद्यार्थ्यांना नोकऱ्या मिळाल्या) किती?

महाविद्यालयाचे आउटपुट कुठल्या क्वालिटीचे आहे हे प्रामुख्याने प्लेसमेंटच्या आकड्यांवरून ठरते.




**सकाळ**

**22-1-2020**

# एशियाटिक सोसायटीतर्फे संशोधन शिष्यवृत्ती जाहीर

**लोकसत्ता प्रतिनिधी,**

**मुंबई :** एशियाटिक सोसायटीने विविध विषयांवरील संशोधन शिष्यवृत्तीसाठी अर्ज मागवण्यास सुरुवात केली आहे. १ एप्रिल २०२० ते ३१ मार्च २०२१ या कालावधीसाठी ही शिष्यवृत्ती दिली जाईल. पदव्युत्तर पदवी अथवा पदव्युत्तर पदविका प्राप्त व्यक्ती यासाठी अर्ज करू शकतात. शिष्यवृत्तीसाठी निवड झाल्यानंतर सोसायटीचे सदस्य होणे अनिवार्य आहे. या शिष्यवृत्तीसाठी अर्ज करण्याची अंतिम तारीख ३१ जानेवारी २०२० आहे.

दाखल झालेल्या अर्जांची छाननी करून त्यातील निवडक उमेदवारांना मुलाखतीसाठी बोलावले जाईल. त्यातील काही उमेदवारांची शिष्यवृत्तीसाठी निवड केली जाईल. शिष्यवृत्ती प्राप्त झाल्यानंतर सहा महिन्यांनी संशोधकाने साधारण दोन हजार शब्दांमध्ये आपल्या कामाविषयीची माहिती पुरवणे आवश्यक आहे. शिष्यवृत्तीचा कालावधी अंतिम टप्प्यात असताना १० हजार ते २५ हजार शब्दांचा शोध प्रबंध सादर करावा. त्यासोबत शोधनिबंधही सादर करावा. तो प्रकाशित करण्याचे अधिकार एशियाटिक सोसायटीकडे असतील. सादर केलेला प्रबंध संबंधित विषयाच्या तज्ज्ञांकडे पाठवला जाईल. तज्ज्ञांनी सुचवलेल्या सुधारणा करून सुधारित आवृत्ती सादर करावी. अधिक माहितीसाठी पुढीलप्रमाणे संकेतस्थळ

www.asiaticsociety.org.in

संपर्क - विजय रिकामे (दुपारी १२ ते सायं. ५.३०)

| शिष्यवृत्तीचे नाव | विषय | रक्कम (रुपये) |
|---|---|---|
| १. जस्टीस के. टी. तेलंग | इंडोलॉजी | १२ हजार |
| २. इंडल | सामाजिक विज्ञान | १२ हजार |
| ३. एशियाटिक सोसायटीच्या दोन शिष्यवृत्ती | सामाजिक विज्ञान | २५ हजार (प्रत्येक शिष्यवृत्ती) |
| ४. एशियाटिक सोसायटीटी शिष्यवृत्ती | लेबर स्टडीज | १२ हजार |
| ५. गुलेस्तान बिलिमोरिया | मुंबई / महाराष्ट्र | १२ हजार |
| ६. जी. एस. पोहेकर स्मृती | जपान (शिक्षण, संस्कृती, राजकारण, अर्थकारण, जपानी बौद्ध धर्म, इत्यादी) | ८ हजार |
| ७. डॉ. शीला राज स्मृती | इतिहास | १६ हजार |
| ८. विमल एज. शाह स्मृती | पाली/बौद्ध अभ्यास | ४० हजार |
| ९. विमल एन. शाह स्मृती | मीडिया स्टडीज | ४० हजार |
| १०. चीफ जस्टीस एम. सी. छागला | आधुनिक भारताचा इतिहास (या विषयात डॉक्टरेट करणाऱ्यांसाठी) | ४० हजार |
| ११. रजनी दांडेकर | कलेचा इतिहास : बॉम्बे स्कूल | ३० हजार |


लोकसत्ता Sat, 11 January 2020
https://epaper.loksatta.com/c/47872909


# पुणे येथे अध्यापक विकास संस्था

## राज्य मंत्रिमंडळाची मंजुरी; शिक्षण पद्धतीमधील बदलांचा वेध

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**मुंबई :** राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर होत असलेल्या आधुनिक शिक्षण पद्धतीतील बदल लक्षात घेऊन अध्यापक व प्राचार्यांच्या प्रशिक्षणासाठी कंपनी कायद्यानुसार पुणे येथेअध्यापक विकास संस्था स्थापन करण्यास राज्य मंत्रिमंडळाने बुधवारी मंजुरी दिली. त्यात राज्य शासनाचा आर्थिक हिस्सा ४० टक्के, विद्यापीठांचा ४० टक्के, तंत्रशिक्षण मंडळाचा पाच टक्के, शैक्षणिक संस्था व उद्योगांचा हिस्सा पाच टक्के तसेच स्वयंसेवी व व्यवसाय संस्थांचा हिस्सा १० टक्के राहणार आहे.

उद्योग समूहांकडून मिळणाऱ्या देणगीतून निधी तयार करण्यात येईल. संस्थेचे कामकाज चालविण्यासाठी मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली प्रशासकीय समिती स्थापन करण्यात येणार आहे.

शिक्षक-प्राध्यापकांना उद्योग क्षेत्रातील अद्ययावत ज्ञान देणे, त्यानुसार विद्यार्थ्यांना देणाऱ्या प्रशिक्षण पद्धतीत बदल करणे, रोजगार संधीनुसार नावीन्यपूर्ण अभ्यासक्रम विकसित करणे आदी संस्थेची उद्दिष्टे आहेत.

### तंत्रशास्त्र विद्यापीठ, रसायन तंत्रज्ञान संस्थेतील शिक्षकांना सातवा वेतन आयोग

अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने केलेल्या शिफारशीनुसार शासकीय व अशासकीय अनुदानित पदवी व पदविका संस्था, रसायन तंत्रज्ञान संस्था, शासनाचे माटुंगा येथील अभिमत विद्यापीठ, लोणेरे येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ येथील शिक्षक व समकक्ष पदांवर कार्यरत कर्मचाऱ्यांना सातव्या वेतन आयोगानुसार सुधारित वेतनश्रेणी लागू करण्याच्या निर्णयास राज्य मंत्रिमंडळाने मान्यता दिली.

### पीएचडीधारक अधिव्याख्यात्यांना १९९६ पासून दोन वेतनवाढी

राज्यातील अकृषी विद्यापीठे व अनुदानित महाविद्यालयांमधील ज्या अधिव्याख्यात्यांनी १ जानेवारी १९९६ पूर्वी पीएचडी पूर्ण केली आहे, त्यांना २७ जुलै १९९८ ऐवजी १ जानेवारी १९९६ पासून दोन आगाऊ वेतनवाढी देण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे.




लोकसत्ता Thu, 30 January 2020
https://epaper.loksatta.com/c/48469952

नवराष्ट्र

धक्कादायक प्रकार उघड

# 'ती' बस टॉयलेटमध्ये खाद्यपदार्थ विक्री

पुणे : 'ती' बस टॉयलेटमध्ये खाद्यपदार्थ विक्रीही होत असल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला. या प्रकाराची दखल घेत महीला व बाल कल्याण समितीच्या अध्यक्षांनी तक्रार केल्याने प्रशासनाने संबंधित ठेकेदाराला खाद्यपदार्थ विक्री बंद करण्याचे आदेश दिले आहे. महापालिकेने महीलांना सार्वजनिक स्वच्छतेची सुविधा पुरविण्यासाठी दहा 'ती' बस टॉयलेट ही सेवा सुरू केली होती. या टॉयलेटची दैनंदिन देखभाल दुरुस्ती करण्यासाठी साराप्लास्ट इंटरप्रायजेस या कंपनीकडे (ठेकेदार) सोपविण्यात आली होती. त्या कंपनीला या बसच्या अर्ध्या भागात महीलांना आवश्यक वस्तुंची विक्री करण्याचे दालन सुरू करण्यासाठी परवानगी देण्यात आली होती. तसेच जाहीरात करण्यास मान्यता दिली होती. परंतु, या बसमध्ये खाद्यपदार्थांची विक्री केली जात असल्याचा धक्कादायक प्रकार काही नगरसेवकांच्या लक्षात आला होता.

महीला व बाल कल्याण समितीच्या अध्यक्षा ज्योत्स्ना एकबोटे यांनी हा प्रकार पाहीला होता. त्यांनी याबाबत तातडीने बैठक बोलाविली. याबैठकीनंतर घनकचरा व्यवस्थापन विभागाचे प्रमुख ज्ञानेश्वर मोळक यांनी संबंधित ठेकेदाराला खाद्यपदार्थ विक्री बंद करण्याचे आदेश दिले.याविषयी एकबोटे म्हणाल्या, स्वच्छतागृहाच्या ठिकाणीच वडापावसारखे खाद्य पदार्थ तयार करून ते विक्री केले जात असल्याचा हा प्रकार गंभीर आहे. या ठेकेदाराला खाद्यपदार्थ विक्री करण्याची परवानगी कोणी दिली. त्याने अन्न व औषध प्रशासनाची परवानगी, महापालिकेच्या आरोग्य विभागाची परवानगी घेतली होती का? याची चौकशी झाली पाहीजे.

नवराष्ट्र

7-1-2020

# News Paper Clippings During January 2020

## Section : Work of Appreciation

सकाळ

# पालिकेच्या वडापावचा पचका

## 'ती' स्वच्छतागृहांतील खाद्यपदार्थांचे स्टॉल बंद

**पुणे, ता. ६ : महिलांसाठीच्या 'ती' स्वच्छतागृहांत थाटलेली वडापावची दुकाने महापालिकेने सोमवारी बंद केली. त्याआधी महिला पदाधिकाऱ्यांनी जागेवर जाऊन स्टॉलला टाळे ठोकण्यास ठेकेदाराला भाग पाडले.**

सकाळ IMPACT

महिलांसाठी 'पीएमपी'च्या जुन्या बसगाड्यांत 'ती' टॉयलेट योजना अमलात आणली. या स्वच्छतागृहांच्या देखभालीचा खर्च परवडत नसल्याने बसमधील निम्म्या जागेत 'कमर्शिअल ॲक्टिव्हिटी'ला परवानगी देण्याची मागणी ठेकेदाराने महापालिकेकडे केली. ती मंजूर होण्याआधीच 'ती' स्वच्छतागृहांत अशा प्रकारचे स्टॉल थाटले होते. महिलांसाठी पुरेशी स्वच्छतागृहे न पुरविणाऱ्या पालिकेने खाद्यपदार्थांच्या स्टॉलकडे काणाडोळा करून महिलांची अडचण केल्याचे स्पष्ट झाले. या संदर्भात 'सकाळ'ने वृत्त प्रसिद्ध केले होते. सोमवारी महिला व बालकल्याण समितीच्या अध्यक्ष डॉ. ज्योत्स्ना एकबोटे, डॉ. श्रद्धा प्रभुणे, स्वप्नाली सायकर, नीता दांगट, मंगला मंत्री, सुजाता शेट्टी यांनी स्टॉलची पाहणी केली.

#ToiletIssue

### अशी दिली परवानगी

स्वच्छतागृहांची उभारणी केलेल्या बसगाड्यांत अशा प्रकारे खाद्यपदार्थ विकता येणार नाहीत. त्यामुळे परवाने दिले जाणार नाहीत, असे अन्न व औषध प्रशासन विभागाने स्पष्ट केले होते. मात्र, सरकारमधील काही वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या माध्यमातून ही परवानगी घेण्यात आल्याचे सूत्रांनी सांगितले.




### महिलांबरोबरच खाणाऱ्यांच्या आरोग्याशी खेळ

स्वच्छतागृह आणि खाद्यपदार्थांच्या स्टॉलमध्ये एकाच दारातून महिला, स्टॉलधारकांकडील कामगार ये-जा करीत असल्याचे दिसून आले. त्याचा परिणाम म्हणजे, महिला या स्वच्छतागृहाचा वापर करीत नसल्याचे उघड झाले. शिवाय, याच ठिकाणी खाद्यपदार्थ तयार करण्यात येत होते. त्यामुळे महापालिकेने महिलांसोबत खाद्यपदार्थ खरेदी करणाऱ्यांच्या आरोग्याचा खेळ केला, अशी प्रतिक्रिया नगरसेविका मनीषा लडकत आणि आरती कोंढरे यांची आहे.

**स्वच्छतागृहांमधील खाद्यपदार्थांचे स्टॉल बंद करण्याचा आदेश दिला आहे. त्यावर कार्यवाही झाली असून, सर्व दुकाने बंद केली आहेत.**
- **ज्ञानेश्वर मोळक,** सहआयुक्त, महापालिका

**या स्वच्छतागृहांवर जाहिरातींचे फलक लावत आहोत, असे भासवून हे स्टॉल सुरू केले होते. त्यामुळे महिलांना स्वच्छतागृहात जाता येत नव्हते. मुळात, या योजनेला परवानगी कोणी दिली त्याचा खुलासा अधिकारी करीत नाहीत.**
- **डॉ. ज्योत्स्ना एकबोटे,** अध्यक्षा, महिला व बालकल्याण समिती

Pune, Pune-Today
07/01/2020 Page No. 1

# News Paper Clippings During January 2020

## Section : Work of Appreciation

# बागांमध्ये 'लिट्ल लायब्ररी'

## मुलांचे मोबाईलवेड रोखण्यासाठी सहा ठिकाणी उपक्रम

**पुणे, ता. १ : शाळा सुटली अन् घर गाठलं की मुलं मोबाईलमध्ये रमतात. गेम खेळताना पुढचं जेवणाचं ताट लगेच बाजूला होतं, काही जणांना मोबाईलशिवाय जेवणही नको असतं. नाइलाजानं आपण त्यांच्या हातात मोबाईल ठेवतो. त्यामुळे खेळणं, बागडणं हे सारं मोबाईलविश्वानं हिरावून नेलंय. मात्र, चिमुरड्यांना मोबाईलपासून लांब ठेवण्याकरिता पुण्यातील बागांमध्ये 'लिट्ल लायब्ररी' उभारली जाणार आहे. तिथं ना आई-बाबांकडं मोबाईल असेल, ना मुलांकडं!**

चिमुरड्यांनो, या बागेत तुम्हाला खूप सारी खेळणी, गोष्टींची पुस्तकं, प्राणी-पक्ष्यांच्या संग्रहालयाचा आनंद घेता येईल.

आणखी एक गंमत म्हणजे, बागेत मोबाईलशिवाय दीड-दोन तास मनसोक्त खेळल्यानंतर घरी जाताना तुम्हाला छान 'गिफ्ट व्हाउचर'ही मिळणार आहे. महापालिकेच्या बागांमध्ये हा उपक्रम सुरू होणार असून, शहरातील सहा भागांत पुढच्या महिनाभरात 'लिट्ल लायब्ररी' सुरू होईल. तिथं मोबाईल आणण्याला बंदी राहणार आहे. अशा उपक्रमासाठी महापालिकेच्या महिला व बालकल्याण समितीने पुढाकार घेतला आहे.

घर, बाग, चित्रपटगृहांत, जिथं कुठं जावं तिथं मुलांना मोबाईल हवाच असतो. परिणामी, मुलं मोबाईलमध्ये डोकं घालून बसलेली दिसतात. बहुतांश मुलं 'गेम'ची 'अ‍ॅडिक्ट' होतात. अशा मुलांना वाचन, मैदानी खेळ आणि प्राणी-पक्ष्यांशी जोडून त्यांना मोबाईलपासून दूर ठेवण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे. या उपक्रमाला महिला व बालकल्याण समितीची मंजुरी मिळाली आहे.

### काय काय असणार बागेत?

बागांमधील लहान मुलांची खेळणी असलेल्या विभागात ही 'लिट्ल लायब्ररी' सुरू होईल. खास मुला-मुलींसाठी छोट्या टेबल-खुर्च्यांची सोय असेल. ज्यावर वेगवेगळी चित्रे रेखाटलेली असतील, त्यामुळे मुलांमध्ये लायब्ररीबाबत उत्सुकता वाढेल. त्याशिवाय, मोकळ्या जागेत बसूनही मुलांना पुस्तके चाळता येणार आहेत. तर, मैदानी क्रीडाप्रकारांची प्रात्यक्षिके पाहून सरावाची संधीही तिथे उपलब्ध राहील. त्याचवेळी 'जंगल सफारी'सारखा फील यावा, यासाठी प्राणी-पक्ष्यांचे छोटेखानी संग्रहालयही असेल.

#LittleLibrary




**मोबाईलच्या अतिवापरामुळे लहान मुलांच्या वागण्या-बोलण्यावर परिणाम होत आहे. दुसरीकडे, आई-वडीलही मोबाईलमध्ये तितकाच वेळ घालवतात. तेव्हा एकमेकांना वेळ देता यावा आणि मुले पुस्तकांकडे वळावीत, यासाठी लिट्ल लायब्ररी सुरू करणार आहोत.**

- **डॉ. ज्योत्स्ना एकबोटे**, अध्यक्ष,
महिला व बालकल्याण समिती, महापालिका

**सकाळ**

**2-1-2020**

# News Paper Clippings During January 2020

## Section : Work of Appreciation

**लोकमत**

### एव्हिएशन गॅलरीची आयुक्तांकडून पाहणी

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे** : देशातील पहिल्या 'एव्हिएशन गॅलरी'सह सिटी लायब्ररी प्रकल्पाच्या जागेची पुणे महापालिकेचे आयुक्त शेखर गायकवाड यांनी पाहणी केली. गायकवाड येत्या काही दिवसात विविध प्रकल्पांना भेटी देणार असून एव्हिएशन गॅलरी पूर्णत्वास आलेली असून हा एक देखणा प्रकल्प साकारल्याची प्रतिक्रिया गायकवाड यांनी यावेळी दिली.

शिवाजीनगरसह शहरातील विविध महाविद्यालये, शाळा ८ आंतरराष्ट्रीय शिक्षण संस्थांमधील विद्यार्थ्यांच्या अभ्यासाकरिता आवश्यक असलेली जागा उपलब्ध करुन दिली आहे. या जागेवर 'सिटी लायब्ररी' उभारणार असल्याचे नगरसेविका तथा महिला व बालकल्याण समितीच्या अध्यक्षा ज्योत्स्ना एकबोटे यांनी सांगितले. महापालिकेची अशा प्रकारची पहिलीच लायब्ररी असल्याचे एकबोटे यांनी सांगितले. एव्हिएशन गॅलरीच्या माध्यमातून हवाई वाहतूक क्षेत्रातील करिअरच्या संधींची माहिती पुणेकरांसोबतच शाळा-महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांना मिळेल.

Hello Pune
Page No. 3 Jan 31, 2020
Powered by: erelego.com

**नवराष्ट्र**

### आयुक्तांनी केली सिटी लायब्ररीच्या जागेची पाहाणी

ज्योत्स्ना एकबोटे, अध्यक्ष, महिला व बाल कल्याण समिती

**पुणे** : घोले रस्त्यावरील मामाराव दाते मुद्रणालयाच्या जागेवर देशातील पहिल्या सिटी लायब्ररी उभारण्यात येणार आहे. आज महापालिका आयुक्त शेखर गायकवाड आणि अन्य अधीकाऱ्यांनी मुद्रणालयाच्या जागेसोबतच शिवाजीनगरमधील एव्हिएशन गॅलरीची पाहाणी केली, अशी माहिती महिला बाल कल्याण समितीच्या अध्यक्षा ज्योत्स्ना एकबोटे यांनी दिली. महापालिका आयुक्त शेखर गायकवाड, अतिरिक्त आयुक्त रूबल अग्रवाल, शहर अभियंता प्रशांत वाघमारे, भवन विभागाचे कार्यकारी अभियंता शिवाजी लंके, उपअभियंता उपेंद्र वैद्य, कनिष्ठ अभियंता सुनील पोपळ यांच्या पथकाने महापालिकेच्या प्रकल्पांना भेट दिली.



■ पथकाने महापालिकेच्या प्रकल्पांना भेट दिली

■ मुद्रणालयाच्या जागेवर लायब्ररी उभारण्यात येणार

#### एव्हिएशन गॅलरीचा समावेश

शिवाजीनगर गावठाणामध्ये हवाई वाहतूक क्षेत्रातील करिअरच्या दृष्टीने शाळा महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना माहिती देण्यासाठी उभारण्यात आलेल्या एव्हिएशन गॅलरीचा समावेश आहे. लवकरच या गॅलरीचे उदघाटन करण्यात येणार आहे. यासोबतच शैक्षणिक हब म्हणून ओळखल्या जाणाऱ्या शिवाजीनगर मतदार संघामध्ये विविध महाविद्यालये, शाळा आणि आंतरराष्ट्रीय शिक्षण संस्थांमध्ये अनेक विद्यार्थी येथे शिक्षण घेत आहेत. याच विद्यार्थ्यांच्या अभ्यासाकरिता आवश्यक असलेली जागा उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने सिटी लायब्ररी निर्माण करण्यात येणार आहे. यासाठी घोले रस्त्यावरील पालिकेच्या मामाराव दाते मुद्रणालयाची जागा सुचविण्यात आली आहे. मामाराव दाते मुद्रणालयात जुन्या तंत्रज्ञानानुसार प्रिंटींग केले जाते. बदलत्या काळासोबतच येथील प्रिंटींग तंत्रज्ञानामध्ये बदल करण्याबाबतही यावेळी चर्चा झाली, असेही एकबोटे यांनी नमूद केले.

Pune Plus Edition
Jan 31, 2020 Page No. 1

# News Paper Clippings During January 2020

## Section : Research

# खेकड्याच्या नव्या प्रजातीचा शोध

## 'ब्राझिलियन जर्नल'मध्ये खेकड्याची नोंद, खारफुटी वनस्पतीवर खेकड्याची उपजीविका

शिवाजी खांडेकर लोकसत्ता

**पिंपरी :** महाराष्ट्राच्या पश्चिमेकडे समुद्राच्या किनारपट्टीवर खेकड्याची नवीन प्रजाती आढळून आली आहे. गणपतीपुळे आणि रत्नागिरी येथील समुद्रकिनारपट्टीवरील खारफुटी वनस्पतीवर हा खेकडा वास्तव्य करुन उपजीविका करतो, असे संशोधन आकुर्डी येथील भारतीय प्राणी सर्वेक्षण विभागातील शास्त्रज्ञाने केले आहे. या खेकड्याची नोंद आंतरराष्ट्रीय 'ब्राझिलियन जर्नल'मध्ये झाली आहे.




आकुर्डी, रावेत प्राधिकरण येथे भारतीय प्राणी सर्वेक्षण विभागाचे पश्चिम प्रादेशिक कार्यालय आहे. या कार्यालयामध्ये गोवा, कर्नाटक, गुजरात, दीव दमण यासह इतर राज्यांतील नवीन प्रजातीच्या प्राण्यांचे संशोधन केले जाते. या कार्यालयातील शास्त्रज्ञांनी हजारो नवीन प्रजातींचा शोध लावला आहे. येथे कार्यरत असलेले प्राणिशास्त्रज्ञ डॉ. समीर कुमार पति यांनी अशाच एका खेकड्याच्या प्रजातीवर संशोधन केले आहे. या खेकडा प्रजातीचे वैज्ञानिक नाव 'पॅरासेसीमा वेंगालेनसे' असे आहे. खेकड्याची ही नवीन प्रजाती केरळ तसेच महाराष्ट्राच्या पश्चिम समुद्र किनारपट्टीवर आढळून येते. पश्चिम किनारपट्टीवर खेकड्याच्या एकूण ४६५ प्रजाती आढळून येतात.

### तेजस ठाकरे यांच्याकडून १३ नवीन प्रजातींचा शोध

मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांचे पुत्र आणि पर्यावरणमंत्री आदित्य ठाकरे यांचे बंधू तेजस ठाकरे यांना खेकड्यांच्या नवीन प्रजातींचा शोध लावण्याचा छंद आहे. नवीन प्रजाती आढळल्यानंतर तेजस ठाकरे आकुर्डी येथील प्राणी सर्वेक्षण विभागातील शास्त्रज्ञाकडे संशोधनासाठी देतात. वर्षातून दोन ते तीन वेळा आकुर्डी येथील कार्यालयात त्यांना आढळलेल्या नवीन प्रजाती संशोधनासाठी घेऊन येतात. २०१८ मध्ये त्यांनी दक्षिण पश्चिम किनारपट्टीवर आढळलेल्या खेकड्याच्या १३ नवीन प्रजातींचा शोध लावला होता. संशोधन केल्यानंतर त्या खेकड्यांना 'पति-ठाकरे' असे नाव देण्यात आले आहे.

लोकसत्ता Fri, 17 January 2020
https://epaper.loksatta.com/c/48037514

लोकमत

# सातपुड्यात आढळली 'मोठी पान लवंग' वनस्पती

## महाराष्ट्रात पहिल्यांदाच झाली नोंद : डॉ. तन्वीर खान यांना श्रेय

अजय पाटील | लोकमत न्यूज नेटवर्क

जळगाव : जैव विविधतेने समृद्ध सातपुडा पर्वतरांगेत अत्यंत दुर्मीळ असलेल्या 'मोठी पान लवंग' (लुडविगीया पेरुवियाना) या वनस्पतीची नोंद झाली आहे.





> सातपुडा भागात स्वदेशी व विदेशी पक्ष्यांप्रमाणे वनस्पती देखील आढळून येतात. सातपुड्यात मोठ्या प्रमाणात जैवविविधता उपलब्ध आहे. अशा प्रकारच्या दुर्मीळ वनस्पतींचा ऱ्हास होणार नाही याची शासन व वनविभागाने खबरदारी घ्यायला हवी. राज्यात पहिल्यांदाच या वनस्पतीची नोंद झाली आहे.
>
> \- डॉ. तन्वीर खान, वनस्पती अभ्यासक, जळगाव.

लोकमत पर्यावरणोत्सव

जळगावच्या इकरा एच. जे. थीम महाविद्यालयाचे प्रा. डॉ. तन्वीर खान यांनी या वनस्पतीची नोंद केली आहे. या दुर्मीळ वनस्पतीची महाराष्ट्रात पहिल्यांदाच नोंद झाल्याचा दावा त्यांनी केला आहे. तीन महिन्यांपूर्वी त्यांनी सातपुड्यातच 'दुपर्णी चिरायता' या वनस्पतीची नोंद केली होती.

'मोठी पान लवंग' या वनस्पतीचे शास्त्रीय नाव लुडविगीया पेरुवियाना असे आहे. जगात या वनस्पतीच्या ८२ तर भारतामध्ये ७ प्रजाती आढळतात. या वनस्पतीला पिवळ्या रंगाचे मोठे फुल असते. याची पाने लंबवर्तुळाकृती तर उंची साधारणपणे २ ते ३ मीटर इतकी असते. नदीकाठच्या आर्द्रयुक्त दलदलीच्या जागेवर ही वनस्पती आढळून येते. या वनस्पतीची भारतात सर्वप्रथम नोंद १९५७ मध्ये चेन्नईमध्ये डॉ. फिचर यांनी केली. त्यानंतर डॉ. नायर यांनी १९७८ मध्ये केरळ व डॉ. बरवा यांनी १९९३ मध्ये आसाम या ठिकाणी या वनस्पतीची नोंद केली होती. डॉ. तन्वीर खान यांनी सातपुड्यातील दलदलयुक्त भागात या वनस्पतीची नोंद केली आहे. डॉ.खान यांनी तयार केलेला शोधनिबंध 'इंडियन फॉरेस्टर' या विज्ञान पत्रिकेला पाठविला असून, तो लवकरच प्रसिद्ध होणार आहे.

Pune Main
Page No. 5 Jan 21, 2020
Powered by: erelego.com

# News Paper Clippings During January 2020

## Section : Research

सकाळ

# सूर्यापेक्षाही प्राचीन पदार्थाचा शोध

**वॉशिंग्टन, ता. १४ :** आपल्या सूर्यमालेतील सर्व ग्रहांची निर्मिती सूर्यापासून झाल्याचा सिद्धांत खगोलशास्त्रज्ञ मांडतात. पण, शास्त्रज्ञांना पृथ्वीवर असा पदार्थ सापडला आहे, की जो आपल्या सूर्यापेक्षाही काही अब्ज वर्षांनी जुना आहे. ऑस्ट्रेलियामध्ये पन्नास वर्षांपूर्वी उल्कापातात मिळालेल्या 'स्टारडस्ट'मधील हा पदार्थ सुमारे साडेपाच अब्ज वर्षांपूर्वीचा असल्याचे शास्त्रज्ञांनी सांगितले.

सूर्यमालानिर्मितीच्या आजवर सिद्धांतावर या संशोधनामुळे नवा प्रकाश पडणार आहे. अमेरिकेच्या नॅशनल ॲकॅडमी ऑफ सायन्सेसच्या (पीएएनएस) शोधपत्रिकेत यासंबंधीचा शोधनिबंध नुकताच प्रकाशित झाला आहे. तारानिर्मितीच्या सुरुवातीच्या काळातील ही 'स्टारडस्ट' एकसारख्या वेगाने, स्थिर पद्धतीत ताऱ्यामध्ये निर्मिती झाल्याचे संशोधनातून पुढे आले आहे.

शिकागो विद्यापीठाचे सहायक प्राध्यापक आणि फिल्ड संग्रहालयाचे संस्थापक डॉ. फिलिप्स हिक म्हणतात, "आजपर्यंत सापडलेला सर्वांत प्राचीन असलेला हा पदार्थ आपल्या आकाशगंगेतील तारानिर्मितीच्या प्रक्रियेवर प्रकाश टाकेल. सूर्यनिर्मितीपूर्वी अस्तित्वात असलेले 'प्रीसोलार ग्रेन' या पदार्थात सापडले आहे. त्यामुळे खऱ्या अर्थाने ही 'स्टारडस्ट' अतिप्राचीन आहे." अमेरिकेच्या फिल्ड संग्रहालयात हा पदार्थ संग्रहित ठेवण्यात आला आहे.


उल्का

**प्रीसोलार ग्रेनचे वय काढून हे संशोधन थांबणार नाही. ताऱ्यांच्या निर्मितीचा इतिहास अशा प्रकारच्या दुर्मीळ स्टारडस्टमुळे उलगडणार आहे. कारण तारा मृत पावल्यानंतरच अशा प्रकारची स्टारडस्ट बाहेर पडते. ब्रह्मांडात सात अब्ज वर्षांपूर्वी तारानिर्मितीची आलेली लाट या संशोधनामुळे उलगडणार आहे.**

– **प्रा. फिलिप्स हिक,** शिकागो विद्यापीठ

### उल्केच्या पोटात सुरक्षित 'स्टारडस्ट'

- तारानिर्मितीच्या वेळेची ही स्टारडस्ट 'उल्के'च्या पोटात.
- उल्केच्या अंतर्भागात असल्यामुळे कोट्यवधी वर्षांपासून सुरक्षित, कोणत्याही ब्रह्मांडीय घटकांचा परिणाम नाही
- उल्केच्या एकूण वजनाच्या पाच टक्के असलेल्या 'स्टारडस्ट'मध्ये सापडले 'प्रीसोलार ग्रेन'
- हे 'प्रीसोलार ग्रेन' कोणत्या प्रकारच्या ताऱ्यातील आहे, याचा शोध घेण्यात आला.
- वैश्विक किरणांच्या साह्याने स्टारडस्टचे वय निश्चित करण्यात आले.
- ४.६ ते ५.५ अब्ज वर्षांचे प्रीसोलार ग्रेन या स्टारडस्टमध्ये सापडले.
- सूर्याचे वय ४.६ अब्ज वर्षे आणि पृथ्वीचे वय ४.५ अब्ज वर्षे आहे.

Pune, Main
15/01/2020 Page No. 1

लोकमत

संग्रहालयाचे सहायक अभिरक्षक अमोल गोटे : तेर येथील संग्रहालयाच्या नवीन इमारतीचे काम प्रगतिपथावर

# 'तेर'चे संशोधन सूत्रबद्ध पद्धतीने पुढे जावे

तेरचे प्राचीन नाव तगर असे होते. कझिन्स या ब्रिटिश अधिकाऱ्याच्या माध्यमातून तेरची संशोधनाची दारे खऱ्या अर्थाने खुली झाली. तेर हे व्यापारी मार्गावरील महत्त्वाचे केंद्र होते. तेरच्या आजवरच्या उत्खननामध्ये बौद्धकालीन स्तूप, हस्तिदंताच्या बाहुल्या अशा अनेक वस्तू मिळाल्या आहेत. तेर गावचे रहिवासी रामलिंगप्पा लामतुरे, त्यांचे चिरंजीव भागवतप्पा आणि नातू श्री रेवणसिद्ध यांनी पुरातन वस्तूंच्या केलेल्या अद्वितीय संग्रहामुळे तेरची ओळख ठळक झाली आहे. तेरमधील संशोधन सूत्रबद्ध पद्धतीने पुढे जाणे आवश्यक आहे, अशी भावना तेर येथील संग्रहालयाचे सहायक अभिरक्षक अमोल गोटे यांनी व्यक्त केली.

विशेष मुलाखत

प्रज्ञा केळकर-सिंग



**शालेय स्तरावर पुरातत्त्वशास्त्राच्या दृष्टीने महत्त्व कशा रीतीने पटवून देता येईल?**

◆ शालेय जीवनापासूनच मुलांना इतिहास, उत्खनन याबद्दल कुतूहल असते. त्यांच्या या वृत्तीला छोट्या छोट्या अभ्यासक्रमांमधून खतपाणी घालता येईल. संस्कृती संवर्धनाच्या दृष्टीने असे अभ्यासक्रम सुरु करण्यासाठी शासनस्तरावरुन प्रयत्न होणे गरजेचे आहे. यासाठी शासनातर्फे काही उपक्रम हाती घेतले जात आहेत. मुंबईतील छत्रपती शिवाजी महाराज वस्तूसंग्रहालयाच्या संयुक्त विद्यमाने 'फिरते संग्रहालय' हा उपक्रम हाती घेण्यात आला. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना सर्वत्र पोहोचणे शक्य नसते. त्यांना विविध वस्तू पाहायला मिळाव्यात, यासाठी 'फिरते संग्रहालय' उपयुक्त ठरते. वर्गामध्ये मुले जे शिकतात, ते ज्ञान प्रात्यक्षिकातून मिळाल्यास त्यांच्या ज्ञानात भर पडते. संस्कृतीरक्षणाच्या, वारसा जतनाच्या दृष्टीने ही मोठी बाब ठरणार आहे.

**पुरातत्त्वशास्त्राचे सध्याच्या काळातील महत्त्व काय?**

- इतिहास संशोधनामध्ये प्रामुख्याने लिखित गोष्टींचा आधार घेतला जातो. लिखित पुरावे नसलेल्या बिंदूपासून पुरातत्त्वशास्त्राचे काम खऱ्या अर्थाने सुरू होते. शास्त्रीय पद्धतीने, तसेच इतर अनेक शास्त्रांचा आधार घेत पुरातत्त्वशास्त्र पुढे जाते. आर्य व अनार्य हा वाद आपल्याकडे बऱ्याच काळापासून चालत आला आहे. त्याबाबत वसंत शिंदे यांनी मोठ्या प्रमाणावर संशोधन केले आहे. यापुढेही संशोधन अविरतपणे सुरूच राहील. वेगाने विकसित होणारे तंत्रज्ञान पुरातत्त्व शास्त्रासाठी वरदान ठरत आहे. विविध साधनांचा वापर करून उत्खनन करणे, संशोधन करणे, निष्कर्ष काढणे आणि त्याला शास्त्राची जोड देणे यातून पुरातत्त्वशास्त्राची बैठक बसते. राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर त्याची शास्त्रीय पद्धतीने मांडणी केली जाते आणि त्यातून इतिहासातील नवे संदर्भ मिळत जातात.

**शासनाच्या पुरातत्त्व विभागातर्फे इतिहासाच्या जतन आणि संवर्धनासाठी काय प्रयत्न केले जात आहेत?**

- गेल्या काही काळापासून शासनाकडून पुरातत्त्वशास्त्राकडे गांभीर्याने पाहिले जात आहे. संचालक तेजस गर्गे यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष प्राधान्यक्रम ठरवून देण्यात आला आहे. त्यात संशोधनाबरोबरच पर्यटनवाढ, प्रत्येक वस्तूचे योग्य महत्व अधोरेखित करणे, तांत्रिक अडथळे दूर करून उपलब्ध साधनांमध्ये हा वारसा जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न केला जात आहे. तेर येथील संग्रहालयाच्या इमारतीसाठी शासनाने १५ कोटी ६८ लाख रुपयांची मान्यता दिली आहे. इमारतीचे काम वेगाने सुरु असून, दोन वर्षांमध्ये काम पूर्णत्वास जाईल.

**सामान्यांमध्ये इतिहास, पुरातत्त्वशास्त्राच्या साक्षरतेबद्दल, जनजागृतीबद्दल कोणत्या स्वरूपाचे प्रयत्न आवश्यक आहेत?**

- शासनातर्फे संग्रहालयांसाठी मार्गदर्शन तत्त्वे तयार करण्यात आली आहेत. त्यानुसार, वर्षभरात विविध उपक्रम, कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. जागतिक संग्रहालय दिन, जागतिक वारसा सप्ताह अशा दिवसांच्या अनुषंगाने जनजागृती केली जात आहे. लोकांना महत्त्व समजून सांगण्यासाठी विविध प्रदर्शनांचे आयोजन केले जाते. त्यातून स्थानिक इतिहास उलगडत जातो आणि आर्थिक विकासाच्या दिशेने पावले टाकली जातात.

**संशोधन कोणत्या पातळीवर आहे?**

- तेरमध्ये यापूर्वी ८ वेळा उत्खनन झाले आहे. २०१४-१५ मध्ये डॉ. माया पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली शेयटचे उत्खनन झाले. त्याचा अहवाल अंतिम टप्प्यात आहे. आयसीएचआरची फेलोशिप डॉ. पाटील यांना मिळाली असून, त्यांचा तेरमध्ये प्रकल्प सुरु आहे. तेरचे दस्तावेजीकरण आणि कालक्रम यांचा अभ्यास होणार आहे. संग्रहालयातील वस्तूंचे महत्त्व लोकांपर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न आहे.

Pune Main
Page No. 2 Jan 20, 2020
Powered by: erelego.com

# News Paper Clippings During January 2020

## Section : Miscellaneous

# 'सीएए नागरिकांच्या रक्षणासाठी'

पुणे : 'सीएए हा भारतातील लोकांना नागरिकत्व देणारा कायदा असुन, नागरिकांच्या रक्षणासाठी आहे,' असे मत प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीच्या सहकार्यवाह प्रा. ज्योत्स्ना एकबोटे यांनी व्यक्त केले.

प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीच्या वतीने आयोजित गुरुवर्य शंकरराव कानिटकर स्मृती व्याख्यानमालेत 'नागरिकत्व सुधारणा कायदा' (सीएए) या विषयावर नुकतेच व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाला सोसायटीचे कार्याध्यक्ष डॉ. गजानन र. एकबोटे, उपकार्याध्यक्ष डॉ. अरविंद पांडे उपस्थित होते.



प्रा. ज्योत्स्ना एकबोटे

'फाळणी धार्मिक तत्वांवर झालेली होती. पाकिस्तानातील हिंदूंचा अतोनात छळ झाला. मात्र, पाकिस्तानातून भारतात स्थलांतरित झालेल्या नागरिकांना या देशाने सन्मानाने वागविले आहे. भारत देश सहिष्णू व सर्वधर्मसमभाव मानणारा आहे. त्यामुळे हा कायदा भारतीय नागरिकांचे रक्षण करण्यासाठी आहे. या कायद्याबद्दलचे गैरसमज निर्माण करण्यात आले आहेत. हा देश धर्मशाळा नाही. देशात आपले कोण आणि परकीय कोण हे आपल्याला समजले पाहिजे,' असे प्रा. एकबोटे यांनी सांगितले.

मॉडर्न अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. कल्याणी जोशी यांनी प्रास्ताविक केले. व्याख्यान संपल्यानंतर हा कायदा अस्तित्वात असावा की नाही, याबाबत मतदान घेण्यात आले. उपस्थितांपैकी ९६ टक्के लोकांनी या कायद्याच्या बाजूने कल दिला. सोसायटीचे कार्यवाह प्रा. श्यामकांत देशमुख यांनी सूत्रसंचालन केले. या कायद्यासंदर्भात गैरसमज दूर व्हावेत, म्हणून या विषयाची निवड केली, असे डॉ. गजानन एकबोटे यांनी सांगितले.

**महाराष्ट्र टाइम्स**

**30-1-2020**

# News Paper Clippings During January 2020

## Section : Miscellaneous

पुढारी



सुमेधा चिथडे यांच्यासह वीरमाता आणि वीरपत्नींना मातृगौरव पुरस्कार प्रदान करण्यात आला.

# सैनिक हेच खरे हीरो

## सुमेधा चिथडे यांची भावना

**पुणे : प्रतिनिधी**

आपण आपल्या छोट्या छोट्या दु:खाना कुरवाळत बसतो; परंतु आपले सैनिक मात्र वैयक्तिक दु:ख विसरून देशासाठी सर्वस्व पणाला लावत असतात. त्यामुळे सैनिक हेच समाजाचे खरे हीरो असून, त्यांच्या शौर्यगाथा तरुणांपर्यंत पोहोचायला हव्यात, अशी भावना सैनिकांसाठी भारत-चीन सीमेवर ऑक्सिजन प्लांट उपलब्ध करून देणाऱ्या सुमेधा चिथडे यांनी व्यक्त केले.

राजमाता जिजाऊ जयंतीनिमित्त मातृशक्ती, समस्त हिंदू आघाडी, लाल महाल उत्सव समिती, राष्ट्र सेवा समिती यांच्यातर्फे सुमेधा चिथडे यांच्यासह वीरमाता आणि वीरपत्नींना नगरसेविका प्रा. ज्योत्स्ना एकबोटे यांच्या हस्ते मातृगौरव पुरस्कार प्रदान करण्यात आले, त्यावेळी त्या बोलत होत्या. सुनंदा कोंढरे, सारिका वारुळे, प्रिती शिंदे, चारुलता काळे, दिपाली गीते, सुजाता मुंगळे, अनुराधा घोरपडे, मनिषा शेलार आदी यावेळी उपस्थित होते.

सुमेधा चिथडे म्हणाल्या, मुलांना छत्रपती शिवाजी महाराज, स्वातंत्र्यवीर सावरकर आणि देशाच्या युद्धामध्ये धारातीर्थी पडलेल्या सैनिकांच्या गोष्टी सांगितल्या पाहिजेत. जर आपण आज त्यांच्यामध्ये वीरतेचे बीज पेरले, तर भविष्यामध्ये राष्ट्र घडविणारे तरुण निर्माण होतील.

सुमेधा चिथडे यांच्यासह वीरमाता लता नायर, दगडाबाई गायकवाड, केवळाबाई गायकवाड, अनुराधा निकम, आशा जाधव, स्नेहलता सुर्वे यांना मातृगौरव पुरस्कार प्रदान करण्यात आले. पूनम कांबळे यांनी सूत्रसंचालन केले. हेमा थोरवे यांनी आभार मानले.

My Pune Edition
13 Jan, 2020 Page No. 6
Powered by : erelego.com

# News Paper Clippings During January 2020

## Section : Miscellaneous

# ज्ञानेश्वरीचा इंग्रजीत अनुवाद

## ८१ वर्षांच्या वसंत जोशींनी नऊ वर्षांच्या प्रयत्नातून साकारले 'ज्ञानेश्वरी टुडे'

**म. टा. प्रतिनिधी, पुणे**

निवृत्तीनंतर काय करायचे, कोणत्या व्यापात स्वतःला गाढून घ्यायचे, हा प्रश्न अनेकांना पडतो. मात्र, वयाचे बंधन झुगारून ८१ व्या वर्षी एका 'यंग सीनियर्स'ने चक्क ज्ञानेश्वरीचा इंग्रजीमध्ये अनुवाद केला आहे. वन विभागातून निवृत्त झालेल्या वसंत जोशी यांनी ९ वर्षे केलेल्या अथक प्रयत्नातून साकारलेले 'ज्ञानेश्वरी टुडे' हे पुस्तक उद्या, बुधवारी वाचकांच्या भेटीला येत आहे.



"ज्ञानेश्वरी टुडे' पुस्तकात ज्ञानेश्वरांच्या मूळ प्राकृत व त्र्यंबकराव चव्हाण यांच्या मराठी ओव्यांसोबत माझ्या इंग्रजी व्हर्सचा समावेश करण्यात आला आहे. भारतीय आध्यात्मिक संकल्पनांसाठी सुयोग्य पर्यायी इंग्रजी शब्दांची निवड करताना खूप खटपट करावी लागली. कारण मोक्षासारख्या संकल्पना आंग्ल संस्कृतीत अस्तित्वात नाहीत. नऊ हजार ओव्यांचा अनुवाद झाला असून, माझे अनेक वर्षांचे स्वप्न साकार होत आहे.

– वसंत जोशी, लेखक



'ज्ञानेश्वरी टुडे' पुस्तकाचे संपादन डॉ. विजय भटकर यांनी केले आहे. इंडिया इंटरनॅशनल मल्टिव्हर्सिटी प्रकाशनातर्फे भटकर यांच्या हस्ते उद्या, बुधवारी नेहरू स्टेडियम समोरील आनंद मंगल कार्यालयात दुपारी चार वाजता याचे प्रकाशन होईल. या वेळी एमआयटीचे संस्थापक डॉ. विश्वनाथ कराड आणि पं. वसंतराव गाडगीळ उपस्थित राहणार आहेत.

वसंत जोशी १९९५ मध्ये निवृत्त झाले. या दरम्यान, त्यांच्या पत्नीचे निधन झाले. पत्नीवियोगाचे दुःख असताना त्यांनी स्वतःला वाचन आणि लिखाणात गाढून घेतले. जोशी यांनी ब्रिटिश लायब्ररीत जाऊन हाताला लागेल ते पुस्तक वाचण्याचा सपाटा लावला आणि त्यातूनच ज्ञानेश्वरीचा इंग्रजीमधील रसाळ अनुवाद सिद्ध झाला. त्यांचे वनसेवेतील सहाध्यायी त्र्यंबकराव चव्हाण यांनी संत ज्ञानेश्वर महाराजांच्या अलौकिक ज्ञानेश्वरीचा 'आजची ज्ञानेश्वरी' हा अनुवाद मराठीत ओवीबद्ध स्वरूपात केला. त्याचाच अनुवाद जोशी यांनी इंग्रजीमध्ये केला आहे.

जोशी म्हणाले, 'चव्हाण यांनी अत्यंत रसाळ ओव्यातून अनुवाद केला होता. इंडिया इंटरनॅशनल मल्टिव्हर्सिटी प्रकाशनातर्फे हे पुस्तक २०११ मध्ये प्रसिद्ध होऊन त्याला वाचकांचा अभूतपूर्व प्रतिसादही मिळाला. चव्हाण यांनी मला त्यांच्या 'आजची ज्ञानेश्वरी' पुस्तकाचा इंग्रजी अनुवाद करण्यास सुचवले आणि जगण्याची नवी उमेद गवसली. वयाच्या ७२ व्या वर्षी २०१० मध्ये सुरू केलेले काम नुकतेच पूर्ण करू शकलो.'

जोशी यांनी विल्यम मोलियर यांची डिक्शनरी, एम. एन. यार्दी यांनी ज्ञानेश्वरीचे इंग्रजीमध्ये केलेले निरूपण, काही नामवंत लेखकांनी या पूर्वी केलेला गीता व ज्ञानेश्वरीचा इंग्रजी अनुवाद अभ्यासला. संत गुलाबराव महाराज यांनी रचलेल्या ज्ञानेश्वरीवर आधारित 'गुढार्थदीपीका' या ग्रंथाने त्यांना दीपस्तंभाप्रमाणे मार्गदर्शन केले. संतोष कोंढेकर यांनी सुबक मुद्रणातून पुस्तकाला आकार दिला.

**महाराष्ट्र टाइम्स**

**21/1/2020**

# ऑक्सफर्ड शब्दकोशात 'चाळ' आणि 'डब्या'चा समावेश

## नव्या जागतिक आवृत्तीत भारतातील आणखी २६ शब्दांना स्थान

**पीटीआय, नवी दिल्ली**

इंग्रजी संभाषणातील वापर आणि प्रचलित शब्द या निकषांवर जगभरातील नव्या अर्थपूर्ण शब्दांना सामावून घेणाऱ्या 'ऑक्सफर्ड लर्नर्स डिक्शनरी'मध्ये आता भारतात बोलल्या जाणाऱ्या आणखी २६ शब्दांना स्थान देण्यात आले आहे.

विशेष म्हणजे यात मराठमोळे डब्बा (जेवणाचा), चाळ (वसती) हे शब्द आणि शादी, हरताळ, आधार (आधार कार्ड) यांचा समावेश आहे.

ऑक्सफर्ड शब्दकोशाची ही अद्यायावत दहावी आवृत्ती शुक्रवारी प्रकाशित करण्यात आली. या आवृत्तीत ३८४ भारतीय (भारतीय इंग्रजी) शब्दांचा समावेश आहे. यावेळी एकूण एक हजार नव्या शब्दांना या कोशाने सामावून घेतले आहे. त्यात चॅटबॉट, फेक न्यूज आणि मायक्रोप्लास्टीक या शब्दांचा समावेश आहे.




**करंट आणि उपजिल्हा**

ऑक्सफर्ड ऑनलाईन आवृत्तीत अर्थाच्या दृष्टीने चार नवे भारतीय-इंग्रजी शब्द समाविष्ट झाले आहेत. यात करंट (वीजप्रवाह या अर्थाने), लूटर, लुटिंग आणि उपजिल्हा या शब्दांचा समावेश आहे.

'ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटी प्रेस'ने म्हटले आहे की, अनेक वर्षांपासून या शब्दकोशाने भाषेतील परिवर्तनावर तसेच तिच्या विकासावर लक्ष केंद्रीत केले आहे. नव्या आवृत्तीत वापरण्यात आलेली भाषा आणि शाब्दीक उदाहरणे ही बदलत्या काळाशी सुसंगत आणि अद्ययावत असतील, याची दक्षता आम्ही घेतली आहे.

ऑक्सफर्ड लर्नर्स डिक्शनरींचे संकेतस्थळ आणि ॲप यांच्या माध्यमातून वाचकांशी झालेल्या संवादातून ही नवी आवृत्ती साकारली आहे. या संकेतस्थळावर दृकचित्र माध्यमातून स्वाध्याय, संवाद, अभ्यास यांच्याबरोबरच अद्ययावत आय-रायटर आणि आय-स्पीकर साधनांची सुविधा आहे.

नव्या ऑनलाईन आवृत्तीमध्ये अंतर्भूत केलेल्या २६ नव्या भारतीय शब्दांपैकी २२ शब्दांना मुद्रित आवृत्तीमध्ये स्थान दिले आहे, अशी माहिती ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटी प्रेसच्या शिक्षण विभागाच्या व्यवस्थापकीय संचालिका फातिमा दादा यांनी दिली.

या शब्दकोशातील अन्य भारतीय शब्दांत, आंटि (एयूएनटीआयइ) (आन्टी- एयूएनटीवाय या इंग्रजी शब्दाचे भारतीय रूप), बस स्टॅन्ड, ट्यूब लाइट, व्हेज आणि व्हिडिओग्राफ यांचा समावेश आहे. ऑक्सफर्ड शब्दकोशाला ७७ वर्षे होत असून त्याचा श्रीगणेशा १९४२ मध्ये जपानमध्ये झाला. या कोशाचे कर्ते अल्बर्ट सिडने यांचा उद्देश हा जगभरातील भाषा अभ्यासकांना इंग्रजी वापरातील शब्दांचा अर्थ समजावा हा होता.

**लोकसत्ता**

**25/1/2020**




**मराठी विज्ञान परिषदेचे ५४ वे मराठी विज्ञान अधिवेशन १८ जानेवारीपासून रत्नागिरी येथे सुरू झाले. २० जानेवारीपर्यंत चालणाऱ्या या अधिवेशनाचे अध्यक्ष विज्ञान शिक्षणतज्ज्ञ *प्रा. हेमचंद्र प्रधान* यांच्या भाषणातील हा संपादित अंश... शालेय विज्ञान शिक्षणातील नव्या प्रवाहाची नोंद घेणारा!**

**ज्याँ पियाजे** यांनी शिक्षणातील ज्ञानरचनावादाचा पाया घातला. त्यांचा भर बालकाच्या बौद्धिक विकासप्रक्रिया वैयक्तिक स्तरावर कशा चालतात, यावर होता; तर लेव्ह वायगोत्स्की यांचा भर या विकासप्रक्रियेवर इतर व्यक्तींचा काय प्रभाव पडतो, यावर होता. शिक्षणात असे आढळून येते की, सर्व मुले- काही विशेष अक्षमतेची उदाहरणे सोडली तर- शिकू शकतात. कोणतीही शिकणारी व्यक्ती ज्ञान व आकलन स्वतःच बांधते. शिकवणे हे शिकण्याची संधी उपलब्ध करून देत असते. रेडिश या अमेरिकी भौतिक शिक्षणतज्ज्ञांनी सांगितले की, आपण ज्यातून शिकतो ते आपले सर्व अनुभव, निरीक्षणे आपण मानसिक आकृतिबंधामध्ये ग्रथित करतो. या प्रतिमानां(मॉडेल्स)द्वारे आपण भोवतालच्या गोष्टी, नवे अनुभव समजून घेतो, त्याचा अर्थ लावतो. ही प्रतिमाने ज्ञानेंद्रियांच्या संवेदनांच्या स्मृती स्वरूपात असतात; कधी अर्धवट अथवा चुकीच्या स्वरूपातही असतात. ही प्रतिमाने बांधण्याची क्रिया जन्मापासून सुरू होते. म्हणून शिकणे म्हणजे प्रतिमाने बांधणे, त्यांच्याद्वारे भोवतालच्या जगाचा अर्थ लावणे, गरजेनुसार ती सुधारणे अथवा बदलणे हे होय. विज्ञान शिक्षणाच्या बाबतीत भोवतालच्या जगाविषयी, त्यातील वस्तू, तथ्ये, आविष्कार, घटना यांविषयीची प्रतिमाने सुयोग्य असली पाहिजेत. आपल्या डोळ्यांतून निघालेला प्रकाश वस्तूवर पडल्यामुळे ती वस्तू आपल्याला दिसते, अशी चुकीची समजूत बऱ्याच विद्यार्थ्यांची असते. किंवा- भौतिकशास्त्र हे गणितासारखे नियमांना अपवाद नसल्यासारखे वाटल्याने काच वा द्रव स्फटिक या संकल्पना समजायला कठीण वाटतात. आपल्याला जे ज्ञात आहे, त्यापेक्षा थोडे पुढचे शिकणे सोपे असते. शिक्षण पायरी-पायरीने होते. मात्र काही वेळा हे पायरी-पायरीचे तत्त्व चालत नाही. आणि पहिली प्रतिमाने उपयोगी न पडता, नवीन प्रतिमाने बांधावी लागतात. याची उदाहरणे म्हणजे हातच्याची गणिते अथवा न्यूटनचा गतिशास्त्रातील पहिला नियम!

चुकीची प्रतिमाने बदलण्यासाठी त्यातून येणाऱ्या निष्कर्षातील विसंगती उघड करायला हवी. नवीन प्रतिमान सकृद्दर्शनी पटणारे व अखेर योग्य निष्कर्षाला पोहोचण्याच्या दृष्टीने उपयुक्त असले पाहिजे. विद्यार्थ्यांच्या मनातील गैरसंकल्पना दूर करण्यासाठी विविध पद्धती अवलंबिता येतात. पियाजे यांच्या मताप्रमाणे, बुद्धीचा विकास टप्प्याटप्प्याने होतो. ०-२, २-७, ७-१२ आणि १२ वर्षांच्या पुढे असे ते चार टप्पे आहेत. सुरुवातीला मुले आंतरिक प्रक्रियेने शिकतात आणि नंतर प्रौढ व्यक्तींशी होणाऱ्या आंतरक्रियेतून ती शिकतात. रचनावाद हा केवळ शिकण्यासंबंधी नसून तो शिकवण्यासाठीही आहे. मात्र यात शिकवण्याच्या अनेक पद्धती आहेत. प्रथम शिक्षकांनी वर्गात विद्यार्थ्यांनी शिकावे असे पोषक वातावरण निर्माण करणे गरजेचे असते. प्रत्येक विषयाची एक संस्कृती असते, तीही वर्गात निर्माण करावी लागते. शिकणारा प्रत्येक जण वेगळा असल्याने, एकच पद्धत सगळ्यांना उपयोगी पडत नाही. यासाठी विद्यार्थ्यांना व्यक्त होण्याची संधी दिली पाहिजे. एखादा विषयघटक शिक्षक कसा शिकला हे जर तो विद्यार्थ्यांना सांगेल, तर ते विद्यार्थ्यांना अधिक उपयोगी पडते. उदाहरणार्थ, विषयघटकाची ओळख-मांडणी-शेवट-मुद्द्याचा क्रम इत्यादी. त्यावर प्रश्न कसे व कोणते विचारायचे, विद्यार्थ्यांना काय काय अडचणी येतील हे ओळखून त्याचे निराकरण करणे, या संपूर्ण क्रियेला 'अधिबोधन क्रिया' म्हणतात. शिक्षक जर सकारात्मक असेल, तर त्याचे अध्यापन परिणामकारक होते. उदा. शिक्षकाला विषय आवडतो का, त्याला आपल्या व्यवसायासंबंधी आणि संस्थेविषयी आत्मीयता आहे का, माझे विद्यार्थी शिकू शकतात, मी त्यांना चांगले शिकवू शकतो, इत्यादी. यामुळे वर्गातील वातावरण आनंदी तर राहतेच, पण शिक्षणही आनंददायी होते. आज असा रचनावाद स्वीकारल्यामुळे जगात फिनलंड, कॅनडा, नेदरलँड, नॉर्वे, इत्यादी ठिकाणाचे शिक्षण सर्वात चांगले आहे.

रचनावादाची दोन गृहीते आहेत. ती म्हणजे, कोणतेही मूल शिकू शकते आणि शिकणारा स्वतः शिकतो- त्याला कोणीही शिकवू शकत नाही व प्रत्येक मुलाची शिकण्याची पद्धत स्वायत्त असते. १९६० साली रचनावाद येण्यापूर्वी मानसशास्त्रात 'वर्तनवाद' होता. त्याअन्वये विद्यार्थ्यांना उद्दीपन दिल्यास त्यांच्याकडून योग्य प्रतिसाद मिळतो. उदा. अंगाला चिमटा काढल्यास माणूस कळवळतो किंवा एखाद्याला विनोदी चित्र दाखवल्यास तो हसतो. त्याला बोधीय मानसशास्त्र म्हणतात. माणसाच्या मनात डोकावण्याची अनेक तंत्रे आता अवगत झाली आहेत.

ज्ञानेंद्रियांना संवेदन कसे होते, अवधान (लक्ष) म्हणजे काय, स्मृती म्हणजे काय, भाषा म्हणजे काय, इत्यादी अनेक. या मानसिक क्रियांचे नियंत्रण चेतासंस्थेद्वारे होते. आपल्याकडे मात्र जाणीवपूर्वक एखादी भूमिका घेतलेली आढळून येत नाही. तरीही मुंबईचे होमी भाभा विज्ञान शिक्षण केंद्र, ग्राममंगल संस्था, पुण्याची अक्षरनंदन शाळा, नाशिकची आनंद निकेतन शाळा, विक्रमगडची क्वेस्ट संस्था, गोरेगावची अ. भि. गोरेगावकर प्राथमिक शाळा यांनी रचनावाद अमलात आणला आहे. यूट्यूबवरही 'टीचर पेजेस्' ही वाहिनी महाराष्ट्रातील शिक्षकांनी रचनावाद पद्धतीने घेतलेले पाठ सादर करते. भारत सरकारच्या एनसीईआरटीने रचनावादावर आधारलेली पाठ्यपुस्तके तयार केली आहेत.

रचनावादी शिक्षण तंत्र वापरताना मुलांना प्रश्न विचारायला उद्युक्त केले पाहिजे आणि त्या वेळी विद्यार्थी निरुत्तेजित होईल असे वातावरण असू नये. काही ठरावीक मुलांनाच प्रश्न विचारायचे टाळायला हवे. विद्यार्थ्यांना संकल्पनाचित्र/मनोचित्र तयार करण्यासाठी प्रोत्साहन दिले पाहिजे. विद्यार्थ्यांना समस्या देऊन त्या सोडवायला प्रोत्साहन दिले पाहिजे. वनस्पतीशास्त्र शिकताना प्रत्यक्ष बागेत जाऊन शिकवल्यास बाग हा वर्ग बनतो. सहकाऱ्यांकडून शिकायला प्रोत्साहन द्यायला हवे. उदा. मुले एकमेकांकडून मोबाइल वापरायला शिकतात.

एकुणात, देशाचे अनेक प्रकारचे प्रश्न सोडवण्यासाठी आपली शिक्षणप्रणाली बळकट करायला हवी, त्यासाठी रचनावादी शिक्षणाची आवश्यकता आहे.


लोकसत्ता Sun, 19 January 2020
https://epaper.loksatta.com/c/48113054

# News Paper Clippings During January 2020

## Section : Miscellaneous




**महाराष्ट्र टाइम्स**

**14-1-2020**

लोकमत

**दुर्मीळ हस्तलिखित गवसले : भांडारकर संस्थेचे पटवर्धन यांची माहिती**

# 'सप्तश्लोकी गीते'चे दुर्मीळ हस्तलिखित पुस्तकरुपात येणार

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे :** भांडारकर प्राच्यविद्या संशोधन संस्थेकडे असलेल्या हस्तलिखितांच्या संग्रहामध्ये 'सप्तश्लोकी गीता' हे दुर्मीळ हस्तलिखित गवसले आहे. भगवद्गीतेतील एकाच श्लोकाचा विविध प्रतिभावंतांनी वेगवेगळ्या काव्याविष्काराद्वारे उलगडलेला आशय आणि केवळ सातच श्लोकांचा समावेश असलेले अशा स्वरूपाचे हस्तलिखित हा अनमोल ठेवा अभ्यासकांना उपलब्ध करून देण्यासाठी पुस्तक निर्मिती करण्यात येणार असल्याची माहिती भांडारकर संस्थेच्या कार्यकारी मंडळाचे अध्यक्ष भूपाल पटवर्धन यांनी 'लोकमत'शी बोलताना दिली.

भगवद्गीतेतील मूळ श्लोक, त्याच आशयाची वामन पंडित यांची समश्लोकी काव्यरचना,



मोरोपंत यांची आर्या, तुलसीदास यांचे दोहे, मुक्तेश्वर यांची ओवी, संत तुकाराम महाराज यांचा अभंग आणि संत ज्ञानेश्वर महाराज यांची 'भावार्थ दीपिका'मधील रचना अशा 'सप्तश्लोकी गीता' या दुर्मीळ हस्तलिखिताचे रुपांतर पुस्तकरूपामध्ये होत आहे. या पुस्तकाबरोबरच ओवी, अभंग, आर्या आणि दोहे यांच्या सुश्राव्य गायनाची सीडी देखील संस्थेतर्फे भेट दिली जाणार आहे.

सुवाच्य हस्ताक्षरातील या हस्तलिखितावर कोणाचेच नाव नसल्यामुळे त्याचा लेखक कोण आणि कालखंड यावर प्रकाश पडत नाही. मात्र, वैयक्तिक संग्रहातून तसेच राज्यभरातील देवस्थानांकडून संस्थेकडे प्राप्त झालेल्या पोथ्यांमध्ये हे दुर्मीळ हस्तलिखित सापडले आहे. या 'समश्लोकी गीता' हस्तलिखिताला पुस्तक रूपामध्ये आणताना त्यातील काव्यप्रकारांच्या गायनाची सीडी देण्याचा संस्थेचा मानस आहे. या प्रकल्पाच्या सिद्धतेसाठी सहा महिन्यांचा कालावधी लागणार आहे. या मराठी हस्तलिखितांच्या समग्र सूचीचे काम सुनीला गोंधळेकर करीत आहेत.

### काव्यगायन सादर

- 'समश्लोकी गीता' या पुस्तकाबरोबर देण्यात येणाऱ्या ओवी, अभंग, आर्या आणि दोहे या काव्यगायनाला डॉ. गौरी मोघे यांचा स्वर लाभला आहे.
- त्या किराणा घराण्याच्या प्रसिद्ध गायिका पूर्णिमा भट-कुलकर्णी यांच्या शिष्या आहेत, असे पटवर्धन यांनी सांगितले.

Hello Pune
Page No. 2 Jan 23, 2020
Powered by: erelego.com

सकाळ

» सर्च-रिसर्च — महेश बर्दापूरकर

# भाषांच्या लिपींना नवसंजीवनी

जगभरात सहा ते सात हजार भाषा आहेत आणि त्यातील अनेक भाषांना स्वतःची लिपीही आहे. मात्र, अनेक भाषांच्या लिपी लुप्त होण्याच्या मार्गावर असल्याचे नवे संशोधन सांगते. मनुष्य बोलत असलेल्या भाषांतील शब्दांबरोबरच त्यांच्या लिपींच्या अस्तित्वाला निर्माण झालेला धोका संशोधकांना अधिक गंभीर वाटतो. कोणतीही भाषा लुप्त होताना आपण केवळ तिच्या बोली रूपाचाच विचार करतो. मात्र, वर्णाक्षरे ती भाषा कोणत्या संस्कृतीच्या माध्यमातून उदयास आली हे सांगतात. त्यामुळे वर्णाक्षरांचे लुप्त होणे हे संस्कृतींचा इतिहास लुप्त होण्यासारखे असल्याने त्याबद्दल अधिक चिंता व्यक्त होत आहे.

'युनेस्को'ने २०१९ हे 'स्वदेशी भाषांचे वर्ष' म्हणून जाहीर केले होते. संस्थेने जगभरात स्वदेशी भाषांचे संवर्धन, पुनरुत्थान व प्रचारावर भर द्यावा, असे आवाहनही केले होते. मात्र, सर्वत्र बोली भाषांवरच भर दिला गेला व विविध संस्कृतींमध्ये भाषा लिहिण्याच्या पद्धती कशा आहेत, याकडे डोळेझाक केली गेली. भाषेचे ज्ञान मनुष्याला जन्मजातच मिळते, मात्र लिपींचा शोध घ्यावा लागतो आणि त्या प्रयत्नपूर्वक शिकाव्याही लागतात. मात्र, लिपी शिकण्याकडे दुर्लक्ष होत राहिले व १९व्या शतकाच्या मध्यापर्यंत जगातील केवळ दहा टक्के लोकांना लिहिता येत होते. सध्या जगात जेमतेम १४० भाषांना स्वतःच्या लिपी आहेत व त्यातील तब्बल ८५ टक्के लुप्त होण्याच्या मार्गावर आहेत. वर्णाक्षरांच्या प्रकल्पावर काम करणारे संशोधक टीम ब्रुक्स यांच्या मते, "मानवाने लिखित भाषेपेक्षा बोली भाषेलाच अधिक महत्त्व दिले. लिहिणे हे भाषेचे अपघातातून जन्माला आलेले अपत्य आहे, असेच मत पहिल्यापासून बनविले गेले. बोलीभाषांचा अभ्यास हाच खरा भाषांचा अभ्यास असल्याचाही समज करून दिला गेला." याच विषयावर संशोधन करणाऱ्या शीना शहा यांच्या मते, "लुप्त होणाऱ्या भाषांप्रमाणेच लुप्त होणारी वर्णाक्षरे व लिपी यांबद्दल लोकांना पुरेशा गांभीर्याने सांगण्यातच आलेले नाही." वर्णाक्षरे ही भाषेपेक्षा संस्कृतीबद्दल अधिक भाष्य करतात. त्यांचे स्वरूपच त्या काळाचे वर्णन करते. उदा. दगडावर कोरलेली व खालच्या बाजूला ओढलेली 'रुनिक' भाषेतील




अक्षरे स्कॅन्डेनेव्हिअन देशांतील अनागोंदीचे वर्णन करतात, तर गुंतागुंतीचे स्वरूप असलेली चिनी भाषा केवळ कागदाचा उदय झाल्यावर बहरली. लिपी संदेशवहनाचे काम करीत नव्हत्या, तर त्यांनी त्या वापरणाऱ्यांच्या जीवनमूल्यांतही स्थान मिळवले. काही ठिकाणी ते धर्मग्रंथ आणि पोथ्यांच्या स्वरूपात होते. मात्र, नंतरच्या काळात राष्ट्रीयत्वाच्या प्रश्नावरून सरकारांनी नागरिकांवर भाषा लादल्या व त्यांच्या मूळ भाषा अस्तंगत झाल्याचीही उदाहरणे आहेत. उदा. बांगलादेशाच्या निर्मितीनंतर तेथील राज्यकर्त्यांनी बंगाली भाषा निवडली व तेथील 'मारमा' ही भाषा हळहळू अस्तंगत होत गेली. माउंग नायू हे 'मारमा'चे अभ्यासक ही भाषा पुन्हा जिवंत करण्यासाठी प्रयत्नशील आहेत. सुरुवातीला त्यांच्याकडे ही भाषा शिकण्यासाठी केवळ पाच मुले येत होती, ही संख्या आता तीन हजारांवर गेली आहे. मातृभाषा शिकल्यामुळे तेथील शाळा सोडणाऱ्या मुलांचे प्रमाणही वेगाने घटले आहे.

मातृभाषेत शिकल्यास विषय अधिक चांगल्या पद्धतीने समजतात, हेच नवे संशोधन सांगते. ब्रुक्स यांच्या मते, "आपल्या भाषेच्या लुप्त होत चाललेल्या लिपींना नवसंजीवनी देण्यासाठी अनेक भाषातज्ज्ञ कामाला लागले आहेत. या लिपींचे डिजिटायझेशन केल्यास अरेबिक किंवा लॅटिनसारख्या इतर लिपींचा प्रभाव कमी करता येईल. लुप्त होणाऱ्या या वर्णाक्षरांचा अर्थ समजायला नव्या पिढीला अवघड गेले, तरी त्यांच्यातील नावीन्य व सुबक मांडणी त्यांना आकर्षित करीत राहील."


Pune, Main
30/01/2020 Page No. 6

# News Paper Clippings During January 2020

## Section : Miscellaneous

दिव्य हिमाचल

8/12

दिवस विशेष - विश्व हिंदी दिवस

# हिंदी का बढ़ता वर्चस्व



कर्म सिंह ठाकुर

लेखक, मंडी से हैं

**कोई** भी भाषा या बोली एक व्यक्ति द्वारा अपनी बात को दूसरे व्यक्ति तक पहुंचाने का एक माध्यम है, जिसे मनुष्य सदियों से इस्तेमाल करता आ रहा है। इस धरती पर मानव सभ्यताओं के फलने-फूलने के साथ ही साथ असंख्य भाषाएं व बोलियां अस्तित्व में आईं। इनमें से कई भाषाएं सभ्यताओं के पतन के साथ ही खत्म हो गईं, लेकिन कई सभ्यताएं और भाषाएं आज भी खूब फल-फूल रही हैं। हिंदी भी वैश्विक पटल पर फलती-फूलती भाषाओं का जीवंत उदाहरण है।

हिंदी भाषा विश्व में मंदारिन 'चीनी भाषा' के बाद सर्वाधिक बोली जाने वाली भाषा है। भारत और विदेशों में करीब 50 करोड़ लोग हिंदी बोलते हैं तथा इस भाषा को समझने वाले लोगों की संख्या करीब 90 करोड़ है। इतने बड़े जनसमूह द्वारा हिंदी भाषा का इस्तेमाल इस भाषा की सार्थकता को चरितार्थ करता है। हर वर्ष 10 जनवरी को अंतरराष्ट्रीय हिंदी दिवस मनाया जाता है। विश्व हिंदी दिवस को मनाने की शुरुआत पूर्व प्रधानमंत्री डाक्टर मनमोहन सिंह ने 10 जनवरी 2006 को की थी। तभी से हर साल 10 जनवरी को विश्व हिंदी दिवस मनाया जाता है। भारत में राष्ट्रीय हिंदी दिवस 14 सितंबर को हर वर्ष मनाया जाता है। विश्व हिंदी दिवस का उद्देश्य विश्व भर में हिंदी के प्रचार-प्रसार के लिए वातावरण निर्मित करना और हिंदी को अंतरराष्ट्रीय भाषा के रूप में पेश करना होता है।

हिंदी भाषा का वर्चस्व सिर्फ भारत में ही नहीं है, भारत के अलावा इसे नेपाल, मॉरिशस, फिजी, सूरीनाम, यूगांडा, दक्षिण अफ्रीका, कैरिबियन देशों, ट्रिनिडाड एवं टोबेगो और कनाडा आदि में बोलने वालों की अच्छी खासी संख्या है। इसके अलावा इंग्लैंड, अमरीका, मध्य एशिया में भी हिंदी भाषा के उपयोगकर्ताओं की संख्या दिनप्रति दिन बढ़ती ही जा रही है। वर्तमान सूचना प्रौद्योगिकी का युग है और इसमें प्रचार-प्रसार का प्रमुख माध्यम इंटरनेट ही है। वर्तमान परिप्रेक्ष्य में किसी भी भाषा की सार्थकता व प्रमाणिकता को इंटरनेट से भी परखा जाने लगा है। हिंदी का प्रचार-प्रसार इंटरनेट पर खूब फलता-फूलता दिख रहा है। इंटरनेट पर हिंदी सामग्री का बाजार हर वर्ष 95 प्रतिशत बढ़ रहा है।

90 करोड़ लोगों तक पहुंचने के लिए बहुराष्ट्रीय कंपनियां गांव-कस्बों तथा छोटे शहरों में अपने पैर पसारने लगी हैं। यही कारण है कि आज अंग्रेजी भाषा के साथ-साथ अच्छी हिंदी जानने वाले जानकारों की मांग भी बढ़ रही है। एक अनुमान के मुताबिक वर्ष 2021 तक देश में हिंदी भाषा इंटरनेट उपयोग करने वालों की संख्या अंग्रेजी भाषा प्रयोग करने वालों से अधिक हो जाएगी। इंटरनेट वेबसाइट कंपनियां जैसे एमजॉन, वॉल-मार्ट, सर्च इंजन गूगल भी वर्तमान में इंटरनेट पर हिंदी में कंटेंट उपलब्ध करवाने का भरसक प्रयास कर रहे हैं। आंकड़ों के मुताबिक देश में वर्तमान इंटरनेट पर हिंदी भाषा वाले कंटेंट को ब्राउज करने वालों की संख्या लगभग 39 प्रतिशत हो चुकी है।

इससे पता चलता है कि हिंदी प्रयोगकर्ताओं के लिए भविष्य में इंटरनेट की मार्केट अनेक अवसर पैदा करेगी। भारत में गूगल के एमडी का मानना है कि इंटरनेट यूजर्स की अगली पीढ़ी ग्रामीण भारत से होगी। इसलिए इंटरनेट कंपनियों को अंग्रेजी के साथ-साथ हिंदी व क्षेत्रीय भाषाओं में भी तेजी से कार्य करना होगा। मॉरिशस में आयोजित 'अंतरराष्ट्रीय हिंदी सम्मेलन' के अवसर पर प्रौद्योगिकी संबंधी सत्रों में इंटरनेट पर बढ़ती हिंदी की गरिमा पर गहन विचार-विमर्श किया गया। निष्कर्ष के तौर पर उम्मीद जताई जा रही है कि मॉरिशस के हिंदी उत्थान सत्रों में की गई अनुशंसाओं द्वारा हिंदी का मार्ग इंटरनेट की दुनिया पर सजगता से प्रशस्त होगा।

ध्यातव्य है कि मॉरिशस में 75 फीसदी भारतीय मूल के लोग हैं, इसलिए मॉरिशस को 'लघु भारत' भी कहा जाता है। मॉरिशस में विश्व हिंदी सम्मेलन का केंद्रीय सचिवालय है, जहां से विश्व हिंदी समाचार का प्रकाशन होता है। पिछले कुछ समय से यूनिकोड फॉंट की उपलब्धता के कारण हिंदी में चैट, गप-शप, ई-मेल, ई-शिक्षण, मल्टीमीडिया की सुलभता के कारण हिंदी की लोकप्रियता बढ़ी है। बढ़ती जनसंख्या के कारण पूरी दुनिया भारत की मार्केट पर नजरें टिकाए हुए है। भारत में बेरोजगारी तीव्र गति से बढ़ रही है, इस पर लगाम लगाने के लिए मातृभाषा में रोजगार के उभरते नवीन अवसरों में कौशलता पर ध्यान देना अति आवश्यक है। अतः जितना संभव हो सके अपनी भाषा में हिंदी का समावेश सुनिश्चित करें।

# विश्व में बढ़ा सम्मान



रविंद्र सिंह मोदी

लेखक, नांदेड़ से हैं

**संपूर्ण** विश्व में वर्तमान समय में भाषाएं प्रतियोगिता बनकर दौड़ रही हैं। विश्व व्यापार में अग्रणी राष्ट्र अपने व्यापार के साथ-साथ अपनी राष्ट्रभाषा को भी बढ़ावा दे रहे हैं। बहु-उद्देश्यीय व्यापार की प्रतिस्पर्धा के चलते चीन, जर्मन, रशिया, फ्रांस, भारत सहित अन्य राष्ट्र अपनी भाषा के जरिए व्यापार के चरम पर पहुंचना चाहते हैं। जिसके कारण ही आज भारत देश के बहुत से विश्वविद्यालयों में विदेशी भाषा 'फॉरेन लैंग्वेज' के डिप्लोमा और डिग्री पाठ्यक्रम संचालित किए जा रहे हैं।

विश्व में भाषा के आदान-प्रदान के लिए बहुत बड़ी पहल शुरू हो गई है जिसमें हिंदी भाषा भी विश्वपटल पर अग्रणी रूप से प्रवाहित होती नजर आ रही है। देश और विदेश में हिंदी भाषा का बढ़ता जा रहा रुतबा इस तरह से हमारी अस्मिता की समृद्धता को भी विश्वरूप में प्रदर्शित करता नजर आ रहा है। विश्व हिंदी दिवस के मौके पर आज हिंदी भाषा पर संवाद करने में सही मायने में आनंद महसूस हो रहा है।

प्रसन्नता का दूसरा सबसे बड़ा कारण ये भी है कि जिस विश्व हिंदी दिवस का हम गौरव मना रहे हैं उसकी पहल तत्कालीन प्रधानमंत्री श्रीमती इंदिरा गांधी के समय में महाराष्ट्र की भूमि नागपुर से तारीख 10 जनवरी, सन् 1975 में हुई थी। पश्चात में प्रधानमंत्री डा. मनमोहन सिंह ने सन 2006 में पहला विश्व हिंदी दिवस मनाने की घोषणा की थी। स्वतंत्रता पश्चात 14 सितंबर, 1949 को संविधान सभा ने हिंदी को राष्ट्रभाषा का बहुमान दिया था। जिसके बाद 14 सितंबर 1953 पहली बार देश में हिंदी दिवस मनाया गया था। जिसके 53 वर्ष बाद हिंदी भाषा को अंतरराष्ट्रीय मंच पर लाया गया। जिसका श्रेय डा. मनमोहन सिंह सरकार को दिया जाना चाहिए।

वर्ष 2006 से लगातार हम विश्व हिंदी दिवस मना रहे हैं। मॉरिशस, यूके, त्रिनिनाद और टोबैगो, संयुक्त राष्ट्र संघ अमरीका और अन्य स्थानों पर कार्यक्रम संपन्न किए गए। जिससे हिंदी भाषा की गरिमा कई गुना बढ़ गई है। आज हिंदी भाषा अपनी संवाद अदाएगी की तरलता के कारण विश्व की जुबान पर चढ़कर बोल रही हैं। जिसका श्रेय हिंदी समाचार पत्र, हिंदी न्यूज चैनल, हिंदी टेलीविजन धारावाहिक और हिंदी फिल्म जगत को भी जाता हैं। हमारे हिंदी साहित्य ने विगत बारह सौ वर्षों में धीरे-धीरे अपनी अलग-अलग विधाओं का निर्माण कर हिंदी की सेवा की हैं। उस सेवा की आज बहुत बड़ी सफलता आज का हिंदी भाषा का वर्तमान स्वरूप है।

हिंदी भाषा में राष्ट्र और अंतरराष्ट्रीय स्तर पर नेतृत्व क्षमता व्याप्त है। इसलिए पूर्व प्रधानमंत्री दिवंगत श्री अटल बिहारी वाजपेयी, दिवंगत सुषमा स्वराज ने विदेशों में हिंदी का परचम लहराया हुआ है। हाल के कुछ वर्षों में प्रधानमंत्री श्री नरेंद्र मोदी द्वारा विदेशों में बड़ी-बड़ी सभाएं आयोजन कर हिंदी में जिस तरह से संबोधन प्रस्तुत किया गया और उन्हें टीवी चैनलों द्वारा सीधे प्रसारण के रूप में जिस तरह से विश्व में परोसा गया उससे निश्चित ही हिंदी की गरिमा में वृद्धि हुई है। आज लगभग 125 देशों में हिंदी का प्रचार-प्रसार पहुंचा है।

बड़े-बड़े देशों के विश्वविद्यालयों द्वारा भी हिंदी के पाठ्यक्रमों का आयोजन करवाया जा रहा है। विदेशी भाषा के रूप में हिंदी सीखने वालों का क्रम भले ही आज पहले दस की सूची में न दिखाई देता हो, लेकिन हवाई अड्डों पर हिंदी का स्वागत कक्ष का प्रचलन भी बढ़ रहा है जो संकेत कर रहा है कि विदेशों की धरती पर हिंदी भाषा का पाठ्यक्रम पढ़ने वालों की संख्या जल्द ही एक क्रमांक पर आ जाएगी। आज विश्व हिंदी दिवस के मौके पर सभी को शुभकामनाएं और बधाई।

**दिव्य हिमाचल**

**20/1/2020**

# News Paper Clippings During January 2020

## Section : Achievements

### प्रभाकर वराडे



प्रभाकर वराडे यांना सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाची पीएचडी जाहीर झाली आहे. त्यांनी 'सायन्स अँड टेक्नोलॉजी' विद्याशाखेअंतर्गत 'इलेक्ट्रॉनिक सायन्स'मध्ये 'डेव्हलपमेंट ऑफ एसएडब्ल्यू डिव्हायसेस फॉर ॲप्लिकेशन्स इन पॉलिमर नॅनोकम्पोझिट बेस्ड गॅस सेन्सर्स' विषयावर प्रबंध सादर केला. इलेक्ट्रॉनिक सायन्स विभागाच्या डॉ. ए. डी. शाळीग्राम यांनी मार्गदर्शन केले.





*Image Courtesy: Google Images*

# News Paper Clippings During January 2020

## Section : Achievements

पुढारी

# वक्तृत्व स्पर्धेत मॉडर्न कॉलेज प्रथम

**शिरूर : प्रतिनिधी**

छत्रपती संभाजी महाराज राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेत सांघिक विजेतेपदाबरोबरच प्रथम क्रमांक पुणे येथील मॉडर्न कॉलेजने पटकाविला. येथील चांदमल ताराचंद बोरा महाविद्यालयात छत्रपती संभाजी महाराज राज्यस्तरीय आंतर महाविद्यालयीन वादविवाद व वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन केले होते. स्पर्धेचे उद्‌घाटन बोरा महाविद्यालयाच्या नियामक मंडळाचे उपाध्यक्ष अनिल बोरा यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी प्राचार्य डॉ. के. सी. मोहिते, प्रा. डॉ. ईश्वर पवार, प्रा. हरिदास जाधव, प्रा. डी. के. मांडलिक, प्रा. वर्षा पानसरे आदी उपस्थित होते. प्राचार्य मोहिते म्हणाले, ज्ञानाधिष्ठित क्रियाशील समाजनिर्मितीसाठी वाचन, चिंतन, वैचारिक मंथन, चर्चा, वक्तृत्व वाद-विवाद इत्यादी माध्यमांची नितांत आवश्यकता आहे. वरिष्ठ महाविद्यालयातील स्पर्धकांसाठी वादविवाद स्पर्धेचा विषय 'आजचे उच्चशिक्षण रोजगराभिमुख आणि समाजाभिमुख आहे' असा होता. तर कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थी गटाच्या वक्तृत्व स्पर्धेसाठी 'छत्रपती संभाजी महाराज युवकांचे प्रेरणास्थान' व 'निसर्गाचा कोप आणि माणसाची उडाली झोप' व 'कौशल्याभिमुख शिक्षण- काळाची गरज' आदी विषय होते.

वक्तृत्व स्पर्धेत मॉडर्न कॉलेज पुणे प्रथम क्रमांक प्रियंका राजेंद्र टिकोळेने मिळवला. द्वितीय लिंबाजी रमेश आगलावेला (फर्ग्युसन कॉलेज, पुणे) मिळाला. तृतीय विशाल क्षीरसागरला (चांदमल ताराचंद बोरा महाविद्यालय, शिरूर) मिळाला. तर स्पर्धेचे सांघिक विजेतेपद मॉडर्न कॉलेज, पुणे यांना मिळाले.

वादविवाद स्पर्धेत प्रथम निकिता बहिरट (मॉडर्न कॉलेज, पुणे), द्वितीय मयूरी नरवडे (घुले महाविद्यालय, पुणे), सुजित काळंगे (वारजे माळवाडी महाविद्यालय, पुणे) यांनी मिळविला. तर उत्स्फूर्त वक्तृत्व स्पर्धेत आकांक्षा वळेला (बोरा महाविद्यालय, शिरूर) बक्षीस मिळाले. स्पर्धेसाठी परीक्षक म्हणून प्रा. राजश्री देशपांडे, प्रा. डॉ. भाऊसाहेब गव्हाणे, प्रा. विजय अंधारे, प्रा. सतीश धुमाळ यांनी काम केले. स्पर्धेतील विजेत्यांना प्राचार्य डॉ. के. सी. मोहिते यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले.



छत्रपती संभाजी महाराज राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेत बक्षीस मिळविलेल्या विद्यार्थ्यांना सन्मानित करताना प्राचार्य डॉ. के. सी. मोहिते.

प्रास्ताविक प्रा. डॉ. बाळकृष्ण लळित यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. क्रांती पैठणकर (गोसावी) यांनी केले. प्रा. नंदकुमार पाटील यांनी आभार मानले.


दैनिक 'पुढारी'स वर्धापनदिनाच्या हार्दिक शुभेच्छा!
शुभेच्छुक
श्री. रोहिदास गंगाराम रासकर
सौ. रुपाली रोहिदास रासकर


My Gramin Edition
7 Jan, 2020 Page No. 1
Powered by : erelego.com





# News Paper Clippings During January  2020

## Section : Achievements

# मॉडर्न कॉलेजच्या शज्वळ मानकरची सुवर्ण हॅट्ट्रिक

## विश्वनाथ स्पोर्ट्स मीट २०२०



पुणे : मॉडर्न कॉलेजच्या शज्वळ मानकर याने चौथ्या 'विश्वनाथ स्पोर्ट्स मीट २०२०'मध्ये झालेल्या ५० मीटर जलतरण स्पर्धेच्या बॅक स्ट्रोक, फ्री स्टाईल आणि ब्रेस्ट स्ट्रोक प्रकारात तीन सुवर्णपदक जिंकण्याचा पराक्रम केला. महिलांच्या फ्री स्टाईल आणि बटरफ्लाय प्रकार एमआयटी डब्ल्यूपीयूच्या रूपल बुजाडे हिने दोन सुवर्णपदके जिंकली.

एमआयटी एडीटीतर्फे आयोजित चौथ्या विश्वनाथ स्पोर्ट्स मीटच्या जलतरण स्पर्धेत ५० मीटर फ्री स्टाईल, बॅक स्ट्रोक, ब्रेस्ट स्ट्रोक, बटरफ्लाय आणि फ्री स्टाईल रिले प्रकारात स्पर्धा झाली. यात शज्वळ मानकरने फ्री स्टाईलमध्ये २६.२८ सेकंद, बॅक स्ट्रोकमध्ये ३०.०४, तर ब्रेस्ट स्ट्रोकमध्ये ३३.०६ सेकंदात पूर्ण करत सुवर्णपदकावर नाव कोरले. ५० मीटर फ्री स्टाईल (पुरुष) प्रकारात गरवारे कॉलेजच्या इशान भुजबळने रौप्य, एमजीएम कॉलेजच्या प्रणव राऊतने कांस्यपदक जिंकले. ५० मीटर फ्री स्टाईल (महिला) प्रकारात सिंहगड कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगची युक्ता भुरके हिने रौप्य, तर एमआयटी आयडीची सानिका मोरे हिने कांस्यपदक जिंकले.

५० मीटर बॅक स्ट्रोक (पुरुष) प्रकारात एमआयटी आयडीचा अनिरुद्ध कांटेने रौप्य, तर भारती विद्यापीठाचा वरुण जी याने कांस्यपदक जिंकले. ५० मीटर फ्री स्टाईल (महिला) प्रकारात सिंहगड कॉलेजची युक्ता भुरके हिने सुवर्ण, एमआयटी डब्ल्यूपीयूची सिमरन वैश्य हिने रौप्य, तर एमआयटी आळंदीची गायत्री वडयालकर हिने कांस्यपदक जिंकले. ब्रेस्ट स्ट्रोक ५० मीटर (पुरुष) प्रकारात व्हीआयआयटी कोंढव्याचा प्रजित लोनवत याने रौप्य, गरवारे कॉलेजचा रोहन पुणेकर याने कांस्यपदक जिंकले. ब्रेस्ट स्ट्रोक ५० मीटर (महिला) प्रकारात एमएमसीसीची साक्षी छाजेड हिने सुवर्ण, एमआयटी आयओडीची तनिक्षा दर्शिनी हिने रौप्य, तर एमआयटी आळंदीची गायत्री वडयालकर हिने कांस्यपदक जिंकले.

५० मीटर बटरफ्लाय (पुरुष) प्रकारात एमआयटी मॅनेटचा नचिकेत बुजरूग याने सुवर्ण, गरवारे कॉलेजचा प्रथमेश सोनार याने रौप्य, तर व्हीआयआयटी कोंढव्याचा ओमकार चिल्लालने कांस्यपदक जिंकले. ५० मीटर बटरफ्लाय (महिला) प्रकारात एमआयटीची रूपल बुजाडे हिने सुवर्ण, सानिका मोरे हिने रौप्य आणि सिमरन वैश्य हिने कांस्यपदक जिंकले.





## Article



डॉ. प्रेरणा उबाळे
सहायक प्राध्यापक, हिंदी विभागप्रमुख
मॉडर्न महाविद्यालय (स्वायत्त),
शिवाजीनगर, पुणे-05
संपर्क नंबर: 7028525378
मेल आई.डी. prerana.ubale@yahoo.com

# रसीदी टिकट : स्त्री जाणिवांचे सुगंधी फूल

"जन्म घेते आत्मकथा,
अनुभवांची शिदोरी देण्यासाठी,
स्व-मनात डोकावता-डोकावता,
संवाद साधते सर्वांशी."

विविध साहित्य-प्रकारांमध्ये 'आत्मकथा' हा एक निराळा असा साहित्य -प्रकार आहे, जो एखाद्या विशिष्ट व्यक्तीच्या भावना अभिव्यक्त करूनही सर्वांना आपलेसे करतो. आत्मकथा ही व्यक्तीसापेक्ष जीवन-कथा असूनही तिच्यामध्ये मानवी जीवनाचे संपूर्ण सार सांगण्याची अद्भुत क्षमता असते. हिंदी साहित्यातील रीतीकालानंतर आधुनिक काळात गद्य- साहित्य प्रकारांचा विकास झाला. कथा, कादंबरी, नाटक, एकांकी, जीवन-चरित्र, निबंध इत्यादींबरोबरच 'आत्मकथा' साहित्य-प्रकाराने आपले महत्वाचे स्थान निर्माण केले. आधुनिक काळात इंग्रजी व इतर भारतीय भाषांमधील अनेक आत्मकथांचे हिंदीमध्ये भाषांतरण झाले. यांमध्ये सर्वप्रथम महात्मा गांधींची गुजराती भाषेतील आत्मकथा हिंदीमध्ये 'सत्य के प्रयोग' या नावाने रुपांतरीत झाली. या आत्मकथेने जगात नवा इतिहास घडविला. यानंतर मात्र सर्वच भारतीय भाषांमध्ये जणू आत्मकथा लिहिण्याची परंपराच निर्माण झाली. रीतीकालीन कवी बनारसीदास जैन यांची 'अर्धकथानक' ही आत्मकथा (संवत १६९८)हिंदी आत्मकथांचे बीज आहे. या आत्मकथेनंतर श्यामसुंदरदास यांची 'मेरी आत्मकहानी', राहुल सांकृत्यायन यांची 'मेरी जीवनयात्रा', सेठ गोविंददास यांची 'आत्मनिरीक्षणे', बेचन शर्मा 'उग्र' यांची 'अपनी खबर', हरिवंशराय बच्चन यांची 'क्या भूलूँ क्या याद करूँ', ओमप्रकाश वाल्मीकि यांची 'जूठन' इत्यादी आत्मकथा प्रकाशित झाल्या; ज्यांनी हिंदी साहित्याला एक नवी दिशा दिली. जसजसे स्त्रीप्रधान साहित्य लिहिले जाऊ लागले; तसतशा महिला लेखिकांच्या आत्मकथाही प्रकाशित झाल्या आणि

त्या लोकप्रियदेखील झाल्या. यामध्ये प्रामुख्याने मैत्रेयी पुष्पा यांची 'कस्तुरी कुंडल बसै' आणि 'गुडिया भीतर गुडिया', नासिरा शर्मांची 'जहाँ फव्वारें लहू रोते हैं', 'उत्ताल हवा', 'द्विखंडित', 'वे अँधेरे दिन', 'मुझे घर ले चलो'- या पाच खंडांमध्ये विभाजित आत्मकथांचा उल्लेख करता येईल. या सर्व आत्मकथा वैशिष्ट्यपूर्ण आहेत पण त्या केवळ संबंधित लेखकाचा यशस्वी जीवनपटच उलगडतात म्हणून नाही तर यासाठी की या आत्मकथा जीवनातील सकारात्मकता, आपले अपयश व दोष यांचे प्रामाणिकपणे चित्रण तर करतातच शिवाय आत्मकथा-लेखनाच्या पहिल्या अटीचे किंवा नियमाचे पालनही करतात. हिंदी महिला लेखिकांमध्ये सर्वाधिक चर्चित व लोकप्रिय आत्मकथा ठरली, ती म्हणजे- अमृता प्रीतम यांची 'रसीदी टिकट'.

साहित्य अकादमी पुरस्कार मिळवणाऱ्या अमृता प्रीतम या पहिल्या भारतीय लेखिका आहेत. त्यांनी पंजाबी आणि हिंदी भाषेत जवळपास 28 कादंबऱ्या, 18 काव्यसंग्रह व 10 पेक्षा अधिक कथासंग्रहाचे लेखन त्यांनी केले आहे. त्यांच्या साहित्यिक योगदानासाठी त्यांना 1981 मध्ये भारतीय ज्ञानपीठ पुरस्काराने गौरवण्यात आले. अमृता प्रीतम यांचे साहित्यिक जीवन जितके परिपूर्ण होते, तितकेच त्यांचे वैयक्तिक आयुष्य निखाऱ्यांनी भरलेले आणि तसेच काहीसे विवादास्पद होते. आयुष्यातील सर्वोत्तम क्षणांबरोबरच कटू अनुभवांना बोलतं करणारी त्यांची आत्मकथा आहे- 'रसीदी टिकट'..... मी या लेखामध्ये मुद्दामच 'आत्मकथा' हा शब्द वापरत आहे, जो मूळ हिंदीतील आहे...कारण 'रसीदी टिकट' बद्दल मराठीमध्ये लिहिताना चरित्र या शब्दापेक्षा हा शब्द अधिक जवळचा तर वाटतोच आहे शिवाय कथेमध्ये जी गुंफण असते ती यामध्ये चपखल उतरली आहे.

एकदा अमृता प्रीतम यांनी 'आत्मकथा' अथवा आत्मचरित्र या साहित्य प्रकाराबाबत असे म्हटले होते की, "आत्मकथा में लेखक और पाठक सम्मुख होते हैं। यह लेखक का अपने घर में पाठक को निजी बुलावा होता है – संकोच की ड्योढ़ी के भीतर की ओर। और यह तभी संभव होता है जब लेखक का साहस उसके किसी सच की अपेक्षा कम न हो। इसमें कोई मेहमान का नहीं, मेजबान का अपमान होता है।"[1] खरोखर आत्मकथा ही व्यक्तिसापेक्ष लिहिली जाणारी शृंखलाबद्ध कथा असते. ज्यामध्ये स्वतःच्या आयुष्याकडे तटस्थतेने, सत्यतेने निरीक्षण करता येते. अमृता प्रीतम यांनी आपल्या आत्मकथेची सुरुवातच अगदी मर्मस्पर्शी केली आहे.त्या लिहितात – "क्या आज क़यामत का दिन है ? जिंदगी के कई वे पल, जो वक्त की कोख से जन्मे और वक्त की कब्र में गिर गए, आज मेरे सामने खड़े हैं .......ये सब कब्रें कैसे खुल गई ? और ये सब पल जीते-जागते कब्रों में से कैसे निकल आए ?[2] 'रसीदी टिकट' मध्ये अत्यंत अलगदपणे लेखिकेने आपल्या जीवनातील अनुभव कथन करण्यास प्रारंभ केला आहे, जसा एखादा चित्रकार आपल्या कुंचल्याने चित्रांमध्ये रंग भरतो अगदी तसेच.

मुलगी झाल्याने वडिलांकडून मिळालेल्या कधीतरी प्रेमामुळे तर बऱ्याचदा द्वेषामुळे अमृता प्रीतम यांना स्व-अस्तित्व कधी हवेसे तर कधी नकोसे वाटत असे. परंतु लेखिकेची मूळ वृत्ती ही जीवनातील प्रत्येक भेद मिटवून जगण्याची असल्याने स्त्री-पुरुष असो वा हिंदू-मुस्लीम...सर्व भेदांना मुळापासून उखडून टाकण्याचा प्रयत्न त्यांनी आपल्या कविता-कादंबऱ्यामधून केला. त्यामुळे बल्गेरिया, जॉर्जिया, आर्मिनिया, रशिया, हंगेरी, रोमानिया यांसारख्या विभिन्न देशांतील लेखक-कवींना भारतीय संवेदना व विचारांशी परिचय झाला. 'रसीदी टिकट' मध्ये लेखिकेचा या देशांमधील प्रवास 'सफर की डायरी' मध्ये चित्रित झाला आहे. ही डायरी खरंतर दोन देशांमधील सर्व राजकारण दूर करून मित्रत्वाचे संबंध स्थापित करते व वैश्विक स्तरावर आपले अढळ स्थान निर्माण करते.

'रसीदी टिकट' ही स्त्री-जाणिवांना, स्त्री-भावनांना व्यक्त करणारी आत्मकथा आहे. ती लेखिकेच्या जीवनाशी निगडीत असली तरीही स्त्री-संवेदनांचे प्रतिनिधित्व करणारी अशी साहित्य-रचना आहे. एक स्त्री म्हणून आयुष्याकडे पाहण्याचा त्यांचा दृष्टीकोण आत्मकथेमध्ये व्यक्त झाला आहे. आईच्या मृत्युनंतर अमृता प्रीतम यांचे एकटेपण वाढले. ईश्वरावरील विश्वास नष्ट झाला. अनेक रात्री त्यांनी स्वप्नांमध्येच घालवल्या. स्वप्नांमध्ये कुठेतरी आपण हरवल्याचे, अनेक लोकांमध्ये असून एकटे असल्याचे त्यांना दिसत असे. आईच्या मृत्युनंतर एकटे पडल्याने आपला राग व्यक्त करताना लेखिका याबाबत देवाकडे जाब विचारताना दिसते. आईचे सुख मिळवण्यासाठी स्वप्नातील नवीन जग निर्माण केल्याचा उल्लेख या आत्मकथेत मिळतो. लेखिकेच्या जीवनातील हा महत्वाचा भाग आहे. पतीच्या सोडून जाण्यानंतर किंवा आयुष्याच्या कोऱ्या कागदावर सुंदर नज्म लिहिणाऱ्या साहिरच्या सोडून जाण्यानंतर त्याचं कागदावर इमरोजने वीस वर्षांपर्यंत जे सुंदर चित्र रेखाटले, त्यासाठी ती धन्यवाद ही देते.ही वीस वर्षे लेखिकेच्या जीवनातील सुरेख स्वप्नांप्रमाणे होती. अमृता प्रीतमचे साहिरवरचे प्रेम शेवटपर्यंत विलक्षण तीव्र होतं. पण तितकाच प्रगाढ विश्वास होता – इमरोजच्या मैत्रीवर. तिघांचेही एकमेकांशी नाते अपूर्ण होते पण तरीही निर्मळ आणि सखोल होते.

अमृता प्रीतमने ज्याप्रमाणे प्रेमासंदर्भात दु:खपूर्ण गीते लिहिली, त्याचप्रमाणे मानव-प्रेम, मानवता यांना अनुसरून अनेक कविता लिहिल्या. भारत-पाकिस्तानच्या फाळणीनंतरचे आपले व दोन्हीं देशांमधील नागरिकांचे दु:ख मांडताना त्यांनी लिहिलेली कविता खूपच लोकप्रिय झाली होती. या कवितेचा काही भाग आत्मकथेमध्येही समाविष्ट केला आहे-

"आज वारिस शाह से कहती हूँ, अपनी कब्र में से बोलो,
और इश्क की किताब का कोई नया पृष्ठ खोलो

पंजाब की एक बेटी रोई थी, तूने लंबी दास्तान लिखी,
आज लाखों बेटियां रो रही हैं, वारिस शाह तुमसे कह रही है,
ऐ दर्दमंदों के दोस्त ! अपने पंजाब को देखो,
वन लाशों से अटे पड़े हैं, चिनाब लहू से भर गया है.....”[3]

देशाच्या विभाजनाचे दु:ख भोगणाऱ्या भारतासाठी आणि संपूर्ण जगासाठी सद्भावना व शांततेची प्रार्थना करणाऱ्या अमृता प्रीतम यांनी व्यक्तिगत जीवनात स्त्री- सुखापेक्षा, लेखिकेच्या रूपातील सुख अधिक अनुभवले. त्यांची ओळखही ‘लेखिका’ म्हणूनच सर्वमान्य.....म्हणूनच आत्मकथेमध्ये त्या लिहितात – “यूँ तो मेरे भीतर की औरत सदा मेरे भीतर के लेखक से दूसरे स्थान पर रही है l कई बार यहाँ तक कि मैं अपने भीतर की औरत का अपने-आपको ध्यान दिलाती हूँ l ‘सिर्फ लेखक’ का रूप इतना उजागर होता है कि मेरी अपनी आँखों को भी अपनी पहचान उसीमें मिलती है l”[4] असे असले तरीही ‘रसीदी टिकट’ लिहिताना त्यांच्यातील स्त्री सतत आपले अस्तित्व दर्शवताना आणि लेखिकेला प्रेरणा देताना दिसते.

हिंदू धर्मामध्ये जसे जीवनाचे चार भाग सांगितले आहेत- चार वर्ण, चार आश्रम –तसे लेखिकेने आपल्या मानसिक अवस्थेचे चार भाग केले आहेत-

१. अचेतनता – लेखिकेच्या म्हणण्यानुसार अचेतनता लहान मुलासारखी होती. तिला प्रत्येक गोष्ट आश्चर्य असल्यासारखीच वाटे, ज्याला लहानशा वस्तुमध्येदेखील खूप आनंद मिळतो.

२. चेतनता– लेखिका चेतनतेला युववास्थेचे प्रतीक मानते. जी आयुष्यातील चुकीच्या मूल्यांविरुद्ध तडफेने पेटून उठते, ती कोणाचे ऐकत नाही, ती उच्छ्रन्खलतेने व्यापलेली असते.

३. उदारता – वर्तमानाला उखडून टाकणारी, भविष्याला बांधून ठेवणारी दिलेरी, उदारता.....अशी उदारता की जिच्यामुळे जिंकण्याची आशा निर्माण होते.

४. एकटेपण–आयुष्याचा हा महत्वाचा भाग आहे, असे अमृता प्रीतम म्हणतात. त्या विचारांमध्ये सुद्धा एकट्याच होत्या. त्या म्हणतात – “सपने से में जब जागती थी; मैं वैसी की वैसी ही होती थी- सूनी, वीरान और अकेली l एक ‘सिर्फ औरत’ जो अगर माँ नहीं बन सकती थी, तो जीना नहीं चाहती थी l” लेखिका हा एकटेपणा विसरण्यासाठी प्रवासामध्ये ही डायरी लिहित असे.

या चार ही अवस्थांचे चित्रण आत्मकथेमध्ये अतिशय सशक्तपणे झाले आहे.

त्यांचा साहित्यिक प्रवास, कवितेसाठीची कधीही न शमणारी तहान, व्यक्तिमत्वाची उदात्तता, मुलांवरील अतूट प्रेम- हे सर्व काही पाण्यासारख्या नितळपणे व तितकेच पारदर्शीपणे आत्मकथेमध्ये

चित्रित झालेले दिसते.सूक्ष्म भावनांना अभिव्यक्त करणारे शब्द-सामर्थ्य यामध्ये आहे.

'रसीदी टिकट' ही आत्मकथा कोणत्याही प्रकारची 'डिप्लोमसी' न ठेवता, हृदय आणि जीवन यांची सत्य-कथा वर्णन करणारी अद्वितीय रचना आहे. आपल्या कवितांमधून नेहमी फुलांप्रमाणे कोमल गोष्टी उलगडणाऱ्या साहित्यासारखी 'रसीदी टिकट' देखील प्रवाहपूर्ण, ओघवती, नितळ कविता वाचल्याचा निर्मळ आणि निखळ आनंद देते. अमृता प्रीतमचे मन नेहमीच पारिजातकाच्या फुलाप्रमाणे सुगंधाने भरलेले राहिले. फुलांच्या सुगंधाला 'जीवनाची महाचेतना' म्हणून संबोधणाऱ्या या लेखिकेची आत्मकथा निश्चितच मानवी जीवनाला नेहमी उल्हास, प्रेम आणि सत्याचा सुगंध देत राहील.

- **संदर्भ-ग्रंथ सूची :**


- हिंदी आत्मकथा साहित्य का अनुशीलन – डॉ. विजया; पृष्ठ क्र. २४, शब्दसृष्टी, कृष्णकमल, नेरूळ, मुंबई; प्रथम आवृत्ती-२००८
- रसीदी टिकट (आत्मकथा)– अमृता प्रीतम ; पृष्ठ क्र. ०७; हिंद पॉकेट बुक्स, दिल्ली; आवृत्ती – १९८८
- रसीदी टिकट – पृष्ठ क्र. २५
- रसीदी टिकट – पृष्ठ क्र. ५६

## Upcoming Events

# February 2020

| Sun | Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | 1 |
| 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 |
| **9** *Sant Ravidas Maharaj Jayanti* | 10 | 11 | 12 | 13 | 14 | **15** *Sant Sevalal Maharaj Jayanti* |
| 16 | 17 | 18 | **19** *Chhatrapati Shivaji Maharaj Jayanti* | 20 | 21 | 22 |
| **23** *Sant Gadgebaba Maharaj Jayanti* | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 |




***Progressive Education Society's***

**Modern College of Arts, Science and Commerce ( Autonomous )**

**Shivajinagar, Pune-411005. Maharashtra**

*Image Courtesy: Google Images*

*All images in this Bulletin Issue are downloaded from Google Images.*

*Disclaimer: The Publisher and Editorial Team of this Issue of Library E-Bulletin are not responsible for the views expressed in the Article*